# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## दिनांक २६-१०-२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार **दिनांक २६ ऑक्टोबर २००७ रोजी** मा.महापौर डॉ.भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.४५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,नगरसचिव यांचेसह संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०५. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०६. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०७. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०८. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
०९. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१०. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
११. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१२. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१५. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१६. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१७. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१८. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१९. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२०. स.स.सौ.सुशिला भगवान रगडे
२१. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२२. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२३. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२४. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२५. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२६. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२७. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२८. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर
२९. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
३०. स.स.श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन

३१. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३२. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३३. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३४. स.स.श्री.खान निसार मोहम्मद खान
३५. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३६. स.स.सौ.छाया विलास राऊत
३७. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
३८. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
३९. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४०. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४१. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४२. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४३. स.स.श्री.अशरफ युनुस मोतीवाला
४४. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४५. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४६. स.स.श्रीमती खान जहुरबी नासेर
४७. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४८. स.स.सौ.रेखा कैलास काथार
४९. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५०. स.स.डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
५१. स.स.श्री.खुडे विजय किसन
५२. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५३. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५४. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
५५. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
५६. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
५७. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
५८. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
५९. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६०. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६१. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६२. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६३. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६४. स.स.सौ.रहाटकर विजया किशोर
६५. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६६. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
६७. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
६८. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
६९. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
७०. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७१. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर

०२. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश (पप्पु) गुलाबचंद व्यास
०४. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**चर्चा :**

श्री.अ.रशिद खान :कोरम नाही दुपारी ३.०० वाजता सभा घेण्यात यावी.

मा.महापौर :सभागृहात कोरम नाही त्यामूळे सभा दुपारी ३.०० वाजेपर्यत तहकूब करण्यात येते. (वेळ दु.१२.४८ वा.पुन्हा सभा दुपारी ३.४० वा.सभेला सुरूवात)

श्री.अ.रशिद खान :सभागृहात कोरम नाही ०५ मिनिटासाठी सभा तहकूब करावी.

मा.महापौर : कोरम नसल्यामूळे सभा ०५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते (वेळ दु.३.४१ वा. पुन्हा दु.३.५० वा.सभेला सुरूवात)

मा.महापौर :विषय पत्रिका अगोदर घेण्यात येत आहे त्यानंतर चर्चेसाठी वेळ देण्यात येईल.

श्री.मो.जावेद मो.इसहाक : चर्चा अगोदर घ्यावी त्यानंतर विषय घ्यावे नागरीकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे डेग्यूच्या आजारामूळे दोन लहान मुलाचा मृत्यू झालेला आहे संबधीत विभागाचे का लक्ष नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :दोन लहान मुलांचा डेग्यूने मृत्यू झालेला असून त्यांना या सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करावी. ॲडव्होकेट श्री.काझी यांच्या मुलाचा डेंग्युमूळे मृत्यू झालेला आहे.

मा.महापौर :डेंग्यूमूळेच त्या मुलांचा मृत्यू झालेला आहे का याची माहिती घेतली जाईल.

श्री.मो.जावेद मो.इसाक:सर्व वृत्तपत्रात आलेले आहे की डेग्यूमूळेच मृत्यू झालेला आहे ॲडव्होकेट श्री.बाहोद्दीन साहेब यांची ११ वर्षाच्या मुलीचा डेंग्यूमूळे मृत्यू झालेला आहे. आजही एक मुलगा घाटी मध्ये डेग्यूच्या आजाराने ॲडमीट आहे.

मा.महापौर :आरोग्य वैद्य. अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य वैद्य.अधि. :डेंग्यूचे आतापर्यंत १८ रूग्ण आढळले त्यापैकी ४ कन्फॉर्म केसेस आहे या सर्व केसेस ऑगस्टपासून आतापर्यंतच्या आहेत. ही जी केस आहे ती टायफेडची असल्याचे आढळून आले. केस पेपर पाहिले आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक:ॲडव्होकेट श्री.बाहोद्दीन साहेबांच्या ११ वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाला तो कशामूळे झाला याची आरोग्य विभागाने माहिती घेतलेली होती का ?

आरोग्य वैद्य अधि. :या रूग्णाचे सर्व रिपोर्ट वरद रूग्णालयात जावून तपासणी केली असता प्लेटलेट काऊन्ट कमी झालेचे दिसून आले. डेंग्यूमूळे मृत्यू झालेला नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सदर मूलीचा डेंग्यूमूळे मृत्यू झालेला नाही असा लेखी खूलासा द्यावा. या बालकांना सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.प्रशांत देसरडा :या शहरात एक महिण्यात ज्यांचा मृत्यू झाला असेल त्या सर्वांना सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.विनायक पांडे :असा नवीन पायंडा पाडू नये या महानगरपालिकेशी जे संबंधीत असेल अशांनाच श्रध्दाजंली अर्पण केली पाहिजे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :महापालिकेच्या हलगर्जीपणामूळे मृत्यू झालेला आहे त्यामूळे श्रध्दाजंली अर्पण करण्यास हरकत नसावी. त्यातही राजकारण करणे योग्य नाही.

मा.महापौर :जर डेग्यूचा आजार होता तर त्यासाठी टेस्ट वगैरे करावयास पाहिजे होती. जी ॲडव्होकेट यांनी मुलीचा मृत्यू झाला त्यात प्लेटलेट काउन्ट कमी झाला

होता. ते कमी होण्याची बरीच कारणे असतात ज्या पूढील दोन टेस्ट करायला पाहिजे होत्या त्या केल्या नाही म्हणून डेंग्यूमूळे मृत्यू झाला असे म्हणता येणार नाही. या बाबतची कागदपत्रे तज्ञ डॉक्टराकडून तपासणी करण्यात येईल त्यानंतर माहिती दिली जाईल.

श्री.सलीम खॉन :संबंधीत ॲडव्होकेट यांनी मा.आयुक्त यांनाही त्यांच्या मूलीचा मृत्यू कशामूळे झाला महापालिकेने किती दखल घेतली की नाही लेखी अर्ज केलेला आहे.

श्री.प्रशांत देसरडा माझ्या वार्डात श्री.जोशी यांचे दोन मुले वरद हॉस्पीटलला ॲडमीट केलेले होते सतत सात ते आठ दिवस या हॉस्पीटलला मी भेट दिली व डॉक्टराचे म्हणणे होते की हया मुलांना डेंग्यूचा आजार आहे तसा लॅबचा रिपोर्ट आहे. आरोग्य अधिकारी यांना कळविले असता त्यांनी म्हटले की तो रिपोर्ट आपल्याला मान्य नसतो पुणे येथे जी लॅब आहे तेथे तपासणीसाठी पाठविले १५ दिवस दोन्ही मुले तेथे होते आज त्याची प्रकृतीत सुधारणा झालेली आहे दोन महिण्यानंतर आपले अधिकारी सांगतात त्यापैकी एका मुलास डेंग्यूचा आजार होता. डेंग्यूचा आजार कशामूळे झाला होता महापालिकेच्या आरोग्य विभागाने पाहणी सूध्दा केली नाही. त्यामूळे महापालिकेचा आरोग्य विभाग डेंग्यूच्या बाबतीत सिरीयस वाटत नाही.

श्री.संजय जोशी :डेंग्यू होण्याची ही काही लक्षणे असतात साधरणतः एखादा मुलगा ॲडमीट झाला व त्याचे अंगावर लालसर रंगाची झूरळ असेल तर त्यास प्राथमिक अंदाजानुसार डेंग्यू झाला असे वर्तविल्या जाते. दुसऱ्या दिवशी पुन्हा त्या रूग्णाचे रिपोर्ट तपासल्यानंतर जर त्यात व्हाईटसेल प्लेटलेट काउन्ट कमी आले तर ते कन्फॉर्म केले जाते की या रूग्णास डेंग्यू आहे. या शहरातील डॉक्टराकडून W.B.e व फेटलेट कमी झालेले रिपोर्ट येतात ते पुण्याला पाठविण्याची गरज नाही. येथील शासनाचा रिपोर्ट आल्यानंतर सुध्दा महापालिकेचे अधिकारी डेंग्यूचे रूग्ण नाही म्हणून सांगता. शहरात नाल्यांची परिस्थिती बघीतली तर भयानक आहे डासांचे प्रमाण वाढलेले आहे. मलेरीया विभाग पूर्णपणे कोलमडला आहे. १० दिवसातून एकदा किमान फवारणी होणे गरजेचे आहे जी औषधी वापरतो त्यामूळे डास नष्ट होत नाही तरीही तीच औषधी आज वापरली जाते सुर्योदय होण्यापूवी व सुर्यास्त झाल्यानंतर फवारणी केले तरच डासांचा मृत्यू होतो. उशीर झाल्यास ते डास जागेवर नसतात. त्यामूळे फवारणी करून फायदा होत नाही. धुर फवारणी व औषध फवारणी करण्याची व्यवस्था करावी जेणे करून डासाचा नायनाट होईल. स्वच्छ पाण्यात सुध्दा डेंग्यूचे डासाची पैदास होते. पाण्याची डबकी नष्ट केली पाहिजे.

मा.महापौर :डेंग्यूचाच आजार आहे याची १०० टक्के खात्री करून घ्यायची असेल तर पुणे येथे तपासणी करून घ्यावी लागते. काही चाचण्या पीराडीकल केल्या जातात.

आरोग्य वैद्य.अधि. : डेंग्यूचे निश्चित रोग निदान करण्यासाठी दोन प्रकार असून निश्चित रोग निदान करण्यासाठी पुणे येथे नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ व्हायरालॉजी येथे सॅम्पल पाठविले जाते. स्वीटी अविनाश जोशी यांचे सॅम्पल पाठविले होते ते पॉजीटयूव्ह आलेले होते. दुसरा पर्याय असा आहे की रॅपीट टेस्ट म्हणून असते. ती इनडायरेक्ट टेस्ट असल्यामूळे चुकीचा रिपोर्ट येण्याची शक्यता असते. म्हणून व्हायरालॉजीचा रिपोर्ट ग्राहय धरला जातो. जे १८ रूग्ण होते त्यात तीन प्रकारचे होते एक व्हायरालॉजीकलचे सदर १८ रूग्ण हे

वेगवेगळया भागातील आहे. या आजारामध्ये होणारा मोठा बदल प्लेटलेट काउन्ट कमी होणे त्या रूग्णांना आपण संशयीत डेग्यू म्हणून संभवतो. त्या भागामध्ये आपण रॅपीट सिव्हर सर्वे घेतला जातो फवारणी केली जाते.

श्री.मिलींद दाभाडे :पेठेनगर भागात तीन महिण्यापूर्वी एका व्यक्तीचा मृत्यू झाला त्यानंतर तेथे सर्वे केलेला होता. जे मोठमोठे व्हीआयपी लोक आहे त्यांचे निवासस्थान जवळच फवारणी वेळोवेळी होते असे चित्र आहे.

आरोग्य वैद्य. अधि. :सध्या नाव माझ्याकडे नाही चौकशी करून माहिती दिली जाईल.

श्री.अ.रशिद खान :ज्या भागात सुसज्य चांगल्या इमारती आहे व्हीआयपी लोक राहतात त्या भागात अगोदर फवारणी होते जेथे गरीब लोक राहतात तेथे होणे आवश्यक आहे. एक गल्लीत फवारणी केल्यानंतर १५ दिवसांनी दुसऱ्या गल्लीत होते.

श्री.नारायण कुचे :वार्डात डासांचे प्रमाण जास्त असतांना वेळोवेळी फवारणी होत नाही मलेरीया विभागाचे प्रमुख कोण आहे खूलासा करावा.

आरोग्य वैद्य.अधि. :मलेरिया विभागाचे जीवशास्त्रज्ञ या पदावर जे अधिकारी होते ते सेवानिवृत्त झालेले असून त्यांचे जागेवर कुणीही शासनाचे अधिकारी आलेले नाही एक वैद्यकीय अधिकारी यांचेकडे प्र.चार्ज दिलेला आहे.

श्री.प्रल्हाद निमगावकर :माझ्या वार्डात मथुरा हॉस्पीटलमध्ये डेग्यूचे डॉक्टरच्या रिपोर्ट नुसार ६ रूग्ण होते. मलेरीया विभागाचे श्री.बोरूडे यांना या संदर्भात माहिती दिली होती. महापालिकेच्या आरोग्य विभागाने तेथे जावून तपासणी केले का ? गारखेडा परीसर सहास सोसायटी भागात औषध फवारणी होत नाही डास मोठया प्रमाणात होत आहे.

आरोग्य वैद्य.अधि. :वैद्यकीय अधिकारी यांनी त्या हॉस्पीटलला भेट दिलेली होती.

मा.महापौर :आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सदर दवाखान्यात जावून माहिती घ्यावी व पूढील बैठकीत या सभागृहात माहिती ठेवावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे :आरोग्य विभागाच्या संदर्भात चर्चा चालू असून वेळेवर साफसफाई औषध फवारणी होत नाही म्हणून असे आजार उद्‌भवतात. वार्ड क्र.९० मध्ये व इतरही अनेक वार्डात सफाईचे काम चांगले होत नसल्याने डासांचे प्रमाण वाढलेले आहे. साफसफाई करण्याची मागणी केली तर मजूर नाही असे उत्तर मिळते मलेरीया विभागातील सर्वच लोक साफसफाईचे काम करीत नाही घरी बसून पगार घेतात याची लेखी प्रशासनाकडे दिलेले आहे. दखल घेतली जात नाही. मुकारदम त्यांचे हजेरी लावतात त्यामूळे स्वच्छतेचे काम चांगले होत नाही. त्यामूळे ही परीस्थिती निर्माण झालेली असून आपण स्वत: कोणत्या वार्डात स्वच्छता होते कुठे होत नाही याची माहिती घेवून कार्यवाही करावी. कर्मचारी कमी असेल तर तात्पुरत्या स्वरूपात घेण्यात यावे.

श्री.सलीम खान :आपला एक वर्षाचा महापौर पदाचा कार्यकाळ चांगला गेलेला आहे. आजच्या बैठकीत ऐनवेळचे जे विषय आहेत ते सभागृहाच्या निदर्शनास आणूनच योग्य तो निर्णय घ्यावा अशी अपेक्षा करतो.

श्री.कंवरसिंग बैनाडे :माझ्या वार्डात सर्वात मोठा ग्रिनबेल्ट आहे. आपण स्वत: व्हिजीट दिलेली आहे. तेथून पायी चालू शकत नाही डासांचे प्रमाण वाढले असून आजूबाजूच्या रहिवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. साफसफाईचे काम त्वरीत व्हावे उद्यान अधिक्षक यांना अनेक वेळा या ठिकाणी भेट देण्याचे कळविले परंतू आलेले नाही व तेथे औषध फवारणीचे काम होत नाही.

श्री.मो.जावेद मो.इसाक :कटकटगेट जवळील खाजा गरीब नवाज नावाचे महानगरपालिकेच्या हॉस्पीटलच्या इमारतीस भेट द्यावी तेथे अंडर ग्राउंड मध्ये लोकांनी घाण

केलेली आहे तेथेच कचरा टाकला जातो मोठया प्रमाणात डास झालेले आहे तेथे फवारणी करण्यात यावी लोकांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे. दवाखान्यात रूग्ण येतात त्यांना डेग्यू होवू शकतो.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :गारखेडा भागात आर बी व्हील्स तसेच रामकृष्णनगर मध्ये दोन लिगल सोसायटीज आहे. पाच ते सहा वर्षापासून बेटरमेंन्ट चार्जेस भरणा करतात त्यांना पाणी देण्याची मागणी केलेली होती का कार्यवाही केलेली नाही.

मा.आयुक्त :एमएसईबीचा दोन दिवसाचा लाईटला खंड आहे त्यामूळे पाणी देवू शकणार नाही.

श्री.प्रल्हाद निमगावकर :मागिल चार पाच वर्षात का कार्यवाही केलेली नाही.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी हे जायकवाडी येथे गेलेले असल्याने ते आज सभागृहात उपस्थित नाही.

श्री.प्रल्हाद निमगावकर :लक्ष्मीनगर पाण्याच्या टाकीजवळील अतिक्रमण काढणार होते आपण सूचना दिली अद्याप काढले नाही. मेहरनगरच्या ओपनस्पेसवर झालेले अतिक्रमणही काढलेले नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :सिडको हडको ही नवीन वसाहत असून महापालिकेकडे हस्तांतरण झालेली आहे. यापूर्वी या भागात अतिक्रमण होत नव्हते आता जास्तीचे होत आहे याकडे लक्ष देण्याची गरज आहे. एखादे विभागाचे अधिकारी उपस्थित नाही म्हणून उत्तर न मिळणे योग्य नाही.

श्री.अनिल जैस्वाल :सात महिण्यापासून वार्डात औषध फवारणीचे काम होत नाही असे असतांना संबंधीत ठेकेदारास बिल कसे अदा करण्यात आले. ज्या अधिकाऱ्यांनी बील देण्याबाबत शिफारस केली त्यांना निलंबीत करावे. व दिलेले बिलाची रक्कम त्यांचे पगारातून वसूल करावी. एका ठिकाणी श्री.शेटे साहेब यांनी व्हिजीट दिली कचरा उचलेला नव्हता आजही तो कचरा तसाच पडून आहे. वार्ड अधिकारी यांना कळविले तर ठेकेदार गुडांगर्दी करीत आहे अशी उत्तरे मिळतात असे होत असेल तर स्वच्छतेचे कामे होणार की नाही.

सौ.रजनी जोशी :सिडको हस्तांतरण केल्यानंतर चांगल्या सोयी सुविधा मिळतील अशी अपेक्षा होती परंतू लोकांना नागरी सुविधा दिल्या जात नाही.

श्री.मिलींद दाभाडे :स्वच्छतेचे खाजगीकरण केल्यानंतर साफसफाई व्यवस्थीत होत नसेल तर ठेका रद्द करावा अशी मी मागणी करतो महापालिकेकडे कर्मचारी कमी असेल तर भरती करावे. जे कर्मचारी मजूर म्हणून काम करतात त्यातील ५० टक्के कर्मचारी घरी बसून आहे. स्वच्छता निरीक्षक यांच्या सांगण्यानूसार एक जवान यांनी एक मजूरांची अनेक दिवसापासून कामावर नसतांना हजेरी दाखवून पगार वाटप केलेले आहे. असे मी स्वत: चौकशी केली असता निदर्शनास आलेले आहे सदर जवान यानी सत्य सांगितले म्हणून त्यांना जवान पदावरून स्वच्छतेचे काम दिले व बदली ही केली परंतू स्वच्छता निरीक्षक व झोन अधिकारी यांना साधी नोटीसही प्रशासनाने दिलेली नाही यात झोन अधिकारी ही सामील आहे. त्यामूळे या अधिकाऱ्यावर निलंबनाची कार्यवाही करावी. जे ३०-३० वर्षापासून लोक काम करतात त्यांचे हातात आजही झाडू असून स्वच्छतेचे काम करून घेतले जाते त्यांचे नंतर सेवेत आलेल्यांना जवान करण्यात आले हे योग्य नाही. स्वच्छता निरीक्षकावर कार्यवाही करावी.

मा.महापौर : उपआयुक्त महसूल यांनी चौकशी करून अहवाल या सभागृहात ठेवावा.

श्री.अनिल जैस्वाल :मी विचारलेल्या प्रश्नाचा खूलासा करण्यात यावा.

उपआयुक्त(सिडको) :मा.आयुक्तांच्या आदेशानूसार मी २३-१०-२००७ रोजी स.सदस्य श्री.जैस्वाल अनिल यांचे वार्डात वार्ड अधिकारी अधिकारी इमारत निरीक्षक मुकारदम यांना सोबत घेवून गेलो होतो व जागेवरचा कचरा त्याच दिवशी उचलण्याबाबत चे आदेश देण्यात आलेले होते.

श्री.मिलींद दाभाडे :साफसफाईचे खाजगीकरण रद्द करावे.

श्री.अनिल जैस्वाल :विकास कामे कमी झाले तरी चालेल,साफसफाई नियमित करावी.

श्री.भगवान घडमोडे :वार्डातील कचरा उचलण्यासाठी स.सदस्यांना आयुक्तांकडे तक्रार करावी लागते त्यानंतर मा.आयुक्तांच्या आदेशानुसार उपआयुक्तांना प्रत्यक्ष जागेवर जावे लागते व नंतर कचरा उचलला जातो हे दुर्दैव आहे. यापूर्वी साफसफाईच्या संदर्भात सिडकोत बैठक झालेली होती काही ही ठोस उपाययोजना झालेली नाही. ठेकेदार राजकारण करतात अधिकाऱ्यांवर दबाव आणून बीले उचलतात हे योग्य नाही.

याच वेळी स्वच्छतेचे खाजगीकरण रद्द करावे म्हणून अनेक स.सदस्य मा.महापौरांकडे मागणी करतात. व व्यासपीठासमोर जमा होतात व अनेक सदस्य एकाचवेळी बोलतात.

श्री.संतोष जेजूरकर :स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता आपण योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.अनिल जैस्वाल :एक महिण्यापासून वार्डात औषध फवारणी न होता ठेकेदाराचे बील कसे देण्यात आले खुलासा करण्यात यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :स्वच्छता होत नाही म्हणून डासांचे प्रमाण वाढलेले आहे त्यामूळे डेग्यूच्या आजाराची पैदास होते व काही लोक घाटी मध्ये ॲडमीट आहे अशी चर्चा चालू आहे. स्वच्छतेचे खाजगीकरण रद्द करणे जनतेच्या हिताचे आहे आपणाकडे यंत्रणा नाही. प्रशासनाला हवे आहे ते समोर येते दोन तीन वर्षापासून आम्ही प्रयत्न करतो की महापालिकेचा कर्मचारी यांना ओळखपत्र, गणवेश बुट इतर साहित्य दिले जाते का जो ठराव होता त्याची अंमलबजावणी झाली का? या बाबतीत कुणी ॲक्शन घेत नाही. अधिकाऱ्यांना प्रमोशन तसेच चार्ज द्यायचा असेल विलंब होतो. निविदा बजेट यामध्ये काही सुधारणा यायला हव्यात. एक सचिंका जर २५ टेबलावर फिरत असेल तर विकास कामे होतील का असा प्रश्न पडतो. ज्यांना चार्ज दिला जातो ते अधिकारी सक्षम नाहीत का? स्वच्छतेचे खाजगीकरण रद्द करावे तसेच कामात सुधारणा होण्यासाठी रिआर्गनाईज करावे नियोजनबध्द करावे. बजेट तयार करण्याचा लेखाधिकारी यांचा सहभाग असावा परंतू निविदा वगैरे काढणे व इतर कामाच्या संचिका लेखा विभागामध्ये जात असेल व अनेक दिवस ते काम प्रलंबीत राहत असेल होत नसेल तर यात सुधारणा झाली पाहिजे.

श्री.सतीष कटकटे : माझ्या माहिती प्रमाणे मजूर म्हणून कार्यरत असलेले १७५ कर्मचारी शिपाई म्हणून इतर वेगवेगळया विभागात काम करतात. वार्ड कार्यालय ड चे खाजगीकरण केले तेथील मजूर कूठे दिलेले आहे,या सर्व कर्मचाऱ्यांना सफाईचे काम दिल्यास ही वेळ येणार नाही.

श्री.विनायक पांडे :स्वच्छतेचे खाजगीकरण केले परंतू त्यावर महापालिका प्रशासनाचा अंकूश नाही. अधिकारी ठेकेदार ऐकत नाही. ज्या ठिकाणचे खाजगीकरण केले त्या ठिकाणी उद्याच मा.महापौर प्रशासनाने व्हिजीट द्यावी पुरेशे कर्मचारी काम करतात की नाही पुरेशा सुविधा देतात की नाही पाहणी करावी स्वच्छता होत नसेल तर रद्द करावे.

श्री.भगवान घडमोडे :पुन्हा खाजगी एजन्सीला मुदतवाढ देत आहोत याचा अर्थ वरीष्ठ अधिकाऱ्यांचे त्या ठेकेदाराना प्रोटेक्शन आहे. निर्णय होणार असेल तर चर्चा करावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :स्वच्छता होत असेल तर कुणालाही द्यावे दुमत नाही. सत्ता आपली आहे ठेकेदार मालकासारखे वागत असतील तर बरोबर नाही. बदनामी होते.

मा.महापौर :ज्या ठिकाणचे खाजगीकरण केले त्या भागातील वार्ड कार्यालयाचे सभापती यांनी पाहणी करून अहवाल द्यावा त्यानंतर निर्णय घेता येईल.

श्री.अनिल जैस्वाल :एप्रिल महिण्यापासून औषध फवारणी होत नाही तरी ही संबंधीत ठेकेदाराचे बील अदा करणे कितपत योग्य आहे.

श्रीमती मेहरून्नीसा खान :सहा महिण्यापासून एका इमारतीच्या खाली कचरा पडलेला आहे. कचरा वाहतूक साठी गाडया नाहीत लेबर नाही खाजगीकरण केले तेही स्वच्छता करीत नाही. दोन कर्मचाऱ्याच्या जागेवर दुसरेच लोक कमी पगारामध्ये काम करतात त्यांचेकडे ओळखपत्र नाही याची सुध्दा चौकशी करावी.

सौ.कला बोरामणीकर :जेथे खाजगीकरण केलेले आहे तेथे थोडीफार ओरड आहे. जेथे महापालिकेचे कर्मचारी काम करतात तेथे स्वच्छता होत नाही त्याच भागात नागरीकांची ओरड आहे. वार्ड कार्यालय ड चे खाजगीकरण केलेले आहे माझ्या वार्डात व्यवस्थीत स्वच्छता होते. एक दुसरे कारण सांगून लेबर कमी केले जाते. दबाव आणला की स्वच्छता व्यवस्थीत होते.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :नागरीकांच्या आरोग्याशी खेळू नये. स्वच्छता झाली पाहिजे एवढीच अपेक्षा आहे.

श्री.अ.रशिद खान :फवारणीचे काम अगोदर करावे नंतर कचराच्या बाबतीत कार्यवाही करावी. कर्मचारी दोन तास फवारणी करतात त्याची सेवा किती तासाची असते तसेच त्यांना पेट्रोल एक लिटर दिले जाते औषधी कमी दिली जाते त्यांचेकडून आठ तास काम का करून घेतले जात नाही. एक महिण्यात एकाच वार्डात फवारणी करतात. एक हप्त्यात एकाच ठिकाणी फवारणी करून कर्मचारी रिकामे होतात. किती तास काम करून घेतले पाहिजे याचा विचार करावा. स्वच्छतेच्या बाबतीत वार्ड सभापती यांना खर्चाचे अधिकार दिले पाहिजे ते बरोबर कर्मचाऱ्याकडून काम करून घेतील. जे ११२४ कर्मचारी भरती केले त्यांचेकडून काम करून घेवू शकतो. ते सध्या शिपाई म्हणून कार्यालयात काम करीत आहे. कॉन्ट्रॅक्ट बेसेसवर कमी वेतनावर महापालिकेने कर्मचारी घेवून स्वच्छता करण्यात यावी खाजगीकरण रद्द करावे.

श्री.देसरडा प्रशांत :माझ्या वार्डात ५० टक्के खाजगी पध्दतीने तसेच ५० टक्के महापालिकेच्या वतीने स्वच्छता होते. वाद सिडको आणि शहर म्हणून मुळीच नाही. जी काही खाजगी पध्दतीने स्वच्छता होते त्यात ठराविक पाच ते सहा एजन्सीज असून रिंग पध्दतीने या सर्व एजन्सीज काम घेतात. जशी खाजगी एजन्सी आहे तसेच खजगी मजूर सुध्दा ठरलेले आहे. ते सुध्दा ठराविक आहे ते खाजगी तत्वावर सफाईचे काम करण्यासाठी जातात. सिडको भागात एका मजूराने ठेकेदारावर ॲट्रॉसिटी दाखल केले. यावरून स्पष्ट होते की अधिकारी तसेच एजन्सी व काम करायचे मजुर ठरलेले आहे. आताच माजी महापौर श्री.अ.रशिद खान यांनी जी सुचना मांडली की कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने मजूर घेता येईल का, त्यांचेवर महापालिकेचे कन्ट्रोल राहील. काही ठेकेदार मजूरांनी त्यांचे कामाचा मोबदला मागविला तर मारहाण केली जाते.

शासनाच्या नॉर्मनुसार त्या मजुरांना पगार दिला जात नाही त्यामूळे तो मजूर काम करीत नाही. ३८ टक्के टॅक्स खाजगी एजन्सी मुळे जातो विनंती की ज्या पध्दतीने कामाच्या निविदा आपण या राज्याच्या लेव्हलवर छापतो चांगले काम करणाऱ्या एजन्सीज या शहरात आणता येतील का? ज्या एजन्सीला काम दिले ते ठेकेदार अधिकाऱ्यांचे काहीच ऐकूण घेत नाही. अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल होतात.

श्री.काशिनाथ कोकाटे :काही भागात महापालिकेच्या वतीने स्वच्छतेचे तर काही खाजगी एजन्सीच्या माध्यमातून करण्यात येते. ११२४ सफाई कामगांराना कायम स्वरूपी करण्याचे ठरविले शासनाने पदास मंजुरीही दिलेली व भरती करतांना भ्रष्टाचार समोर आले. या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केल्यानंतर चांगले काम करतील शहर स्वच्छ राहील आरोग्य धोक्यात येणार नाही ही अपेक्षा ठेवून या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केले. सिडकोचे हस्तांतरण झाल्यानंतर या मजुरांची आवश्यकता लागणार आहे म्हणून नमुद केलेले होते. परंतु पदांना मंजुरी घेतली, झालेला भ्रष्टाचार ही सामावून घेतला आहे त्या परीस्थितीत त्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीवर घेण्यात आले. हस्तातंरण झाले त्या कर्मचाऱ्यांकडून काम करून घ्यायला पाहिजे होते परंतू शहराचा वाढता व्याप आहे काही दिवसासाठी तरी खाजगी एजन्सीकडून काही प्रमाणात स्वच्छता करून घ्यावी लागेल. नंतर कर्मचारी देवून स्वच्छतेच्या बाबतीत व्यवस्था करून असे प्रशासनाने म्हटले होते.११२४ तसेच जकात खाजगी करणातून १६० कर्मचारी आले. हस्तांतरण झाले, खाजगीकरण होवून सुध्दा दोन वर्षाचा कालावधी गेला. वर्ष सहा महिण्यात ही उपाययोजना करायला पाहिजे होती. जी भरती केली ते कर्मचारी कूठे दिले आजही महसूल अपेक्षे प्रमाणे वसूली नाही. जकातीच्या पैशावर सर्व कामकाज चालू आहे झोन कार्यालयातील कर्मचाऱ्यांना जेवढा पगार दिला जातो तेवढे सुध्दा वसूली झालेले नाही अशी परीस्थिती आहे दुसरी कडे सिडको हडको भागात जो मालमत्ता कर लावण्याचा ५ रू स्क्वे मीटर प्रमाणे सर्वसाधारण सभेने निर्णय घेतला परंतू आजही ६.५० रू. प्रमाणे नोटीसेस नागरीकांना येत आहे. सिडकोचा टॅक्स २रू स्क्वे.मी. प्रमाणे होता. सिडको वासीयांना हस्तांतरणापूर्वी ज्या सुविधा मिळत होत्या त्या आता मिळत नाही. सर्व भागासाठी एकच नियम पाहिजे. खाजगीकरण करायचे असेल तर सर्वच करावे नसता जे कर्मचारी काम करतात त्यांना कायम करण्यासाठी पून्हा शासनाकडे मंजूरीची मागणी करावी. जेणे करून त्या कर्मचाऱ्यांना रोजगार ही मिळेल जे पैसे काढणाऱ्या मंडळीला हात घालता येणार नाही. जे साफसफाई करतात त्यांचे हातात मोजे तसेच पायात बुट किवा गणवेशावर दिसत नाही. सिडको हडको भागात अनेक वाईन शॉप असून अशा परीस्थितीत कर्मचाऱ्यांना काम करावे लागते. कृती आराखडा तयार करा. भ्रष्टाचार नष्ट करा,

श्री.कैलास गायकवाड :स्वच्छतेचे खाजगीकरणाचा जेंव्हा विषय आला त्यावेळी मी विरोध केलेला होता. दलीत गोरगरीब लोकांना भविष्यात नोकरी मिळेल ती मिळू नये यामूळे खाजगीकरण करण्याचा डाव होता. रद्द करण्यात यावे.

श्री.संतोष खेंडके :महापालिकेचे कर्मचारी हे रस्त्याच्या दर्शनी भागातच साफसफाईचे काम करतात. आतील गल्ल्यामध्ये जात नाही गरीबाच्या वसाहतीत साफसफाई

होत नाही. त्यामूळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू शकते. ज्यांची चूक असेल त्यांना शिक्षा झालीच पाहिजे.

श्री.निसार खान :शरीफ कॉलनी मध्ये महानगरपालिकेची शाळा असून ठेकेदाराने टेबल खुर्ची व आसन पटटी व इतर साहित्य न देता बील उचलले एक ५० हजार तसेच एक १.५० लक्ष भ्रष्टाचार झालेला आहे. या संदर्भात आपण मा.आयुक्त यांना चौकशी करण्याचे रूलींग दिले होते. त्या बाबतीत चौकशी झालेली आहे का इंशा ट्रेडर्स यांनी बिल उचलले आहे. सामान पोहोचले नाही. याचा खूलासा करावा.

श्री.संजय जगताप :महापालिकेने साफसफाईचे काम खाजगी एजन्सीला दिलेले असून माझ्या वार्डातील १०० ते १५० लोक त्या एजन्सीकडे कामासाठी जातात त्यांना ६०रू. हजेरी प्रमाणे पेमेंन्ट दिले जाते व १००रू. हजेरी देत असल्याची सही घेतली जाते सदर लोक सकाळी ६.०० पासून काम करतात. या एजन्सीकडून साफसफाईचे चांगले काम होत नाही म्हणून सदर टेंडर रद्द करावे. तसेच दसऱ्याच्या दिवशी बौध्द लेणीवर अनेक लोक येतात या वर्षी तेथे लाईटची व्यवस्था करण्यात आलेली नाही लाईटचा ठेका पण खाजगी एजन्सीला दिलेला असून तोही रद्य करण्यात यावा तसेच पाणीपुरवठा विभागात राजीव संधा नावाचे कर्मचारी काम करतात ते स्वतः ठेकेदारी करून त्यांचे नावाने महापालिकेकडून बिल घेतात याची पण चौकशी करावी.

मा.महापौर :उपआयुक्त (म.)यांनी या संदर्भात चौकशी करून सभागृहाला अहवाल सादर करावा.

श्री.कचरू मोरे :खाजगी ठेकेदानांनी कामगारांना ११९रू. दैनिक वेतनाप्रमाणे आपण देतो ठेकेदार त्या कामगारास ६०रू.देतात महापालिकेच तात्पुरत्या स्वरूपाची भरती करावी कामाची आवश्यकता विचारात घेता मजुरांची संख्या वाढवावी ११९ रूपयात महापालिकेला दोन मजूर मिळतात. त्या मजूरीची उपजिवीका चालू शकते तसेच शहरात स्वच्छता राहील त्यामूळे प्रशासनाने नोंद घ्यावी की यापूढे कोणतेही खाजगीकरण करू नये.

श्री.सय्यद खुसरो : या विषयावर बरीच चर्चा झालेली असून स्वच्छतेचा खाजगी ठेका रद्द करण्यात यावा. व विषय पत्रिका घ्यावी.

सौ.शोभा मिटकर :महिला व बाल कल्याण समितीच्या निधीतून ११ तारखेला सायकल वाटप करणार होते लोक याबद्दल विचारणा करतात.

सौ.पार्वतीबाई वाघमारे :सायकल वाटप करण्याच्या कार्यक्रमाची जी तारीख व वेळ आपल्याकडून सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांनी घेतली, मी महिला व बाल कल्याण समितीची सभापती असतांना देखील संबधीत अधिकारी यांनी मला साधी विचारणाही केलेली नाही महिला व बालकल्याण समिती नावाला आहे का? याचे कारण काय?

मा.महापौर :तारीख जेंव्हा दिली आपणांला विचारणा केली नाही जेव्हा कळले ती रद्द केली.

श्री.देसरडा प्रशांत :महिला व बाल कल्याण समितीच्या स.सदस्य अध्यक्षा आहे कार्यक्रम रद्द केला असे म्हणून चालणार नाही का रद्द केला याचे ठोस कारण सभागृहात व्हावे. याला गंभीरतेने घेण्यात यावे.

सौ.पार्वतीबाई वाघमारे :मला न विचारणा करता कार्यक्रम ठेवला म्हणून ती तारीख रद्द केली सायकल वाटपाची कार्यक्रम पत्रिका मला घरी आणून दिली नाही

कार्यालयात ४.०० वाजता कोणत्या कर्मचाऱ्याकडे ठेवलेली होती संबधीत अधिकारी यांना विचारणा करावी.

श्री.प्रशांत देसरडा :लोकप्रतिनिधीचा अपमान आहे योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

सौ.पार्वतीबाई वाघमारे : यापूर्वी ही एका कार्यक्रमात मा.महापौरांना बोलविले मा.महापौरांनी मला बोलवून घेतले परंतू अधिकारी यांनी कळविले नव्हते हे योग्य नसून असे अधिकारी नको.

श्री.मिलींद दाभाडे :मा.सभापतीचा अवमान करणाऱ्या अधिकाऱ्यावर कडक कार्यवाही झाली पाहिजे.

श्री.सलीम खान :अधिकारी यांनी सभापतीचा अपमान केलेला आहे अशा अधिकाऱ्यांना निलंबीत करावे.

श्री.प्रशांत देसरडा : अधिकाऱ्यांची चूक झाली खुलासा काय करणार आहे कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

श्री.अ.रशिद खान :कार्यक्रमाची तारीख वेळ आपल्या सुचनेनुसार दिलेली होती सभागृहात खूलासा व्हावा.

मा.महापौर :सायकल वाटपा बरोबरच गुणवंताचा सत्कार करण्याचा सुध्दा कार्यक्रम घेणार होतो सायकल वाटपाबध्दल अगोदरच प्रश्न निर्माण झाल्यानंतर सभापतीना विचारून कार्यक्रम घेतलेला नाही म्हणून सदर कार्यक्रम त्वरीत स्थगित केलेला होता. यापुर्वी डॉ.काचोळे यांच्या कार्यक्रमात त्यांना बोलावले नाही. कुठलाही कार्यक्रम घेत असतांना त्या-त्या विषय समितीच्या सभापतीना विश्वासात घेवून तारीख घेतली पाहिजे.

श्री.मिलींद दाभाडे :औरंगाबाद शहरातील दलित बहुजन समाजाच्या तरूणांनी कायमस्वरूपी काम मिळण्यापासून वंचित रहावे म्हणून जो प्रशासनाने कुटीर डाव केलेला आहे त्या संबधीत अधिकाऱ्यावर तात्काळ कार्यवाही झाली पाहिजे.

मा.महापौर :महिला बाल कल्याण विभाग कक्ष प्रमुख यांनी खूलासा करावा.

महिला व बा.क.प्रमुख :महिला व बाल कल्याण समितीच्या माध्यमातून गेल्या सहा महिण्यापासून सायकल खरेदी केलेल्या होत्या त्या वाटप करण्याचा निर्णय घेणे अत्यावश्यक होते.त्यामूळे मा.महापौर यांचेच दालनात मा.महापौर व मा.आयुक्त यांचेशी चर्चा करून तारीख देण्या बाबत विनंती केलेली होती त्यानूसार १ तारीख दिलेली होती त्या तारखेचा कार्यक्रम आदल्या दिवशीच रद्य झाल्यामूळे कुणालाही निरोप देण्यात आलेला नव्हता. हा कार्यक्रम एक दिवस अगोदरच ठरला होता त्यावेळेस मा.सभापती महिला व बाल कल्याण यांना माझे क्लर्क याचे मोबाईवरून तीन वेळेस फोन केलेला होता. परंतू संपर्क होवू शकला नाही.म्हणून त्यांचे विभागातील क.लिपीक यांना बोलवून ही माहिती दिली होती. मा.सभापती यांचा अपमान करण्याचा माझा हेतू नव्हता.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :मा.सभापती यांचे दालनात जावून पत्रिका देणे आवश्यक होते.

मा.महापौर :सभापती दालनात नसल्यामूळे त्यांचे पी.ए कडे पत्रिका दिलेली होती.

सौ.पार्वती वाघमारे :मी कार्यालयात हजर नसेल तरी मला घरी पत्रिका पाठवायला पाहिजे होती का दिलेली नाही.

मा.महापौर :कोणताही कार्यक्रम घेतांना त्या त्या समितीच्या सभापतीना विश्वासात घेतल्याशिवाय करू नये अशा सूचना देण्यात येत आहे.

मा.उपमहापौर महिला बाल कल्याण विभाग हा स्वतंत्र विभाग आहे त्या खुर्चीवर जे ही कूणी पदाधिकारी असेल त्यांचा मान त्यांना दयायलाच पाहिजे त्याची भेट झाली नाही त्यांचे क्लर्क कडे दिले असे उत्तर देणे बरोबर नाही. घरी जावून पत्रिका दयायला पाहिजे होती.जी चुक झाली असेल त्या अधिकाऱ्यांनी दिलगिरी व्यक्त करून यापूढे अशी चूक होवू देवू नये.अशी आपण समज द्यावी.

मा.आयुक्त :महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने सायकल वाटपाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता ब-याच दिवसापासून सायकल आलेल्या होत्या त्यामूळे मा. महापौर यांना त्यांनी सायकल वाटपाची तारीख दयावी म्हणून विनंती केली होती. तारीख निश्चित झाल्यानंतर जर कोणत्याही कारणामूळे मा.सभापती महिला व बाल कल्याण यांचे भावना दुखावल्या असेल तर प्रशासनातर्फे दिलगिरी व्यक्त करतो. आता पूढील सात आठ दिवसात जे लाभार्थी आहे त्यांना सायकल मिळतील या दृष्टीने संबधीत अधिकारी यांनी मा.सभापती यांचेकडून तारीख घेवून कार्यवाही करावी यापूढे सर्व अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येते की ज्या मा.सभापतीच्या संबधी किंवा ज्या त्या वार्डातील कार्यक्रम असेल त्या वार्डाच्या सदस्यांना माहिती होणे आवश्यक आहे याची दखल घ्यावी. पीआरओ यांना असे देण्यात येते की ज्या प्रमाणे फायरचे एसएमएस येतात बाहेर कॉल असेल त्या प्रमाणे कोणताही प्रोग्राम असेल सर्व सदस्यांना एसएमएसने माहिती व्हायला पाहिजे.

श्री.संजय सिरसाट :ऐतिहासीक रंगीन दरवाना येथ्रील वाहतूक बेटास स्वामी रामानंद तिर्थ यांचा पुतळा बसविणार आहे मा.चंद्रकांतजी खैरे यांचे हस्ते कार्यक्रम होणार आहे त्यांचे नावापूढे आमदार केलेले आहे जी चुक झाली ती दुरूस्ती करावी.

मा.महापौर :दुरूस्ती करण्यात येते.

श्री.रविकांत गवळी :एका वार्डात तीन सायकचे वाटप करणार आहे बीपीएल साठी दोन व इतरासाठी एक देणार अशी माहिती मिळाली या पूर्वी सभागृहात चर्चा झाली होती की बीपीएलची नाव नोंदणी व पुर्ण प्रोसेस न झाल्यामूळे स.सदस्य ज्या लाभार्थींचा फॉर्म सबमिट करेल त्यांना सायकल देण्यात यावी.

मा.आयुक्त :शासनाचे सर्वसाधारण नियम असे आहे की कोणत्याही वस्तुचे वाटप करतांना जनरली बीपीएलला देण्यात यावे. जी यादी सध्या अस्तित्वात आहे त्यामधून फारसे नगरसेवक असे आहे की तीनही बीपीएलचे लाभार्थी नाव सुचविलेले आहे. विनंती सर्व सदस्यांनी बीपीएलचे नाव सूचवावे जर तीन नावे मिळत नसेल तर किमान दोन तरी बीपीएल धारक असावेत व एक इतर मधून नाव द्यावे अशी विनंती आहे.

श्री.मिलींद दाभाडे :दलित समाजाच्या लोकांना कायम नोकरी पासून वंचीत ठेवण्याच्या दृष्टीने प्रशासनाने कुटीर डाव करून जो खाजगीकरणाचा प्रस्ताव मजूर करून घेतला व मोठमोठे स्वप्न या शहरातील नागरीकांना दाखवले मी त्या ठरावाचा निषेध करतो.खाजगीकरण रद्य करण्यात यावे.

मा.महापौर :स्वच्छतेचे खाजगीकरण रद्य करावे म्हणून सभागृहाची मागणी आहे परंतू एक स्ट्रोक मध्ये असा निर्णय घेता येणार नाही प्रोसेसनूसार करावे लागेले त्यासाठी एक कमेटी स्थापन करून त्यात स.सदस्य श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर हे कमेटीचे अध्यक्ष राहतील त्यांना सहाय्यक म्हणून स. सदस्य श्री.भगवान घडमोडे राहतील त्या त्या भागातील नगरसेवक व वार्ड कमेटीचे अध्यक्ष यानी पाहणी करावी सिडको साठी उपमहापौर सौ.लता दलाल राहतील

त्यात स.स.श्री.अब्दुल रशिद खान तसेच त्या त्या वार्डाचे स. सदस्य व वार्ड कमेटीचे अध्यक्ष हे पाहणी करतील व तीन महिण्यात अहवाल देतील. एक एप्रिल पासून कुठल्याही परीस्थितीत स्वच्छतेचे खाजगीकरण राहणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :वार्ड क्र८५ लक्ष्मीनगर भागात महापालिकेच्या जागेवर १० ते १५ घरे आठ ते दहा वर्षापासून अनधिकृत आहेत. पूर्वी ते पदमपूरा रस्त्यावर होते त्यांना येथे् शिप्ट केले होते. लेखी काहीच दिलेले नव्हते परतु ती जागा आता केंव्हा रिकामी करून घेणार आहे.

प्र.प्रशासकीय अधि. :या बाबत कार्यवाही करण्यासाठी श्री. सुरासे यांना आठ दिवसापूर्वी पाठविले होते परंतू कोणतीही तक्रार नाही म्हणून ते परत आले उदया सकाळी स.सदस्या व मी बरोबर पाहणी करण्यात येईल कायदेशीर नसेल तर काढण्याची कार्यवाही होईल.

मा.महापौर :उदया सकाळी ९.३० ते १० वाजेच्या दरम्यान अधिकारी यांनी जावून सदस्या बरोबर पाहणी करावी व अतिक्रमण असेल तर काढण्याची कार्यवाही करावी.

श्री.प्रल्हाद निमगावकर :मेहननगर भागात महापालिकेची जागा असून संरक्षित भिंत पण आहे परंतू एक व्यक्तीनी ती जागा माझ्या मालकीची असल्याचा दावा केला कोर्ट प्रकरण झाले महापालिकेच्या विरूध्द निकाल लागलेला आहे. यापूढे काय कार्यवाही केली माहिती दयावी.

मा.महापौर : नगररचना विभगाचे श्री. पवार यांनी याचा खुलासा करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सहा.संचालक नगररचना, यांनी खुलासा करावा ते सभेला नेहमीच अनुपस्थित असतात आयुक्तांकडून खुलासा घ्यावा सभेला का नसतात.

मा.आयुक्त :हे पद नगररचना विभागाचे आहे महापालिकेच्या नाही मी संचालक नगर रचना यांना कळवतो की, अतिरीक्त पदभार आहे, सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेला हजर नाहीत. कायमस्वरूपी या पदावर अधिकारी द्यावे किंवा जे प्रभारी म्हणून काम करतात त्यांना पुर्ण वेळ काम करण्याची परवानगी द्यावी.

मा.महापौर :सहा.संचालक नगररचना यांचेकडे या पदावरील अधिकारी पुर्णवेळ काम करील अशी मागणी करावी किंवा कायमस्वरूपी अधिकारी मागविण्यात यावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :जे प्रस्ताव तयार करतात त्यांना का चार्ज दिला जात नाही.

मा.महापौर :१ महिना प्रयत्न करू अधिकारी दिले नाही तर महापालिकेच्या अधिकाऱ्यांना चार्ज देवू.

अ.साजेद अ.सत्तार : सभेत ६४ प्रस्ताव कसे आले.

मा.आयुक्त :मागणी करण्यात येईल अधिकारी दिले नाही तर संबधीत विभागाची मान्यता घेवून चार्ज देता येईल.

श्री.अनिल जैस्वाल : सिडको हडको भागात रस्त्यावर मोठमोठे खड्डे झालेले आहे पॅचवर्क करण्यात यावे.

मा.महापौर :प्रशासनाने याची नोंद घेवून त्वरीत कार्यवाही करावी.

श्री.सलीम खॉन :प्रभाग समितीचे सभापती यांना अधिकार द्यावे विकास कामे करता येतील.

सौ.कला बोरामणीकर :प्रभाग अधिकारी यांना अधिकार देण्यात यावे.

मा.आयुक्त :राज्य शासनाने १९९४ मध्ये बीपीएमसी ॲक्ट मध्ये बदल करून प्रभाग समिती रचना करण्याचे आदेशीत केलेले होते. ॲक्ट मध्ये हे कलम २९ अ आहे. यात प्रभाग समितीची रचना कशी होईल व कोणते अधिकार राहतील

एक वर्कशॉप घेवून तेथे सर्व वार्ड कार्यालयाचे सभापती तसेच विशेष समितीचे सभापती प्रशासन मिळून तज्ञ ॲडव्होकेट यांना बोलवून चर्चा करून किती अधिकार देवू शकतो या विषयी चर्चा करून निर्णय घेवू शकतो. प्रभाग समितीला बळकट करण्यासाठी काही अधिकार डिलिगेट केले पाहिजे जे प्रशासकीय अधिकार आहे ते बरेचशे डिलीगेट केलेले आहे.

श्री.गजानन बारवाल :सभापती यांना कॅबीन दिलेली आहे कोणतेही अधिकार दिलेले नाही सद्यस्थितीत प्रभाग समितीच्या बैठकीला कुणीही अधिकारी उपस्थित नसतात सदस्यांच्या सूचनाची दखल घेतली जात नाही कोणतेही काम होत नाही.

मा.महापौर :प्रभाग समितीचे जे आजी माजी सभापती असतील त्यांनी इतर महापालिकेत कसे काम चालते भेटी दिलेल्या आहेत तेथील अनुभव सांगावा इतर महापालिकेस प्रभाग समितीला व विषय समितीला काय अधिकार आहे सचिव याची माहिती घेतील. व जेंव्हा वर्क शॉप किंवा कार्यशाळा घेणार त्यावेळी निर्णय घेतला जाईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :प्रभाग समितीला ५ लक्ष पर्यंतचे निविदा प्रक्रियेपर्यतचे सर्व अधिकार दिले तर खऱ्या अर्थाने कामाचे विकेंद्रीकरण होईल. तसा ठराव या सभागृहाने घ्यावा. शासनाची मंजूरीची आवश्यकता वाटत असेल तर पाठवावे अशा पध्दतीने कार्यवाही केली तरच विकासाच्या कामांना गती येईल. समितीच्या बैठकीला किमान सर्व विभागाचे उपअभियंता उपस्थित राहतील तसे आदेशीत करावे.

श्री.गजानन बारवाल :अधिकार आहे परंतू पारीत करीत नाही. नगरसेवक स्वेच्छानिधीतून होणारी कामे ही प्रभाग समितीच्या माध्यमातून झाली पाहिजे.

मा.आयुक्त : ज्यावेळी एकत्रित बसून चर्चा करू बैठकीला तज्ञ ॲडव्होकेट यांना बोलवून त्यांचे मत घेतले जाईल. त्यात लिगलीटी तपासावी लागेल त्यावेळी ठराव घेण्याची वेळ पडली तर सर्वसाधारण सभेत ठराव ठेवून आपण निर्णय घ्यावा.

**<u>विषय क्र.११७६/१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२ सुरेवाडी वसाहती अंतर्गत १००,१५०,२०० मि.मी. व्यासाच्या ए.सी.जलवाहीन्या आहेत. या भागामध्ये काळी माती असल्यामूळे ए.सी.जलवाहीन्या वारंवार फुटत आहेत. सदरील भाग हा गुंठेवारी अंतर्गत येतो. या भागातील ए.सी. जलवाहीन्या ऐवजी १००,१५०,२५०,३०० मि.मी.व्यासाची डी.आय.के.बदलण्याचे प्रस्तावित आहे.

जलवाहीन्या टाकण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसूची सन २००६-०७ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रूपये २३,६८,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामावर होणारा खर्च सन २००७-०८ मधील अर्थसंकल्पात भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षकात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु २१४ अ.क्र.३ वर ९.०० लाखाची नावासह तरतूद आहे, तसेच वार्ड क्र.२ मध्ये इतर दोन कामाची मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.९३२ दिनांक १७.०७.२००७ वळती केलेली तरतूद रूपये २३.०० असे एकूण ३२.०० लाखातून करण्यात येणार आहे.

तरी वार्ड क्र.२ सुरेवाडी या ठिकाणी जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रूपये २३,६८,०००/- चे मान्यतेबाबत तथा विचारार्थ् सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संतोष खेंडके : प्रभाग क्र.९३,६८ मध्ये या प्रमाणेच अनेक भाग गुंठेवारीत येतात. शहरातील ११७ अनधिकृत वसाहती आहेत. गुंठेवारीत येतात त्याही ठिकाणी विकास कामे करावी. अधिकाऱ्यांकडून उत्तर दिले जाते गुंठेवारीत केले जात नाही.

मा.महापौर :ज्या प्रकारे हा प्रस्ताव आणला इतर वार्डातही असे प्रस्ताव आणून मंजुरी देता येईल हा प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२ सुरेवाडी वसाहती अंतर्गत १००,१५०,२५०,३०० मि.मी.व्यासाची डी.आय.के.जलवाहीनी टाकणेच्या कामाचे र.रू.२३,६८,०००/-चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११७७/२ :**

प्रभाग क्र.६३ कोकणवाडी,क्रांतीनगरच्या स.स.श्रीमती मंगला प्रकाश गायकवाड यांनी त्यांचे स्वेच्छानिधीतून क्रांतीचौक रेल्वेस्टेशन या मुख्य रस्त्यावरील स्नेहनगर या शासकीय निवासस्थानाच्या वसाहतीस लागून क्रांतीनगरकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर कमान बांधणे प्रस्तावित केले आहे. सदर कामाकरीता अंदाजे खर्च रक्कम रू.२.० लक्ष अपेक्षित आहे. या कामाकरीता रहदारीच्या संदर्भाने पोलिस निरिक्षक वाहतूक शाखा यांचे नाहरकत पत्र प्राप्त आहे.

सदर काम सन २००७-२००८ च्या स्वेच्छानिधीतून करणे प्रस्तावित असून स्वेच्छानिधी नियमावली नुसार नगरसेवक स्वेच्छानिधीतून करावयाच्या कामामध्ये या बाबत स्पष्टता नाही. करिता सदर कामाबाबतचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयासाठी म्हणून मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी :हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही परंतू इतर सदस्यांना त्यांचे वार्डात स्वेच्छानिधीतून अशाच कमानी करायच्या आहे पॉलीसी निर्णय घेवून यानंतर जे ठराव येतील त्यास मान्यता दयावी.

मा.आयुक्त :या ठरावात त्यांचे स्वेच्छानिधीतून कमान बांधण्याचे प्रस्तावित आहे.शासनानं स्वेच्छानिधीतून ऑलरेडी कोणकोणती कामे करता येतात कोणती करता येत नाही याची यादी केलेली आहे त्यात हे काम येत नाही. मंजूरी दिली तर शासनाकडे पाठविता येईल व शासनाने मान्य केले तर हे काम करता येईल.

मा.महापौर :शासनाच्या नियमावलीनूसार स्वेच्छानिधीतून कमान बांधता येत नाही. या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते परंतू हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.६३ कोकणवाडी,क्रांतीनगरच्या स.स.श्रीमती मंगला प्रकाश गायकवाड यांच्या स्वेच्छानिधीतून क्रांतीचौक रेल्वेस्टेशन या मुख्य रस्त्यावरील स्नेहनगर या शासकीय निवासस्थानाच्या वसाहतीस लागून क्रांतीनगरकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर प्रस्तावित केलेल्या कमान बांधणेच्या कामाचे रक्कम रू.२.० लक्ष खर्चास मान्यता देण्यांत येते. तथापी शासनाच्या नियमावलीनूसार स्वेच्छानिधीतून कमान बांधता येत नसल्यामूळे हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११७८/३ :**

आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, केंद्र शासनाचे ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्ज) नियम-२००१ चे कलम (४) अन्वये संनियंत्रण समिती स्थापन करण्यात येवून या समितीने महानगरपालिका हद्दीतील भटक्या श्वानांना पकडणे, त्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करून त्यांचे पुनर्वसन करणे व ईतर अनुषंगिक कामांवर देखरेख करण्याचे काम

पाहतील. संनियंत्रण समितीवर व्यक्तींची निवड हे समितीचे अध्यक्ष करतील. समितीमध्ये खालील व्यक्तींचा समावेश राहिल.

| | | |
|---|---|---|
| अ. | आयुक्त महानगरपालिका | अध्यक्ष |
| ब. | महानगरपालिका आरोग्य विभागाचे प्रतिनिधी | सदस्य |
| क. | महानगरपालिका पशुसंवर्धन विभागाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ड. | पदवीधर पशुवैद्यक | सदस्य |
| इ. | जिल्हा एस.पी.सी.ए. चे प्रतिनिधी | सदस्य |
| फ. | म.न.पा. हद्यीतील प्राणी मित्र संघटनेचे (२) प्रतिनिधी | सदस्य |

वरिल दर्शविलेले प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संतोष जेजूरकर :यात आरोग्य सभापती हे सदस्य म्हणून असावेत.

मा.महापौर :दुरूस्ती सह मंजूरी देण्यात येते.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :जी समिती केली त्यांनाही बंधनकारक आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासनाचे ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्ज) नियम-२००१ चे कलम (४) अन्वये संनियंत्रण समिती स्थापन करण्यात येवून या समितीने महानगरपालिका हद्दीतील भटक्या श्वानांना पकडणे, त्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे, लसीकरण करून त्यांचे पुनर्वसन करणे व ईतर अनुषंगिक कामांवर देखरेख करण्याचे काम पाहतील. संनियंत्रण समितीवर व्यक्तींची निवड हे समितीचे अध्यक्ष करतील. समितीमध्ये खालील व्यक्तींचा समावेश राहिल.

| | | |
|---|---|---|
| अ. | आयुक्त महानगरपालिका | अध्यक्ष |
| ब. | महानगरपालिका आरोग्य विभागाचे प्रतिनिधी | सदस्य |
| क. | महानगरपालिका पशुसंवर्धन विभागाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ड. | पदवीधर पशुवैद्यक | सदस्य |
| इ. | जिल्हा एस.पी.सी.ए. चे प्रतिनिधी | सदस्य |
| फ. | म.न.पा. हद्यीतील प्राणी मित्र संघटनेचे (२) प्रतिनिधी | सदस्य |

तसेच या समितीमध्ये आरोग्य सभापती हे सदस्य म्हणून असावेत या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.११७९/ ४ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मुथीयान कॉर्नर ते चौसरनगर मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००४-२००५ च्या दरसूचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचा अंदाजीत खर्च रू.३९,९९,८६०/- एवढा आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात १५ मी. रूंद विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करण्याचा समावेश आहे. या अंतर्गत ९०० मी. लांब व ७ मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे नियोजन आहे. यापूर्वी या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम २००१ मध्ये करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामात रस्त्याचे मजबुतीकरण करण्यासाठी तरतूद उपलब्ध करण्यात आलेली आहे.

या कामाच्या रू.३९,९९,८६०/- खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी :४० लक्षचा विषय आलेला आहे ५० लक्षच्या वर एका वार्डात काम करीत नाही यानंतर १० लक्षचेच काम होणार आहे का ?

मा.महापौर :वार्डातील म्हणून काम नाही रस्त्याचे मोठे काम आहे मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुथीयान कॉर्नर ते चौसरनगर मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे र.रू.३९,९९,८६०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११८०/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत येथील दूरध्वनी देयकावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रिंटर बसविणे व यंत्रणा अद्यावत करण्याकरीता रक्कम रू.१०.०० लक्षची तरतूद होणे आवश्यक आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे अर्थसंकल्पातील लेखा शिर्षकातून तरतूद वळती करणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पान क्र. | अर्थसंकल्प २००७-०८ लेखशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ०१ | एम.५८<br>अ.क्र.१ | अग्निशमन साहित्य व टँकर खरेदी (तरतूद रक्कम रू.१.०० कोटी) | मनपा मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये नविन अद्यावत व वाढीव क्षमतेची दूरध्वनी यंत्रणा बसविणे १०.०० लक्ष |

उपरोक्त प्रमाणे तरतूद वळती करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा :अग्निशमक विभागाची सेवा ही अत्यावश्यक सेवा आहे. एखाद्या ठिकाणी आग लागल्यास साहित्य नाही अग्निशमन दलामध्ये गाडया कमी आहे अशी कारणे दाखवली जातात साहित्य खरेदीचे टेंडर ऑलरेडी झालेले आहे चार महिण्यापासून निविदा काढलेल्याच नाही. संबधीत अधिकारी मा.आयुक्त तसेच त्यावेळचे विभाग प्रमुख याचा युगो पॉईन्ट मूळे ते डिसमूड झालेले आहे अशी माहिती आहे. आवश्यकता आसेल तर का साहित्य खरेदी केले जात नाही.

श्री.संतोष खेंडके : तक्रार घेवून गेल्यावर मला अधिकार नाही असे श्री.झनझन सांगतात.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : जे अधिकारी कार्यक्षम आहे त्यांना विभाग प्रमूख करण्यास हरकत नाही.

श्री.संजय जोशी : श्री.झनझन यांना विभाग प्रमुख करावे.

मा.महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेता अग्निशमकचे अधिकारी श्री.झनझन यांना उद्यापासून किंवा त्यानंतर विभाग प्रमूख करण्यात यावे त्यांनी सुध्दा चांगले काम करावे.

अग्निशमन अधिकारी :अग्निशमन दलाचे टेंडर आलेले होते सॅम्पलच्या टेस्टीग झालेल्या आहे.टेक्नीकल जो फायनल स्टेप आहे ते टेंडर उघडलेले नाही. माझा अहवाल मी टेस्टींग करून कार्यकारी अभियंता यांचेकडे पाठविलेला आहे.

श्री.प्रशांत देसरडा :अग्निशमन विभागाचे कामाचे तीन तीन महिणे टेंडर येवू होत असेल व ते काढले जात नसेल तर या मागचे गुढ काय याचा खूलासा करावा. अधिकाऱ्यामधील इगो पॉईन्टमूळे शहरात आग लागलीतर लोकांना बळी जाईल.

अग्निशमन अधिकारी :रिटेंडर झालेले होते सॅम्पल माझ्याकडे आले त्यानंतर मी तपासणी करून अहवाल वरीष्ठांना दिलेला आहे. ते ओपन करणार होते.

श्री.अ.रशीद खान : चर्चेद्वारे आपण जे प्रमोशनच्या बाबतीत बोलले हे नियमानूसार करता येते का आपण दबावाखली येवून आयुक्तांना सूचना करीत आहे. स.सदस्यांचे प्रत्र घेवून तसा ठराव करावा त्याद्वारे निर्णय घ्यावा. नसता चर्चेद्वारे निर्णय

घेतल्यास कूणी न्यायालयात धाव घेईल सभागृहाला दोषी ठरवले जाईल याची दखल घ्यावी. मा.आयुक्तांचे अधिकार आहे.

मा.महापौर :प्रमोशन देत नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :अग्निशमक प्रमुख म्हणून श्री.झनझन यांनी महापालिकेत अनेक दिवसापासून काम करीत आहे.त्यामूळे त्यांना पदोन्नतीसह व पदनामासह नियुक्ती करावी तसेच त्यांना ज्या काही सवलती विभागप्रमुख म्हणून असतील त्या देण्यात याव्यात.

श्री.संतोष खेंडके :स.सदस्य श्री.कोकाटे यांचे मताशी सहमत आहे.

मा.महापौर : प्रशासनाने या बाबतीत नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत येथील दूरध्वनी देयकावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रिंटर बसविणे व यंत्रणा अद्यावत करण्याकरीता रक्कम रू.१०.०० लक्षची तरतूद खालीलप्रमाणे अर्थसंकल्पातील लेखा शिर्षकातून वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | पान क्र. | अर्थसंकल्प २००७-०८ लेखशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ०१ | एम.५८ अ.क्र.१ | अग्निशमन साहित्य व टँकर खरेदी (तरतूद रक्कम रू.१.०० कोटी) | मनपा मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये नविन अद्यावत व वाढीव क्षमतेची दूरध्वनी यंत्रणा बसविणे १०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११८१/६ :**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेसाठी सन १९९२ ला विकास नियंत्रण नियमावली मंजुर झाली आहे. त्यात कालानुरूप काही बदल अपेक्षित आहेत. त्यातच आता शासनाने औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी जिना,पॅसेजेस आदी चटई क्षेत्र मुक्त करण्यास मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे हस्तांतरणीय विकास हक्क हा नियम ही (T.D.R.) लागू झाला आहे. त्यामूळे भूखंडावर अतिरीक्त बांधकाम करणे व पर्यायाने वाढीव वापर क्षमता प्राप्त झाली आहे. तसेच बदलत्या जिवनमानानुसार वाहनतळाचे आवश्यकतेतही फरक पडला आहे. त्यामूळे विकास नियंत्रण नियमावलीत काही बदल पूढील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येते.

०१. औरंगाबाद महानगरपालिकेने प्रस्तावित केल्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ नुसार फेरबदलास शासन अधिसूचना क्रमांक टिपीएस-३००/१८३/ प्र.क्र.१३९/२००१/ नवि-३०,दिनांक १३.०१.२००४ नुसार नियम १५.५ ई मध्ये बदल करून इमारतीची जास्तीत जास्त उंची २४.०० मीटर एवढी अनुज्ञेय केली आहे. मात्र त्यानंतर औरंगाबाद शहरासाठी सामाईक जिने, Passages, Lobbies चटई क्षेत्र मुक्त करण्यास तसेच हस्तांतरणीय विकास हक्क (T.D.R.) ही योजना औरंगाबाद महानगरपालिकेसाठी लागू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. साहजीकच त्यातून मिळणारा अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I.) वापरण्यासाठी इमारतीची उंचीत वाढ होणे अपेक्षित आहे. शिवाय इमारती भोवती जास्तीत जास्त अंतर सोडून बांधकाम करण्याची संबंधीताची तयारी दाखविल्यास शहर नियोजनासाठी हा चांगला बदल संभवतो. तसेच त्यामूळे तळमजल्यावर अतिरीक्त वाहनतळ क्षेत्र उपलब्ध होवू शकते. वायुविजनासाठीही या बदलामूळे सुधारणा होवून पर्यावरण सुधारण्यास मदत होईल. या

बाबी लक्षात घेता इमारतीच्या जास्तीत जास्त उंचीसाठीची मर्यादा रद्द करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामूळे विकास नियंत्रण नियमावलीचे कलम १५.५ ई मध्ये बदल करणे व अपेडिंक्स एन अंतर्गत टेबल एन मधील स्तंभ ८ (आठ) वगळण्याचा प्रस्ताव आहे.

०२. विकास नियंत्रण नियमावलीतील सध्याच्या वाहनतळाच्या तरतूदीत वाढ करणे अपरिहार्य वाटते. सदर विकास नियंत्रण नियमावलीतील टेबल ७ अंतर्गत असलेल्या तरतूदीत पूढील प्रमाणे बदल प्रस्तावित आहे.

सध्याची तरतूद :-

**TABLE 7**

**OFF STREET PARKING SPACES**

| Sr No | Occupency | One parking space for every | |
|---|---|---|---|
| | | Motor vehicle parking | Two wheeler parking |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 01 | Residential | | |
| | i. Muliti-family residential | a. 2 tenement having carpet area 101 to 150 sq.m. | a. One tenement having carpet area upto 100 sq.m. |
| | | b. 1 tenment ecceeding 150 sq.m. | |
| | ii. Lodging establishment tourist homes and hotels with lodging accommodation | 6 Guest rooms | |
| | iii. Resturants | 50 sq.m.carpet area | 25 sq.m.carpet area |
| 02 | Educational | 100 sq.m.or lraction thereof of the administrative area public servic area | 50 sq.m.or lraclion there of the adminstrailve area and public service area. |
| 03 | Institutional (Hospital, Medical Institudtions) | 20 beds | 10 beds |
| 04 | Assembly (Theatres, Cenema house, concert halls, Assembly Halls including those in Colleges and Houtels and audiloriums of educational buildings.) | 40 seals | 8 seals |
| 05 | Government or Semi-public or Private Business Building | 100 sq.m.carpet area or fraction thereof | 50 sq.m.carpet area or fraction thereof |
| 06 | mercantiles (Markets Departmental stores, Shops and commercial users.) | 100 sq.m.carpet area or fraction thereof | 50 sq.m.carpet area or fraction thereof |
| 07 | Wholesale establishments | 100 sq.m.carpet area or fraction thereof | 50 sq.m.carpet area or fraction thereof |
| 08 | Industrial | 200 sq.m.carpet area of fraction thereof | 100 sq.m.carpet area of fraction thereof |
| 09 | Storage | 400 sq.m.fraction thereof | 200 sq.m.fraction thereof |

**प्रस्तावित तरतूद :-**

## TABLE 7
## OFF STREET PARKING SPACES

| Sr No. | Occupency | parking space required | |
|---|---|---|---|
| | | Motor vehicle parking | Two wheeler parking |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 01 | Residential | | |
| | i. Multi-family residential | a. One for every tenement having carpet area 90 sq.m. and above<br>b. Two for every tenement having carpet area 150 sq.m. and above | c. One for every tenement having carpet area upto 75.0 sq.m.<br>d. Two for every tenement having carpet area 150 sq.m. and above |
| | ii. Lodging establishment tourist homes and hotels with lodging accommodation | One for every Three Guest room's | |
| | iii. Resturants | One for every 50 sq.m.carpet area | One for every 25 sq.m.carpet area |
| 02 | Educational | One for every 100 sq.m.or lraction thereof of the administrative area public service area | One for every 50 sq.m.or lraction there of the administrailve area and public service area |
| 03 | Institutional (Hospital, Medical Institudtions) | One for every 20 beds | One for every 10 beds |

| | | | |
|---|---|---|---|
| 04 | Assembly (Theatres, Cenema House, concert halls, Assembly Halls including those in Colleges and Houtels and audiloriums of educational buildings.) | One for every 20 seals | One for every 8 seals |
| 05 | Government or Semi-public or Private Business Building | One for every 100 sq.m.carpet area or fraction thereof | One for every 50 sq.m.carpet area or fraction thereof |
| 06 | mercantiles (Markets Departmental stores, Shops and commercial users.) | One for every 50 sq.m.carpet area or fraction thereof | One for every 25 sq.m.carpet area or fraction thereof |
| 07 | Wholesale establishments | One for every 200 sq.m.carpet area or fraction thereof | One for every 50 sq.m.carpet area or fraction thereof |
| 08 | Industrial | One for every 200 sq.m.carpet area or fraction thereof | One for every 100 sq.m.carpet area or fraction thereof |
| 09 | Storage | One for every 400 sq.m.carpet area or fraction thereof | One for every 200 sq.m. fraction thereof |

०३. औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील दाटीवाटीचे क्षेत्रा बाहेर (गावठाण क्षेत्रा बाहेर) नोंदणीकृत शैक्षणिक संस्था तसेच नोंदणीकृत धर्मदाय संस्थाची (Hospitals) यांचेसाठी वाढीव चटई क्षेत्राची तरतूद नाही. नुकतेच शासनाने तारांकित हॉटेल्स् ला ०.५० एवढा वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (नजराणा शुल्क (Premium) भरून) अनुज्ञेय केला आहे. शिवाय दाटीवाटीचे क्षेत्रासाठी (गावठाण) आधीच विकास नियंत्रण नियमावलीतील नियम १.५० ऐवजी २.२५ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक इतर इमारतीसाठी म्हणून अनुज्ञेय आहे. त्यामूळे दाटीवाटीचे क्षेत्रा बाहेरील नोंदणीकृत शैक्षणिक संस्था व नोंदणीकृत धर्मदाय संस्थांचे Hospitals यासाठी ०.५० एवढ्या चटई क्षेत्राची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीचे Appendix N चे कलम N २.२.२ व N २.२.३ चे खाली Note म्हणून समाविष्ट करणेचा खालीलप्रमाणे प्रस्ताव आहे.

**Note - For N २.२.२ & N २.२.३**

An extra F.A.R. up to 0.50 may be permited by Aurangabad Municipal Corporation exclusively for Registered Educational and registered Charitable trusts Hospitals purposes subject to payment of permium equal to 10% of land cost as par Redy Reckenar rate payable to Aurangabad Municipal Corporation.

Provided further that no condonation in the required open spaces, parking spaces and other requirements as per Reulations shall be allowed while granting sach a additional FSI

०४. औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समुह गृह निर्माण योजने बाबत स्पष्ट व्याख्या व त्या संबंधीच्या तरतुदी नाहीत. त्यात प्रामुख्याने इमारतीच्या उंचीच्या अनुषंगाने सामासिक अंतरे, विविध उत्पन्न गटांसाठीचे घरांना सामासिक अंतरे आदि बाबींचा समावेश नाही. समुह गृह निर्माण योजना प्रकरणाची वाढती संख्या लक्षात घेता अशा योजनेची व्याख्या करणे व त्यासंबंधीच्या तरतुदी करणे आवश्यक होत आहे. करीता सिडकोच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तशी व्याख्या व तरतूदीत काही बदल करून व काही वगळून खालीलप्रमाणे लागू करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सदर तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत नियम क्रमांक १३.२.५ म्हणून समाविष्ट करण्यांत येईल.

a. **Group Housing Scheme :-** In the Group Housing Scheme, the following regulations shall apply :

i Entire area under layout shall be treated as one single polt and the net polt area in a Group Housing scheme shall be regarded as the area excluding the land under roads, and spaces if any.

vi The total covered up area shall not exceed 1/2 of the net plot area and development shall be subject to maximum F.S.I. of 1.0 of the net plot area.

vii The distance between any building and approach will be 2.25 m. for ground floor and ground+one floor, 3.0 m. for ground + Two floor and 4.5 m. for ground+Three floor

and above. provided that in case to building fronting on any majer road the margin should be 4.5 m.

viii Distance between any two building shall be 2.0 m., if they are ground floor structure, 3.0 m. if they are ground and one upper floor, 4.5 m. if they are G+2 upper, 6.0 m. if they are G+3 upper and the side margins from plot boundaries shall be 2.25 m. 2.30 m., 3.0 m., and 4.5 m. respectively.

ix Notwithstanding the above, in case of Group Housing with one room dwelling unit and two room dwelling units if the buildings have ground floor only and further there are no doors or windiws in the side walls, the minimum distance between the buildings may be reduced to 1.5 m. only along a street and nil along an approach/ pathway.

सर्वसाधारणपणे सर्वच नियोजन प्राधिकरणत ०.७५ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक किंवा खुली जागा व अंतर्गत रस्ते वगळता उरणारे निव्वळ क्षेत्र एवढाच चटई क्षेत्र निर्देशांक देय केला आहे. करीता तसा बदल औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत करण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी ०.७५ किंवा खुली जागा व अंतर्गत रस्ते वगळता उरणारे निव्वळ क्षेत्र या पैकी जे जास्त असेल तेवढे अनुज्ञेय करण्यात येईल.

०५. भूखंडाची वापर क्षमता वाढल्याने वाहनतळ व Storage ची वाढीव आवश्यकता भासणार आहे. ही बाब लक्षात घेता बेसमेंटसाठीच्या नियम क्रमांक १७.१२ मध्ये काही बदल आवश्यक आहेत.

१७.१२.२ (b) मध्ये पूढील मजकुर समाविष्ट करणे आवश्यक आहे.

i In case of multi tier basement adequate mechanical light and ventilation should be provided to the satisfaction of the commissioner and should be certified by the authority as supposed to be appropriate by commissioner from time to time.

iii In case of multi tier basement suitability of the site should be certified by the city Engineer.

iv In the requirment mentioned in 'C' in 17.12.2 the word 'any' should be replaced by 'upper level/top' basement.

वरीलप्रमाणे बदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्ताव मान्यतेस्तव तथा कलम-३७ नुसार पूढील कार्यवाही करण्यास आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना अधिकार देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संतोष जेजूरकर :या विषयावर विशेष बैठक आयोजित करावी सदस्यांना अभ्यास करायचा आहे. स्थगिती दयावी.

श्री.संजय जोशी :आज उशीर झालेला आहे या वर चर्चा करावी लागणार आहे तुर्त स्थगित ठेवावा.

श्री.संतोष खेंडके :उद्या बैठक आयोजित करावी आता उशीर झालेला आहे.

मा.महापौर :शहराच्या विकासासाठी हा विषय मंजूर करणे गरजेचे आहे परंतू सदस्यांच्या मागणी नुसार यावर अभ्यास करायचा असल्याने आता स्थगिती देवून पूढील बैठकीमध्ये ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव पूढील बैठकीमध्ये ठेवण्यास मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.११८२/७ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३१३,३७६,३८३,३८६ नुसार व प्रकरण १८ चे सुचीनुसार जाहिरात/व्यावसायीक परवाना फी आकारण्याचे महानगरपालिकेला अधिकार आहेत.

उपरोक्त कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका हद्दीतील दुकाने,व्यापारी अस्थापना, अन्य संस्था इत्यादींनी प्रदर्शित केलेल्या जाहीराती, दुकानाचे फलक, आकाश चिन्हे इत्यादींचे सर्व्हेक्षण करण्यात आलेले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार दुकानांसाठी द्यावयाची परवाना फी चे प्रस्तावित दर व दुकानांवरील प्रदर्शित करण्यात येत असलेल्या जाहीरातीच्या प्रस्तावित दराचे विवरण पत्र तसेच परवान्याबाबतचे सर्वसाधारण नियम सोबतप्रमाणे असून प्रस्तावित दरावर विचार विनिमय करून व सदर दर मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर.

## परवान्याबाबतचे सर्वसाधारण नियम

१) परवान्याची मुदत एक वर्षापुरती मर्यादीत असुन ती प्रती वर्षी दि.३१ मार्च रोजी संपेल.

२) परवाना ज्या व्यक्तीच्या नावाने दिला असेल अगर धंद्याकरीता वापरावयाच्या ज्या विशिष्ट जागेकरीता दिलेले असेल तेवढया व्यक्तीपुरताच अगर तेवढया जागेपुरताच (हे गृहित धरले जाईल.) तो मर्यादीत राहील.

३) ज्या व्यक्तीच्या नावावर अगर ज्या विशिष्ट जागेकरीता परवाना दिला असेल तो मा.महापालिका आयुक्त यांच्या संमती शिवाय बदलता येणार नाही.

४) ज्या धंद्याकरीता परवाना घेणे जरूर आहे असा कोणताही धंदा एखादा विशिष्ट जागेत चालविण्यास मा.महापालिका आयुक्त यांनी परवानगी दिल्याशिवाय चालविता येणार नाही

५) परवानाधारकास वर निर्दीष्ट केलेल्या मान्य विवक्षित ठिकाणाखेरीज अन्यस्त्र वा इतर सार्वजनिक जागी रस्त्यावर अगर फुटपाथवर काहीही वस्तु ठेवून त्याचा व्यापार अगर तत्संबंधी व्यवहार (करू नये) करता येणार नाही.

६) परवाना शुल्क परवाना मिळाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव परत दिले जाणार नाही. मा.महानगरपालिका आयुक्त अगर त्यांच्या वतीने परवाना शुल्क भरले गेले म्हणजे संबंधीत इसमास परवाना मिळाला असे नाही. परवाना शुल्क हे दरवर्षी आगाऊ भरण्याचे आहे.परवाना न मिळाल्यास भरलेले शुल्क परत देण्यात येईल.

७) धंदा करण्यास ज्या जागेस परवाना मिळाला असेल ती जागा परवानाधारकाने अगर त्यामार्फत काम पाहणाऱ्या इसमाने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यास ज्यावेळी जरूर असेल तेव्हा नियमाप्रमाणे केव्हाही तपासण्यास मोकळी ठेवली जाईल.

८) परवाना दिलेल्या ठिकाणी सहज दिसू शकेल अशा जागी परवानाधारकाने परवाना लावला पाहिजे.

९) परवानाधारकास परवान्याच्या मुदतीत धंद्याकरीता जास्त जागा,गोदाम अगर खोल्या लागल्यास त्याकरीता त्यास जादा परवाना मिळण्याकरीता अर्ज करावा लागेल व तो त्यास देण्याचे मान्य झाल्यास त्याकरीता वेळोवेळी ठरविण्यात आलेले शुल्क त्यास भरावे लागेल

१०) परवाना दिल्यानंतर परवाना दिलेली जागा अगर माल परवान्यामध्ये नमुद केल्यापेक्षा जास्त असेल तर अशा जादा जागेबद्दल अगर त्या मालाबद्दल त्या मुदतीकरीता जागा परवाना शुल्क घेऊन जादा परवाना दिला जाईल व हे दोन्ही परवाने पुढील वर्षी जरूर लागल्यास एकत्रित करण्यात येतील.

११) परवाना घेणे जरूर असलेल्या निरनिराळया वस्तु परवानाधारकांच्या व्यवसायानुरूप ठेवल्या जागी असतील आणि त्या जर विक्रीकरीता नसतील तर त्यावर परवाना शुल्क घेतले जाणार नाही.

१२) ज्या व्यापाऱ्यास आपल्या धंद्याच्या परवाना पुन्हा पुढील वर्षाकरीता चालु ठेवावयाचा असेल त्याने त्याकरीता चालु परवान्याची मुदत संपण्यापुर्वी दोन महिने अगोदर

मा.महापालिका आयुक्त यांच्याकडे अर्ज केला पाहिजे. त्याप्रमाणे अर्ज न केल्यास त्याबद्दल त्यास खालील प्रमाणे विलंब शुल्क पडेल.

| परवाना फी रूपये | विलंब शुल्क रूपये |
|---|---|
| १ ते ५० | १०.०० |
| ५० च्या वर | २०.०० |

परवान्याचे शुल्क दरवर्षी जानेवारी महिन्यात भरावयाचे आहे.

१३) धंद्याच्या विक्रीमुळे अगर वारस हक्कामुळे जर परवानाधारकाच्या नावात बदल करावयाचा असेल तर त्याकरीता १० रूपये शुल्क घेतले जाईल.

१४) ज्यावेळी परवाना एक वर्षापेक्षा कमी मुदतीचा देण्यात येईल त्यावेळी खालील दराने परवाना शुल्क आकारण्यात येईल.

०१. तीन किंवा त्याहून कमी महिन्यासाठी - वर्षाच्या परवाना शुल्काच्या २५ टक्के
०२. तीन पेक्षा अधिक व नऊ महिने अखेर - वर्षाच्या परवाना शुल्काच्या ५० टक्के
०३. सहापेक्षा अधिक व नऊ महिने अखेर - वर्षाच्या परवाना शुल्काच्या ७५ टक्के
०४. नऊ महिन्यापेक्षा अधिक -संबंध वर्षासाठी असलेले म्हणजे १०० टक्के

१५) परवान्याची मुदत वाढवून देण्याचे शुल्क सर्वसाधारणपणे संबंध वर्षाचे भरावे लागेल, परंतु एका वर्षाहून कमी मुदतीचा परवाना पाहिजे असेल व त्याप्रमाणे पहिल्या परवान्याची मुदत संपल्यानंतर एक महिन्याच्या आत अर्ज दिला असेल तर परवाना शुल्क कमी मुदतीच्या परवाना शुल्काच्या दराने आकारण्यात येईल.

१६) परवान्याकरीता ग्राहय धरलेल्या धंद्यात जर एकापेक्षा अधिक, परवाने घेणे जरूर आहे.अशा धंद्याच्या क्रिया (सेरिज ऑफ ऑपरेशन) एकाच ठिकाणी चालु असतील तर त्या सर्वांमध्ये ज्यावर सर्वात जास्त परवाना शुल्काची आकारणी होईल त्या धंद्याच्या क्रियेचा (ऑपरेशन्स) परवाना देण्यात येईल आणि त्या परवान्यामध्ये इतर क्रियेसंबंधीच्या अटी नमुद केल्या जातील.

१७) परवान्याच्या मुदतीत काही काळ धंदा तहकुब केला आणि त्यामुळे परवाना काढून घेतला असेंल तर परवाना काढून घेतलेल्या मुदतीकरीता परवाना शुल्क परत दिले जाणार नाही.

१८) परवानाधारकास परवान्याच्या धंद्याची जागा रिकामी करावयाची असेल, पोटभाडयाने द्यावयाची असेल अगर ताबा सोडावयाचा असेल तर त्याप्रमाणे आपला इरादा परवानाधारकाने मा.महापालिका आयुक्त यांच्याकडे अर्ज करून ताबडतोब कळविला पाहिजे.

१९) ज्या ठिकाणी निरनिराळया तऱ्हेची गळितांची धान्ये साठविली जात असतील व त्यातच जी कपाशीच बी साठविले असेल तर तो सर्व साठा एकत्रित लक्षात घेऊन एकच परवाना देण्यात येईल व त्या करीता मान्य झालेले परवाना शुल्क वसूल केले जाईल.

२०) ज्यावेळी परवाना शुल्क एक वर्षापेक्षा कमी मुदतीकरीता वसुल करावयाचे असेल आणि ते हिशोबाने जर एक रूपयापेक्षा कमी होत असेल तर त्या बाबतीत कमीत कमी म्हणून एक रूपया फी वसुल केली पाहिजे.

२१) आरोग्य विषयक परवान्यांसाठी अर्ज व त्याबाबतचा पत्र व्यवहार मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या नावे करावा. सर्वसाधारण परवान्यासाठीचा अर्ज व त्याबाबतचा पत्र व्यवहार मा.महापालिका आयुक्त यांच्या नावे करण्यात यावा.

**टिप :- शेडयूल चॅप्टर १८ भाग १ ते भाग ४ सोबत जोडण्यात आले आहे.**

**संवाद :**

श्री.संतोष जेजूरकर :रद्द करण्यात यावा.

मा.आयुक्त :तांत्रिकदृष्टया परवाना देणे महापालिकेला ॲक्ट नुसार बधंनकारक आहे. व्यवसाय करणाराला परवाना घेणे बधंनकारक आहे. अटी व शर्ती काय

| | |
|---|---|
| | असाव्यात हे आपण ठरवू शकतो परंतू परवाना दयायचाच नाही हे ॲक्ट नूसार ठरवू शकत नाही. रद्य करणे कायद्याचे दृष्टीने योग्य नाही. |
| श्री.संतोष खेंडके | :स्थानिक नागरीकांना परवान्याच्या कोणकोणते परवाने देत राहणार आहे रद्य करावा. |
| मा.आयुक्त | :परवान्या शिवाय या महापालिकेच्या हद्यीत कूणीही व्यक्ती व्यवसाय करू शकत नाही प्रत्येक महानगरपालिकेत हा परवाना दिला जातो. यापूर्वी हा परवाना द्यायला पाहिजे होता उशीर झालेला आहे. |
| श्री.संतोष खेंडके | :पुढील सभेत घेण्यात यावा. |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : जे रेट दिलेले आहे ते कमी करून मान्य करावे. |
| श्री.भगवान घडमोडे | :अटी शर्ती जाचक आहे वगळावे. स्थगित करावे. |
| मा.महापौर | :अटी शर्ती कमी करून पूढील बैठकीत दुरूस्तीसह हा प्रस्ताव ठेवावा. |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्तावातील अटी शर्ती कमी करून पूढील बैठकीत दुरूस्तीसह ठेवणेस मान्यता देण्यांत आली.

**<u>विषय क्र.११८३/८ :</u>**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहरामध्ये स्वच्छता कर्मचारी सकाळी शहर स्वच्छ करण्याची कामे करतात तथापी त्यांच्या कामाची वेळ संपल्यानंतर शहरातील सार्वजनिक ठिकाणी, सर्वच रस्त्यावर अस्वच्छता करण्याची जी मानवी प्रवृत्ती आहे त्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि औरंगाबाद महानगरपालिकेच्या क्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर सर्व प्रकारे उपद्रव निर्माण करणाऱ्या नागरीकांना प्रतिबंध करण्यासाठी लोक जागृती करून त्यांच्यात सामाजिक शिस्तीची जाणीव निर्माण करण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महानगरपालिका औरंगाबाद येथे उपद्रव शोध पथक दल स्थापन करणे गरजेचे झाले आहे.

या पथकामार्फत मा.सर्वोच्च न्यायालयाने शहरात गैरशिस्तीने आणि सामाजिक जानिवेच्या उदासिनतेने वागणाऱ्या नागरीकांना शिस्त लावण्यासाठी साम,दाम,दंड नितीचा वापर करून संपूर्ण शहराचे आरोग्य आणि पर्यावरण पातळी नियंत्रीत ठेवण्यासाठी जे कोणी सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर अशी घाण करतील किंवा कोणत्याही प्रकारचे उपद्रव करतील त्यांना दंड करण्याबाबत निर्देश दिलेले आहे.

उपद्रव शोधक पथक निर्मीतीमुळे महानगरपालिकेवर आर्थिक बोझा पडत नाही तर त्यांच्या कडून नागरीकांना शिस्त लावण्याच्या कामाबरोबर महानगरपालिकेला रोजच्या रोज लाभ होऊ शकेल. उपद्रव शोधक पथक निर्मिती बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१),७३ (१)व ७४ अन्वये सहा सहा महिन्याच्या कालावधीसाठी नेमणुक करण्याच्या विशेष अधिकार आहे. सदरील उपद्रव शोधक पथकामध्ये सैन्य दलातील सेवानिवृत्त झालेल्या व ज्यांना सेवानिवृत्त वेतन मिळत आहे अश्या पोलीस खात्यातील किंवा लष्करातून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी,निमलष्करी दलातून म्हणजे सी.आर.पी.एफ, बी.एस.एफ, एस.आर.पी या खात्यातून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी, स्थानिक होमगार्ड व नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांना ही या पथकामध्ये नेमणूक करता येते. त्यासाठी स्थानिक पोलीस आयुक्त, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जिल्हा समादेशक होमगार्ड, उपनियंत्रक नागरी संरक्षण यांचेकडून संबंधित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची यादी मागवून भरती करता येवू शकते. भरती करण्यासंदर्भाने खालील अटीची पुर्तता होणे आवश्यक आहे.

१. उपद्रव शोधक पथकातील सदस्य हा शक्यतो सैन्यदलातून अथवा ॲक्झयुरी सैन्यदलातून सेवानिवृत्त झालेला असावा.

२. सदस्यास निवृत्ती वेतन मिळत असावे.

३. सदस्याचे वय ३५ ते ६० च्या दरम्यान असावे.

४. सदस्यांला मराठी, हिंदी,व इंग्रजी लिहता वाचता येत असावे.

५. सदस्यास स्थानिक शहराची माहिती असावी.

६. या सदस्यांची निवड महानगरपालिकेने स्थापन केलेल्या निवड समीतीतर्फे करण्यात यावी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण १४ कलम ३ अ व ४ आणि कलम २०८,२४४ आणि कलम ३७६ नुसार न्युअरन्स डिटेक्टर सदस्यांना खालील वेगवेगळया कारणासाठी नागरीकांकडून प्रशासकीय शुल्क वसुल करण्याची कार्यवाहीची जबाबदारी सोपविण्यात येईल.

अ) रस्त्यावर थुंकणे किंवा मलमुत्र विसर्जन करणे

ब) रस्त्यावर कचरा व राडारोडा टाकणे अथवा घाण टाकणे, कचरा टाकण्यासाठी कचरा पेटीचा वापर न करणे

क) रस्त्यावर बिल्डींग मटेरीयल टाकणे

ड) अनाधिकृत बॅनर्स,पोस्टर्स,जाहिरातीचे फलक उभारणे,सिनेमा/नाटकाच्या/सर्कसच्या जाहिराती लावणे.

इ) शासन आदेशानुसार २० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक वापरावर बंदीची कार्यवाही करणे.

फ) शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच शैक्षणिक संस्था यांच्या १०० मीटर परिघामध्ये गुटका विक्री करणेस बंदीची/खाण्यास बंदीची कारवाई करणे.

ग) सार्वजनिक रस्त्यावर अनाधिकृत ठिकाणी बसेस, वाहने,बंद वाहने,पार्क करणे आणि रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या व्यक्तीवर कार्यवाही करणे.

प) महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ अन्वये कोणतेही न्युअसन्स/उपद्रवावर उपद्रव शोधक स्वार्ड तर्फे दंडात्मक कारवाई करता येईल व प्रशासकीय शुल्क वसुल करता येईल. उदा.मोठा कर्कश आवाज, ध्वनी प्रदुषण, फटाकेवरील बंदी तसेच रस्त्यावर पिण्याच्या पाण्याने गाडी धुणे किंवा पिण्याचे पाणी वाया घालविणे.

भ) या व्यतिरीक्त महानगरपालिकेच्या संप व अतिक्रमण बंदोबस्तासाठी या व इतर बाबीसाठीही न्युअरन्स डिटेक्टर सदस्यांची सेवा महानगरपालिकेला वेळोवेळी आवश्यकतेनुसार वापरता येऊ शकते.

उपरोक्त प्रमाणे उपद्रव पथकाकडे देण्यात आलेल्या कामाबाबत करावयाच्या प्रशासकीय शुल्क वसूली (दंड) सोबत दिलेल्या यादीप्रमाणे आकारणी करण्याबाबत प्रस्ताव आहे.

सदरील पथकास गणवेश,ओळखपत्र व मुंबई पोलीस कायदा १९५१ चे कलम २२ नुसार पोलीस आयुक्त यांच्यातर्फे अतिरीक्त पोलीस अधिकारी म्हणून प्रत्येक सदस्याची नेमणूक करण्यात येवून त्यांना पोलीस सनद देण्यात येईल. आणि ती पोलीस सनद, ओळखपत्र व त्यांच्या नावाची प्लेट सर्व सदस्यांना कामावर असतांना गणवेशावर लावणे आवश्यक राहील.

उपद्रव शोध पथकास महानगरपालिकेतर्फे खालील प्रमाणे सुविधा व मानधन देण्याबाबत प्रस्तावीत करण्यात येत आहे.

१. सर्व सदस्यांना महानगरपालिकेचा गणवेश देण्यात येईल.

२. प्रत्येक सदस्याच्या छातीवर लावण्यासाठी महानगरपालिकातर्फे फोटोसह ओळखपत्र देण्यात येईल.

३. प्रत्येक सदस्याच्या छातीवर लावण्यासाठी महानगरपालिकातर्फे सदस्याच्या नावाची नेमप्लेट देण्यात येईल.

४. प्रत्येक सदस्याला १०० रूपये प्रतीदिन प्रमाणे दरमहा एकत्रित रूपये ३००० मानधन देण्यात येईल.

५. सदस्यांनी एक महिन्यामध्ये वसूल केलेल्या एकुण प्रशासकीय रक्कमेच्या १० टक्के प्रोत्साहन भत्ता एका पथकातील तीन सदस्यांना सम प्रमाणात क्षेत्रीय कार्यालया निहाय देण्यात येईल.

६. महानगरपालिकेतर्फे प्रत्येक पथकाला दररोज कमीत कमी रूपये ४००० प्रशासकीय शुल्क वसुली व कमीत कमी ५० नागरीकांवर कारवाई करावयाचे लक्ष ठरून देण्यात येईल. व ६०० ते ७०० नागरीकांवर कारवाई करावयाचे लक्ष आणि दर माह प्रत्येक पथकास ७० ते ८० हजार रूपये प्रशासकीय शुल्क वसूलीचे लक्ष देण्यात येईल. व अटी व शर्तीची नोंद प्रत्येक सदस्यांच्या करारनाम्यामध्ये व बंदपत्रामध्ये महानगरपालिकेतर्फे करून घेण्यात येईल.

७. कोणीही सदस्य सहा महिन्याच्या करारनामा केल्यानंतर त्याची मुदत संपण्याआधी नोकरी सोडून देणार नाही आणि गेल्यास महानगरपालिकेने केलेला खर्च व एकवट रक्कम ४००० त्या सदस्यांने भरणे त्यावर बंधनकारक ठेवण्यात यावे. त्यासाठी प्रत्येक सदस्याकडून बंधपत्र दोन जामिनदारांसह स्टँप पेपर घेण्यात यावे.

८. या उपद्रव शोधक सदस्यांच्या दैनंदिन कामासाठी महानगरपालिकेतर्फे जर कामाचे क्षेत्र मोठे असून ते त्यांना त्यांच्या कामाच्या वेळा पूर्णपणे फिरता येणार नसेल तर त्यांची पथके करून त्यातील प्रत्येक पथकाला जीप सारखे वाहन खाजगी वाहतुक ठेकेदाराकडून प्रति रू.४५० ते ५५० भाडे देवून एका पथकाला त्यांच्या कामासाठी देण्यात यावीत.

९. एनडी सदस्यांना रोज सकाळी १०.०० वाजता त्यांच्या कामावर जाण्यापुर्वी त्यांची हजेरी वर रोलकॉल घेण्यात यावा.सायंकाळी/रात्री ८.०० वाजता कामाची वेळ संपल्यानंतर हजेरी व रोलकॉल व रिपोर्ट विशेष कार्याधिकारी /नियंत्रित अधिकारी यांच्या मार्फत घेण्यात यावा. या सदस्यांना कामावर असतांना वेळेवर संपर्क साधण्यासाठी मोबाईल देण्यात आल्यास संपर्क साधने अतिशय सोयीचे होते.

१०. सर्व एनडी, सदस्यांना मुंबई पोलीस कायदा,१९५१ चे कलम २२ अन्वये मा.पोलीस कमिशनर यांच्या मान्यतेने अतिरीक्त पोलीस अधिकारी म्हणून नेमणूक करून मुंबई पोलीस कायदा १९५१ चे कलम १५५,११६,११३ बाबत कार्यवाही करण्यासाठी पोलीस सनद महानगरपालिका तर्फे देण्यात यावी.

११. या सर्व एनडी,सदस्याकडुन ३००० रूपयांचे बंधपत्र दोन जामिनदारांसह व वीस रूपयांच्या स्टँपवर ६ महिन्याच्या नेमणुकीसाठी करून घ्यावे व तशाच वीस रूपयांच्या स्टँपपेपरवर करारनामा करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे मध्येच नोकरी सोडून जाण्याच्या वृत्तीला आळा बसू शकतो.

१२. सैन्य दलातील व इतर गणवेशधारी सेवानिवृत्त कर्मचारी एनडी स्क्वॉडमध्ये नेमल्यामुळे शिस्तीचे वातावरण असते. व या सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा स्थानिक नागरीकांशी संपर्क नसल्यामुळे त्यांचेकडून कारवाई करून घेणे सोपे जाते. तसेच हे सर्व निवृत्तीवेतन धारक असल्याने या सदस्यांच्या दैनंदिन कामामध्ये अनावधानाने काही चुका झाल्यास महापालिकेचे होणारे आर्थिक नुकसान वसुल करणे सोयीचे होते.

१३. उपद्रव शोधक पथकामार्फत अपचारी नागरीकांवर दंडात्मक कारवाई करून जागेवरच प्रशासकीय शुल्क वसुल करण्याचे अधिकार त्यांना देण्यात आलेले आहेत अशा स्वरूपाची माहिती स्थानिक वर्तमानपत्रातून तसेच सर्व प्रसार माध्यमांव्दारे सर्व नागरीकांना देण्यात येईल. तसेच महानगरपालिकेचे सर्व कार्यालये व मोक्यांच्या ठिकाणी जाहिरातीचे बोर्ड लावून संपूर्ण शहराला माहिती दिली जाईल यामुळे जन जागृती होऊन

लोकांचा विरोध कमी होण्यास मदत होईल. जर एखादा नागरीक दंड देण्यास नकार देत असल्यास त्यावेळी त्यास जवळच्या पोलीस चौकीमध्ये पथक घेऊन जाईल किंवा त्याच्या विरूध्द गुन्हा नोंदवील. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८३ व ४८३ (२) अन्वये अनुक्रमे मा.जिल्हाधिकारी आणि मा.पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक म्हणजेच महसुल व पोलिस खात्यातील कर्मचारीसुध्दा पथकातील सदस्यांना मदत करतील तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८७ नुसार महानगरपालिका कर्मचारी म्हणून उपद्रव शोधक पथकातील सदस्यांना कायदेशीर संरक्षण देता येईल.

उपद्रव शोध पथकामध्ये काही महिला सदस्यांची नेमणूक केल्यास महिला नागरीकांवर कारवाई करणे सोयीचे जाईल. उपद्रव शोध पथकामधील सदस्यांनी महानगरपालिकेमध्ये निवडून आलेले सदस्य, अधिकारी यांच्याशी संयमाने व मान देऊन वागणे आवश्यक राहील. रस्त्यावर घाण टाकणे किंवा इतर उपद्रव करणे म्हणजे फौजदारी गुन्हा नाही. त्यामुळे गणवेशधारी उपद्रव शोध पथकातील सदस्यांनी नागरीकांशी आरेरावीने बोलू नये, विनाकारण त्रास देऊ नये, ज्यामुळे स्थानिक वादविवाद टाळता येतील आणि नागरीकांमधून निवडून आलेले महानगरपालिका सभासद न्युअसन्स डिटेक्श्नच्या कामाला विरोध करणार नाही.

शासनाच्या आदेशानुसार २० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक विक्री/वापर करणाऱ्यांवर कारवाईसाठी प्लॅस्टीकची जाडी मोजण्याचे यंत्र आणि आवाजाची तिव्रता मोजून ध्वनी प्रदुषण टाळण्यासाठी साऊंड लेव्हल मेजरींग मिटर किमान एक यंत्र प्रत्येक पथकाकडे देण्यात येईल.

अशाच प्रकारचे स्कॉड पुणे महानगरपालिकेमध्ये गेल्या सात वर्षापासून कार्यरत आहेत. याबाबत कोणाचीही तक्रार नसल्याबाबत पुणे महानगरपालिकेने कळविले आहे. त्यामुळे एनडी स्कॉडचे काम हे सर्व दृष्टीने महानगरपालिकेला फायदेशीर असून शहरातील गैरशिस्तीने वागणाऱ्या नागरीकांना शिस्त लावण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. करीता मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव धोरणात्मक निर्णयास्तव सादर.

| अ.क्र. | उपद्रव | आकारण्यात येणारा दंड |
|---|---|---|
| १ | रस्त्यावर विष्टा किंवा मलमुत्र टाकणे किंवा थुंकणे अथवा घाण करणे | रू.२५/- |
| २ | वैयक्तीकरित्या नागरीकांनी टाकलेला घन कचरा व द्रवरूप कचऱ्यासाठी प्रशासकीय शुल्क | रू.५०/- |
| ३ | फेरीवाले,टपरीवाले यांनी केलेली घाण व टाकलेला कचरा | रू.१००/- |
| ४ | भाजी विक्रेते,मासळी विक्रेते यांचा द्रवरूप व घनरूप कचरा | रू.१५०/- |
| ५ | भंगारवाले,रद्दी, काच, पत्रावाले यांनी केलेल्या घाण व कचऱ्यासाठी | रू.१००/- |
| ६ | केश कर्तनालय,टेलर्स, बेकरीवाले,लाकडी फर्निचरवाले,रेडिओ,टिव्ही दुकानदार यांनी केलेल्या घाणीसाठी आणि कचऱ्यासाठी | रू.२००/- |
| ७ | छोटे व्यावसायीक,अमृततूल्य हॉटेल्स,आणि इतर ब दर्जाचे हॉटेल्स,पान तंबाकू व्यापारी,किराणा दुकानदार,लॉटरीवाले,मटन आणि चिकन सेंटर यांनी केलेल्या घाणीसाठी | रू.३००/- |
| ८ | पॅथॉलॉजी,लॅबोरेटरीज, शैक्षणिक संस्था,कोचिंग क्लासेस यांनी केलेल्या घाणीसाठी | रू.२००/- |
| ९ | अनाधिकृत हातगाडी, पथारीवाले यांचे रस्त्यावरील अतिक्रमण व घाणीसाठी | रू.५००/- |
| १० | अनाधिकृत स्टॉलधारक यांचे पदपथावरीले अतिक्रमण व कचऱ्यासाठी | रू.५००/- |
| ११ | २० मायक्रोनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या, झबला बॅग,कॅरीबॅग अथवा झुरमाळया प्लॅस्टीक कव्हर, सिगारेट कव्हर, आकाश कंदीलाचे कागद,अन्न धान्याच्या पॅकींगसाठी वापरण्यात येणाऱ्या पॅस्टीक पिशव्या आणि विडी या उत्पादन वापरासाठी. | रू.५००/- |
| १२ | गुटका विक्री व सेवन, गुटका खाऊन थुंकणे व घाण करणे. | रू.५००/- |
| १३ | मोठे व्यावसायीक अ वर्ग व त्यापुढील हॉटेल्स, मंगल कार्यालये, चित्रपट गृहे,केटरर्स,खानावळी,लॉजेस,दवाखाने,हॉस्पीटल,डिस्पेन्सरीज,बांधकाम व्यावसायीक वॉशींग सेंटर मोटार दुरूस्ती गॅरेज, औद्योगीक संस्था यांनी केलेली घाण अथवा कचऱ्यासाठी | रू.१०००/- |

| | | |
|---|---|---|
| १४ | रस्त्यावरील अनाधिकाराने पोस्टर्स,बॅनर्स,जाहीराती बोर्ड लिहिणे. | रू.२०००/- |
| १५ | रस्त्याच्या कडेला किंवा भिंतीवर अनाधिकाराने जाहिरात बोर्ड लिहणे किंवा लावणे. | रू.२०००/- |
| १६ | रस्त्यावर अनावश्यक रित्या पाणी सोडणे किंवा वाया घालवणे-दुकानदार बंगलेवाले, मंगल कार्यालये यांच्यासाठी | रू.१०००/- |
| १७ | एखाद्या व्यक्तीने रस्त्यावर पाणी विनाकारण टाकणे किंवा पाण्याचा नळ सोडणे. | रू.१००/- |
| १८ | मोटार गाडयांचे हॉर्न ९५ डेसीबल पेक्षा मोठयाने वाजविणे, कर्कश आवाजाने हॉर्न वाहनाला लावणे व वाजवणे. | रू.१००/- |

**संवाद :**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :या बाबतीत जनतेला शिस्त लावण्या अगोदर महापालिकेपासून सुरूवात करावी. जेथे जास्त ट्राफीक असते त्या ठिकाणी बोर्ड लावण्याची गरज आहे. योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी. तंबाखू गुटका हे सर्व बंद व्हायला पाहिजे.

मा.महापौर :महापालिकेपासून अगोदर सुरूवात करण्याची गरज आहे. जेथे जास्त रहदारी असेल तेथे बोर्ड लावण्याची जाहिरात करण्यात गरज आहे हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

श्री.गजानन बारवाल :या प्रस्तावात उपद्रव मध्ये क्र १४,१५,१६ मध्ये रेट जास्त दिलेले आहे त्यामूळे कुणी भरणार पण नाही नाममात्र रेट असावयास पाहिजे. बॅनर्स साठी २००० रू. जास्त होतात बॅनर्स किंमतच ५००रू. असते. प्रॅक्टीकली योग्य वाटत नाही.

मा.आयुक्त :रेट जास्त नाही गुटका खाऊन थुंकणे व घाण करणे यासाठी रू.५०० आकारलेले आहे.

श्री.गजानन बारवाल :कार्यवाही करणे ठिक आहे परंतू मर्यादा किती असावयास पाहिजे याचा विचार केला पाहिजे. रस्त्यावर पाणी सोडले तर १०००रू. दंड कुणीही देणार नाही.

श्री.संतोष खेंडके :जे नागरीक दंड भरू शकतील असे नाममात्र रेट आकारण्यात यावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :रेट हेच असावे ते कमी करणे योग्य नाही दंडाची रक्कम वसूल केली पाहिजे नागरीकांना सुध्दा ते करीत असलेल्या चूकीचे महत्व कळाले पाहिजे

श्री.अ.रशिद खान : बाहेरील नवीन व्यक्ती शहरात आल्यास त्यांना माहित नसेल तर काय करणार आहे रेट कमी करावे.

मा.महापौर : स.सदस्य श्री.गजानन बारवाल यांनी जी रेट कमी करण्याबाबत सूचना केली त्यामध्ये दुरूस्ती करून हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरामध्ये स्वच्छता कर्मचारी सकाळी शहर स्वच्छ करण्याची कामे करतात तथापी त्यांच्या कामाची वेळ संपल्यानंतर शहरातील सार्वजनिक ठिकाणी, सर्वच रस्त्यावर अस्वच्छता करण्याची जी मानवी प्रवृत्ती आहे त्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि औरंगाबाद महानगरपालिकेच्या क्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर सर्व प्रकारे उपद्रव निर्माण करणाऱ्या नागरीकांना प्रतिबंध करण्यासाठी लोक जागृती करून त्यांच्यात सामाजिक शिस्तीची जाणीव निर्माण करण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महानगरपालिका औरंगाबाद येथे उपद्रव शोध पथक दल स्थापन करणेस व या पथकामार्फत मा.सर्वोच्च न्यायालयाने शहरात गैरशिस्तीने आणि सामाजिक जानिवेच्या उदासिनतेने वागणाऱ्या नागरीकांना शिस्त लावण्यासाठी साम,दाम,दंड नितीचा वापर करून संपूर्ण शहराचे आरोग्य आणि पर्यावरण पातळी नियंत्रीत ठेवण्यासाठी जे कोणी सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर अशी घाण करतील किंवा कोणत्याही प्रकारचे

उपद्रव करतील त्यांना दंड करण्याबाबत निर्देश दिलेले असल्यामूळे, उपद्रव शोधक पथक निर्मिती बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१),७३ (१)व ७४ अन्वये सहा सहा महिन्याच्या कालावधीसाठी नेमणुक करण्याच्या विशेष अधिकार आहे. सदरील उपद्रव शोधक पथकामध्ये सैन्य दलातील सेवानिवृत्त झालेल्या व ज्यांना सेवानिवृत्त वेतन मिळत आहे अश्या पोलीस खात्यातील किंवा लष्करातून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी,निमलष्करी दलातून म्हणजे सी.आर.पी.एफ, बी.एस.एफ, एस.आर.पी या खात्यातून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी, स्थानिक होमगार्ड व नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांना ही या पथकामध्ये नेमणूक करता येते. त्यासाठी स्थानिक पोलीस आयुक्त, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जिल्हा समादेशक होमगार्ड, उपनियंत्रक नागरी संरक्षण यांचेकडून संबंधित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची यादी मागवून भरती करणेस तसेच भरती करण्यासंदर्भाने प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते ०६ या अटीस अधिन राहून,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण १४ कलम ३ अ व ४ आणि कलम २०८,२४४ आणि कलम ३७६ नुसार न्युअरन्स डिटेक्टर सदस्यांना खालील वेगवेगळया कारणासाठी नागरीकांकडून प्रशासकीय शुल्क वसुल करण्याची कार्यवाहीची जबाबदारी सोपविण्यात येईल.

अ) रस्त्यावर थुंकणे किंवा मलमुत्र विसर्जन करणे

ब) रस्त्यावर कचरा व राडारोडा टाकणे अथवा घाण टाकणे, कचरा टाकण्यासाठी कचरा पेटीचा वापर न करणे

क) रस्त्यावर बिल्डींग मटेरीयल टाकणे

ड) अनाधिकृत बॅनर्स,पोस्टर्स,जाहिरातीचे फलक उभारणे,सिनेमा/नाटकाच्या/सर्कसच्या जाहिराती लावणे.

इ) शासन आदेशानुसार २० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक वापरावर बंदीची कार्यवाही करणे.

फ) शासकीय व निमशासकीय कार्यालये तसेच शैक्षणिक संस्था यांच्या १०० मीटर परिघामध्ये गुटका विक्री करणेस बंदीची/खाण्यास बंदीची कारवाई करणे.

ग) सार्वजनिक रस्त्यावर अनाधिकृत ठिकाणी बसेस, वाहने,बंद वाहने,पार्क करणे आणि रहदारीस अडथळा निर्माण करणाऱ्या व्यक्तीवर कार्यवाही करणे.

प) महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ अन्वये कोणतेही न्युअसन्स/उपद्रवावर उपद्रव शोधक स्वार्ड तर्फे दंडात्मक कारवाई करता येईल व प्रशासकीय शुल्क वसुल करता येईल. उदा.मोठा कर्कश आवाज, ध्वनी प्रदुषण, फटाकेवरील बंदी तसेच रस्त्यावर पिण्याच्या पाण्याने गाडी धुणे किंवा पिण्याचे पाणी वाया घालविणे.

भ) या व्यतिरीक्त महानगरपालिकेच्या संप व अतिक्रमण बंदोबस्तासाठी या व इतर बाबीसाठीही न्युअरन्स डिटेक्टर सदस्यांची सेवा महानगरपालिकेला वेळोवेळी आवश्यकतेनुसार वापरता येऊ शकते.

उपरोक्त प्रमाणे उपद्रव पथकाकडे देण्यात आलेल्या कामाबाबत करावयाच्या प्रशासकीय शुल्क वसूली (दंड) प्रस्तुत प्रस्तावातील यादीप्रमाणे आकारणी करण्यास तसेच सदरील पथकास गणवेश,ओळखपत्र व मुंबई पोलीस कायदा १९५१ चे कलम २२ नुसार पोलीस आयुक्त यांच्यातर्फे अतिरीक्त पोलीस अधिकारी म्हणून प्रत्येक सदस्याची नेमणूक करण्यात येवून त्यांना पोलीस सनद देण्यात येईल. आणि ती पोलीस सनद, ओळखपत्र व त्यांच्या नावाची प्लेट सर्व सदस्यांना कामावर असतांना गणवेशावर लावणे आवश्यक राहील.

उपद्रव शोध पथकास महानगरपालिकेतर्फे प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते १३ प्रमाणे सुविधा व मानधन देण्यास आणि उपद्रव शोध पथकामध्ये काही महिला सदस्यांची नेमणूक करणेस आणि शासनाच्या आदेशानुसार २० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक विक्री/वापर करणाऱ्यांवर कारवाईसाठी प्लॅस्टीकची जाडी मोजण्याचे यंत्र आणि आवाजाची तिव्रता मोजून ध्वनी प्रदुषण

टाळण्यासाठी साऊंड लेव्हल मेजरींग मिटर किमान एक यंत्र प्रत्येक पथकाकडे देण्यास व एनडी स्कॉडचे काम हे सर्व दृष्टीने महानगरपालिकेला फायदेशीर असून शहरातील गैरशिस्तीने वागणाऱ्या नागरीकांना शिस्त लावण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी अत्यंत उपयुक्त असल्यामूळे, प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते १८ प्रमाणे दर्शविण्या आलेल्या दंडामध्ये स.सदस्य श्री.गजानन बारवाल यांनी जी रेट कमी करण्याबाबत सूचना केली त्यामध्ये दुरूस्ती करणेसह प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११८४/९ :**

आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद हे एक महत्वाचे औद्योगीक व ऐतिहासीक शहर आहे. शहराची लोकसंख्या जवळपास १२ लाख इतकी झालेली आहे. वाढत्या शहरीकरणामुळे अपघात, इतर गंभीर आजारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. भुकंप, साथीच्या आजारांचा उद्रेक यासारखी आपतकालीन परिस्थिती कित्येक वेळा उद्‌भवत असते. रूग्ण अत्यवस्थ झाल्यास सुरूवातीचा १ तास त्याला योग्य ते उपचार देण्यास महत्वाचा ठरतो अशा वेळेस सर्वसामान्य नागरीकास योग्य त्या रूग्णालयात योग्य वेळेत पोहचविण्याची कोणतीच यंत्रणा शहरात अस्तित्वात नाही व यासाठी आपालकालीन वैद्यकीय सेवा (इमजन्सी मेडीकल सर्व्हीसेस इ.एम.एस) सुरू करणे आवश्यक आहे. या यंत्रणेमध्ये औरंगाबाद महापालिका मुख्य भागीदार असेल. ज्या शासकीय किंवा खाजगी रूग्णालयामध्ये अतिदक्षता विभाग व स्वतःची अद्ययावत रूग्णवाहिका ज्यामध्ये अत्यवस्थ रूग्णांसाठी आवश्यक प्राथमिक उपचार करण्याची सोय असेल व इतर सर्व यंत्रणा (कारडीयाक मॉनीटर,डिफ्रीबीलेटर,ऑक्सीजन,रेसस्पीरेटर इत्यादी) उपलब्ध असेल, अशी रूग्णालये प्रथम दर्जाचे भागीदार असतील. या यंत्रणेची कार्यप्रणाली थोडक्यात अशी असेल.

१. इमरजन्सी मेडीकल कौन्सील ची स्थापना :-

| | | |
|---|---|---|
| मा.महापौर | - | अध्यक्ष |
| मा.सभापती,वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती | - | सहअध्यक्ष |
| मा.आयुक्त | - | उपाध्यक्ष |
| आरोग्य वैद्यकीय अधिकारी | - | सदस्य सचिव |
| वैद्यकीय अधिकारी तथा प्रकल्प प्रमुख | - | सहसचिव |
| मा.महापौर यांनी सुचविलेले ३ सदस्य | - | सदस्य |

२. ए.एम.एस.कॉन्सील शहरातील ज्या रूग्णालयात अति दक्षता विभाग आहे व ज्यांचेकडे इ.एम.एस. रूग्णवाहिका आहे. त्यांच्याकडून ठरावीक नमुन्यात अर्ज दाखल करून घेईल व प्रत्यक्ष पहाणी करून या यंत्रणेचे भागीदार होण्यासाठी प्रमाणित करेल. यासाठी त्यांना इ.एम.एस. कॉन्सीलने ठरविलेले वार्षिक सदस्यत्व शुल्क मनपाकडे भरावे लागेल.

३. कॉल सेंटरची स्थापना :- मनपातर्फे एक कॉल सेंटर चालविण्यात येईल ज्याचा नंबर एक विशिष्ट असेल. तो टोल फ्री असेल ज्या रूग्णालयांना इ.एम.एस कॉन्सीलने मान्यता दिलेली आहे अशा रूग्णालयाशी हा नंबर वायरलेस यंत्रणेने संलग्नीत असेल. या विशिष्ट नंबरवर नागरीकांना फोन केल्यास त्यांच्या घराच्या सर्वात जवळच्या व या इ.एम.एस. यंत्रणेचे भागदीर असतील अशा रूग्णालयाशी कॉल सेंटर तर्फे ताबडतोब संपर्क साधल्या जाईल व त्या रूग्णालयाची इ.एम.एस. रूग्णवाहिका त्यांच्या घरी पोहचेल रूग्णांच्या नातेवाईकांना दिलेल्या पसंतीच्या रूग्णालयात जे इ.एम.एस यंत्रणेचे भागीदार असतील त्या रूग्णालयात ही रूग्णवाहिका रूग्ण घेऊन जाईल. इ.एम.एस. रूग्णवाहिकेत व इतर रूग्णवाहिकेत तज्ञ डॉक्टर्स व इतर प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असेल व तो संबंधित भागीदार रूग्णालयाचा असेल. कॉल सेंटर्स फक्त समन्वयक म्हणून काम करेल.

४. या इ.एम.एस. यंत्रणेबद्दल व विशिष्ट नंबर बद्दल नागरीकांमध्ये जागृती होण्यासाठी मनपा शहरात होर्डींग्स, इतर प्रकारे जाहिरात करेल.

५. इ.एम.एस. रूग्णवाहिकेसाठी व इतर रूग्णवाहिकेसाठी इ.एम.एस. कॉन्सील ठरवले तेवढे शुल्क प्रति कॉल आकारण्यात येईल व ते त्या संबंधीत भागीदार रूग्णालयात आकारले जाईल. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे रूग्णाने पसंती दिल्यास व तो दारिद्रय रेषेखाली असल्यास मनपातर्फे इ.एम.एस कॉन्सील ठरवेल त्याप्रमाणे शुल्कात सुट देण्यात येईल.

६. महापालिका व इतर भागीदार रूग्णालयामध्ये करार करण्यात येईल (एम.ओ.यू) व त्यामधील अटी व शर्तींच्या भंग झाल्यास ए.एम.एस कॉन्सील तर्फे त्या भागीदाराचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल.

ही यंत्रणा फक्त मनपा हद्दीत पुरताच मर्यादीत राहील. या यंत्रणेमुळे शहरातील नागरीकांचे योग्य वेळी वैद्यकीय उपचार मिळून प्राण वाचू शकतील.

आपातकालीन वैद्यकीय सेवेसाठी वार्षिक अपेक्षित खर्च

| | अंदाजे खर्च |
|---|---|
| १. एकदाच करावयाचा खर्च (वन टाईम एक्सपेंडरी) | |
| (अ) सध्या मनपाकडे उपलब्ध असलेली एक रूग्णवाहिका अत्याधुनिक करणे.<br>(ॲटो लोडींग स्ट्रेचर, ऑक्सीजन सिलेंडर,)<br>कारडीयाक मॉनीटर,डिफीब्रीलेटर इत्यादी) | रू.१० लाख |
| (ब) कॉल सेंटरची स्थापना<br>(वायरलेस सिस्टीम+ जीपीआरएस+ कॉम्प्युटर+ हार्डवेअर) | रू.१० लाख |
| (अ+ब) | रू.२० लाख |
| २. इ.एम.एस.यंत्रणा चालविण्यासाठी येणारा वार्षिक अपेक्षित खर्च<br>(ॲन्यूअल रनिंग कॉस्ट)<br>(निमवैद्यकीय कर्मचारी पगार, आकस्मित खर्च इत्यादी) | रू.७ लाख |

सदरील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संतोष जेजूरकर :या विषयासंदर्भात मा.आयुक्तांनी माहिती द्यावी.

मा.आयुक्त :मेडीकल सर्व्हीसेसच्या बद्दल आहे. कुणालाही जर मेडीकल सर्व्हीसेस घेण्याची वेळ पडली तर एक थ्री डिजीट नंबर डायल करावा सर्वात जवळचे जे केद्र असेल तेथून त्यांना ॲब्यूलन्स पाठविण्याची व्यवस्था करावी. पूणे मध्ये १०५० नंबरवर ही सिस्टम खाजगी माध्यमातून चालू आहे. यात असे प्रस्तावित केले आहे की ज्या काही हॉस्पीटलमध्ये आयसीयू यूनीटस आहे. त्या हॉस्पीटलला एक पूर्ण ॲब्यूलन्स असेल त्यामध्ये डॉक्टरसह पूर्ण सुविधा असतात जो व्यक्ती आजारी आहे त्यांचे घरी २० ते २५ मिनिटात ॲब्यूलन्स पोहचायला पाहिजे जेणे करून त्या रूग्णांना सुविधा मिळेल व अशी कार्यवाही केल्यास ज्या दवाखान्यात जाणार आहे तेथे अगोदरच एक रूग्ण येत आहे याची माहिती होईल. त्यामूळे वेळीच त्या रूग्णास सेवा मिळेल. या संदर्भात पदाधिकारी यांचे समवेत बैठक घेतलेली असून पुणे मध्ये सध्या राबविली जाते त्या डॉक्टरांना बोलविले होते. बैठक होवून चर्चा झाली त्यामध्ये असे मॉडेल पूढे आले की ज्या ज्या हॉस्पीटलमध्ये आयसीयू आहे त्या हॉस्पीटलने एक ॲब्यूलन्स तातडीची सेवा देण्यासाठी तयार ठेवावी. त्यास महापालिका वायरलेस सेट लावून देणार जे कॉल सेन्टर राहतील तेथून त्यांना माहिती देणार अशा सुविधा आंध्रप्रदेश ,तामिळनाडू ,पूणे शहरात

तसेच गुजरात मध्ये होत आहे काही दिवसात पूर्ण राज्यामध्ये ही सुविधा होईल.

श्री.संजय जोशी :चार चाकी ॲब्यूलन्स जशी आहे त्याप्रमाणे दोन चाकी ॲब्युलन्स ही ठेवावी कारण जेथे रस्ता लहान आहे तेथे ॲब्यूलन्स जाण्याची शक्यता कमी असते पूणे येथे पेशकर हॉस्पीटलमध्ये दोनचाकी ॲब्यूलन्स आहे.

मा.आयुक्त :डॉक्टर जावून काय करणार आहे जर इस्टयूमेन्ट नसेल तर पूणे मध्ये दोन चाकी ॲब्यूलसचे नियोजन सक्सेस झालेले नाही. डॉक्टर पाठीमागे बसून पेशन्टला हाताळू शकत नाही.

मा.महापौर :या बाबत अगोदर निर्णय घेवू जर गरज पडली तर दोन चाकी ॲब्यूलन्स सुरू करण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल :जे डॉक्टर महापालिकेकडे आहे ते व्यवस्थीत काम करीत नाही हे काम त्यांचेकडून करून घेणे अपेक्षीतच नाही.

मा.महापौर :शहरातील जे मोठमोठे जसे बजाज, एमजीएम, धुत, हेडगेवार तसेच माणिक हॉस्पीटल असे मोठमोठे हॉस्पीटल एकत्रित येवून त्याचे एजन्सी म्हणून महापालिका काम करणार असून महापालिकेचे कॉल सेन्टर असणार आहे महापालिकेकडे एक ॲब्यूलन्स राहिल जर चिकलठाणा येथील रूग्ण असेल तर जवळच धुत हॉस्पीटलमध्ये कॉल दिला जाईल. जर त्या रूग्णास बजाज हॉस्पीटला जायचे असेल तर जे काही भाडे असेल ते द्यावे लागेल एवढाच फरक पडेल. एखादी व्यक्ती गरीब असेल ते भाडे देवू शकत नसेल तर ५० टक्के भाडे अशा वेळी महापालिका देईल. त्या संबंधीची नियमावली वगैरे आपल्या समोर येईल. यास बेसीक म्हणून आपल्याला मंजूरी द्यायची आहे.

श्री.संजय जोशी :ॲब्यूलन्स व डॉक्टरांच्या फिस सही ५००रू. आकारणार काय?

मा.आयुक्त :जर लहानशी इजा जरी झाली व ॲब्यूलन्स मागविली परंतू मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली त्यामध्ये आरोग्य सभापती व कमेटी असेल ते रेट डिसाईड करतील किती रेट निश्चित करायचे हे कमेटी निर्णय घेतील.

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वाढत्या शहरीकरणामुळे अपघात, इतर गंभीर आजारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यामूळे,भुकंप, साथीच्या आजारांचा उद्रेक यासारखी आपत्कालीन परिस्थिती कित्येक वेळा उद्‌भवत असते. रूग्ण अत्यवस्थ झाल्यास सुरूवातीचा १ तास त्याला योग्य ते उपचार देण्यास महत्वाचा ठरतो अशा वेळेस सर्वसामान्य नागरीकास योग्य त्या रूग्णालयात योग्य वेळेत पोहचविण्याची कोणतीच यंत्रणा शहरात अस्तित्वात नसल्यामूळे,यासाठी आपत्कालीन वैद्यकीय सेवा (इमजन्सी मेडीकल सर्व्हीसेस इ.एम.एस) सुरू करणेस व या यंत्रणेमध्ये औरंगाबाद महापालिका मुख्य भागीदार असेल,ज्या शासकीय किंवा खाजगी रूग्णालयामध्ये अतिदक्षता विभाग व स्वत:ची अद्ययावत रूग्णवाहिका ज्यामध्ये अत्यवस्थ रूग्णांसाठी आवश्यक प्राथमिक उपचार करण्याची सोय असेल व इतर सर्व यंत्रणा (कारडीयाक मॉनीटर,डिफ्रीबीलेटर,ऑक्सीजन,रेसस्पीरेटर इत्यादी) उपलब्ध असेल, अशी रूग्णालये प्रथम दर्जाचे भागीदार असतील,या यंत्रणेची कार्यप्रणाली प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ६ प्रमाणे असेल. तसेच ही यंत्रणा फक्त महानगरपालिका हद्दी पुरतीच मर्यादीत राहील. आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवेसाठी वार्षिक खर्च प्रस्तुत प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राहील, यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.११८५/१० :</u>**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत वसाहती ह्या महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम -२००१ अंतर्गत नियमाधीन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. परंतू महानगरपालिका हद्दीतील काही वसाहती ह्या मंजूर विकास योजनेतील आरक्षणाने बाधीत होतात अशा वसाहती मधील मिळकती गुंठेवारी अधिनियमान्वये नियमाधीन करणे बाबत जा.क्र./मनपा/नरवि/गुंठे/१६९२/२००४दिनांक २ जुलै २००४ च्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आले आहे.

त्यानुषंगाने गुंठेवा/१००४/९८८/प्र.क्र./१०६/२००४/नवि-३० नगर विकास विभाग मंत्रालय,मुंबई दिनांक १४ सप्टेबंर २००४ पाठविण्यात आलेल्या शासनाच्या अभिप्रायात महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम -२००१ च्या कलम ५ (१) मध्ये गुंठेवारी विकास नियमाधीन केल्यावर संबंधीत जागेबाबत विकास योजना किंवा प्रादेशिक योजनेच्या तरतुदीमध्ये आपोआप फेरबदल झाल्याचे मानण्यात येईल अशी स्पष्ट तरतूद असल्याचे नमुद करून महराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ३७ ची आवश्यकता नाही असे म्हटले आहे. व दिनांक ०६.०५.२००२ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयाकडे झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताद्वारे सार्वजनिक प्रयोजनार्थ आरक्षीत असलेल्या भूखंडावर अनाधिकृत बांधकामे नियमाधिन करतांना सार्वजनिक प्रयोजनार्थ आरक्षीत असलेल्या जागांची खरोखरच आवश्यकता आहे काय? या बाबतचा निर्णय नियोजन प्राधिकरणाने द्यावा व सार्वजनिक हितासाठी जागा आवश्यक नसतील अशा जमिनीवर अस्तित्वात असलेले भूखंड/अभिन्यास नियमीत करता येतील असे सर्व महानगरपालिकांना कळविले आहे.

महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम -२००१ अंतर्गत विविध अनाधिकृत वसाहतीचा Total Station Survey करण्यांत आला असून विकास योजनेनूसार अशा वसाहती ज्या आरक्षण असलेल्या ठिकाणावर वसलेल्या आहेत तसेच सदरील वसाहतीमध्ये महानगरपालिकेतर्फे ह्या पूर्वी सर्व सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या आहे. अशा वसाहतीमध्ये कोणत्याही प्रकारची मोकळी जागा उपलब्ध नाही आहे. तसेच सर्व भूखंडाचा विकास झाला असून घरे वसलेली आहेत.

उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भाने सोबत जोडलेल्या परिशिष्ठातील आरक्षण खालील अटी नूसार वगळण्यात यावीत.

०१. आरक्षणातील ज्या मिळकती १ जानेवारी २००१ पूर्वीची आहेत तेवढेच क्षेत्र आरक्षण वगळण्यास पात्र राहील.

०२. १ जानेवारी २००१ नंतरच्या मिळकतीचे क्षेत्र आरक्षणातून वगळण्यात येणार नाही.

०३. वसाहतीतील सहणजागा ही १ जानेवारी २००१ नंतरची असेल तर ती आरक्षणातून वगळली जाणार नाही.

जसे -जसे नागरीकांचे प्रस्ताव प्राप्त होतील त्यानुषंगाने प्राप्त परिस्थितीचा विचार करून वेळोवेळी आरक्षणाचे प्रस्ताव सादर करण्यात येतील.

वरील सर्व बाबीसह आरक्षण वगळण्याच्या कार्यवाहीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**<u>वगळण्यात येणाऱ्या आरक्षणाचे परिशिष्ट</u>**

| अ.क्र. | वसाहतीचे नाव | आरक्षण क्र. | आरक्षण प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | मजनुहिल | १६२ | G | सदरील वसाहतीमधील ४६३६ चौ.मी.मोकळी जागा पिकनीक सेंटर/गार्डनसाठी तसेच ३०००.०० चौ.मी. जागा दक्षिणेकडील १२.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्यासाठी महानगरपालिकेला दि.१८.०७.१९८५ रोजी ताबा पावती नुसार देण्यात आली आहे. त्या जागे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | व्यतिरिक्त मोकळ्या जागेपैकी रेखाकंन क्षेत्राच्या १०% भूखंड नियोजन प्राधिकरणाकडे मोफत निहीत करण्यांत येईल. सदर रेखाकंनात १०% जागे व्यतिरिक्त ०१ जानेवारी २००१ पूर्वी विक्री न केलेली सहन जागा असेल तर ती सहन जागा महानगरपालिकेस गुंठेवारी अंतर्गत विकासासाठी विनामोबदला हस्तांतरीत करावी त्याप्रमाणे प्रकरण क्र.AMC/TPS/१६४/१९८२ दिनांक ०६.०८.१९८२ अन्वये विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडील भूसंपादनाची कार्यवाही रद्द करणे या अटीवर आरक्षण रद्द करणे योग्य. |
| ०२ | सुंदरनगर नागेश्वरवाडी भोईवाडा | ९५, ९६, ९७ | G HD HS | सदरील वसाहत ही बऱ्याच वर्षापासून वसलेली असून वसाहतीस ह्यापूर्वी महानगरपालिकेतर्फे सर्व सोयी सुविधा पुरविण्यात आल्या असून सद्यपरिस्थितीत वसाहतीमध्ये कोठेही मोकळी जागा उपलब्ध नाही. करीता आरक्षण रद्द करणे योग्य. |
| ०३ | कैलासनगर, दादा कॉलनी | २१२, २१३, २१४ | G P.S. P.G. | वरीलप्रमाणे. |
| ०४ | विजयनगर गारखेडा | २३८, २४४ | P.S. H.S. | वसाहतीमधील मोकळा भूखंड गुंठेवारी विकास अधिनियम २००१ अंतर्गत कलम-३/२/अे नुसार कार्यवाही करून उर्वरीत भूखंड गुंठेवारी विकास अधिनियम २००१ अंतर्गत नियमितीकरणाकरीता जे पात्र असतील, अशा भूखंडावरील आरक्षण रद्द करणे योग्य. |
| ०५ | नारळीबाग | ६६ १०० १०१ १०२ | H.D. H.D. S.C. P.G. | सदर वसाहतीचा समावेश हेरीटेज अंतर्गत आहे. सदर बाबतीत शासन स्तरावर निर्णय होणे बाकी आहे. सदर निर्णयाच्या अधीन राहून आरक्षण रद्द करणे योग्य. |

<u>**संवाद :**</u>

श्री.सलीम खॉन :मी पत्र दिलेले आहे टाउन हॉलच्या मागे नुरकॉलनी आहे समावेश करावा.

श्री.रविकांत गवळी :शहरातील आणखी ही काही वसाहती आहेत त्यांचा समावेश करावा.

मा.महापौर : अशा प्रकारच्या ज्या वसाहती असतील त्याचे इम्प्लीमेन्ट करावे नुरकॉलनीचा यात समावेश करावा. यास मान्यता देण्यात येते.

श्री.संतोष खेंडके :जी घरे सन २००१ च्या नंतरची आहे त्याचे गुंठेवारीत पैसे भरणा करून घेतला जात नाही या संदर्भात २००६ पर्यंच्या घराचे गुंठेवारीत समावेश करून घ्यावे असा ठराव घेतला होता व शासनास पाठविलेला होता काय पाठपूरावा केलेला आहे. यात ओनर बदलत गेले त्यामूळे अडचण निर्माण झालेली आहे.

मा.आयुक्त :दुसरे करायचे असेल तर ते वेगळे घ्यावे लागेल. शासनाकडे दोन तीन वेळेस पत्र देवून पाठपूरावा केलेला आहे परंतू अद्याप कार्यवाही शासनाने केलेली नाही. २००१पूर्वीचे जे घरे असतील मतदार यादीत नाव असेल तरी अधिकृत धरले जाईल.२००१ च्या नंतर कोणतेही घर शासनाच्या नियमानूसार गुंठेवारीत अधिकृत जो पर्यंत शासन कायद्यात बदल करत नाही तोपर्यंत करता येणार नाही.

मा.महापौर :या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | :एकाच कॉलनीत ५० टक्के घरे ही २००१ च्या पूर्वी असेल व ५० टक्के ही २००१ च्या नंतरची असेल तर त्यांनाही गुंठेवारीत रेग्युलाईज करून घ्यावे अशी विनंती आहे. |
| मा.आयुक्त | : २००१ च्या कायद्यात दुरूस्ती नाही. मतदार यादीत नाही. शासन जो पर्यंत दुरूस्ती करत नाही तो पर्यंत करता येत नाही. |
| श्री.भगवान घडमोडे | :गुंठेवारीचे कामास गती देण्यात यावी. |
| सौ.पार्वतीबाई वाघमारे | :ज्या नागरीकांनी गुंठेवारीचे पैसे भरणा केले अशा मोतीनगर,विश्रांतीनगर भागात टॅक्सच आलेले नाही ताबडतोब या भागात चलन भरणा करून घ्यावे या भागातील टँकर बंद केलेले आहे पिण्याचे पाण्याची व्यवस्था करावी. |
| सौ.रेखा काथार | :माझा वार्ड ही गुंठेवारीत येतो २००१ नंतरची काही घरे आहेत त्यांना गुंठेवारीत रेग्यूलाईज करण्यात यावे. |
| श्री.संतोष खेंडके | :गुंठेवारीत २००१ ला खरेदी ५ खरेदीदार झाले. प्रथम खरेदीदाराच्या व्यवहाराची प्रत लावली तर गुंठेवारीत घ्यावे. |
| मा.आयुक्त | :सन २००१ पूर्वीचे घर असेल ओनर बदलला असेल तर ते घर रेग्युलाईज करता येते पूर्ण रेकॉर्ड द्यावेत. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत वसाहती ह्या महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम -२००१ अंतर्गत नियमाधीन करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्यामूळे, गुंठेवा/१००४/९८८/प्र.क्र./१०६/२००४/नवि-३० नगर विकास विभाग मंत्रालय,मुंबई दिनांक १४ सप्टेबंर २००४ पाठविण्यात आलेल्या शासनाच्या अभिप्रायाच्या संदर्भाने प्रस्तुत प्रस्तावातील परिशिष्ठातील आरक्षण शेरा रकान्यातील तपशिलासह खालील अटी नूसार वगळण्यास मान्यता देण्यांत येते.

०१. आरक्षणातील ज्या मिळकती १ जानेवारी २००१ पूर्वीची आहेत तेवढेच क्षेत्र आरक्षण वगळण्यास पात्र राहील.

०२. १ जानेवारी २००१ नंतरच्या मिळकतीचे क्षेत्र आरक्षणातून वगळण्यात येणार नाही.

०३. वसाहतीतील सहणजागा ही १ जानेवारी २००१ नंतरची असेल तर ती आरक्षणातून वगळली जाणार नाही.

जसे -जसे नागरीकांचे प्रस्ताव प्राप्त होतील त्यानुषंगाने प्राप्त परिस्थितीचा विचार करून वेळोवेळी आरक्षणाचे प्रस्ताव सादर करण्यात येतील.

तसेच अशा प्रकारच्या ज्या वसाहती असतील,त्याचे इम्प्लीमेन्ट करावे, व नुर कॉलनीचा यात समावेश करावा यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## स.सदस्यांचे प्रस्ताव

**विषय क्र.११८६/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जयभवानीनगर वार्ड क्र.८१ येथील नाला बांधकामासाठी अंदाजपत्रक तयार आहे. सदर कामासाठी १२ व्या वित्त आयोगाच्या उपलब्ध असलेल्या निधीमधून १०० लक्ष (एक कोटी) नाल्यासाठी देऊन सदर भागातील जनतेचा होणारा त्रास दुर करावा ही विनंती. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.पुष्पाताई शिंदे, श्री.काशिनाथ कोकाटे

अनुमोदक : श्री.दामुअण्णा शिंदे, श्रीमती जयश्री किवळेकर

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी :१२ व्या वित्त आयोगाचे पैसे शिल्लक आहे काय नसेल तर प्रस्ताव घेवून उपयोग नाही.

मा.आयुक्त :१२ व्या वित्त आयोगाचे पैसे शिल्लक नाही. या वर्षी पून्हा मिळण्याची अपेक्षा आहे.

श्री.संतोष खेंडके :याप्रमाणे इतर ही वसाहती आहे तेथेही काम व्हावे.

मा.महापौर :सिडकोचे पूर्ण पाणी एन ३,४ ठाकरेनगर भागाकडून या ठिकाणी जावून लोकांच्या घरात पाणी जाते. त्यामूळे यास मंजूरी देण्याची गरज आहे. हा विषय मंजूर करण्यात येतो १२ व्या वित्त आयोगाचे रक्कम शिल्लक असेल तर त्या बजेट मधून करावे.

श्री.रविकांत गवळी : १२ व्या वित्त आयोगाचे १.५० कोटी आलेले आहे त्यातील १.२० कोटी हे खामनदीसाठी असून दोन वेळेस रिटेंडर झालेले आहे वेळीच खर्च केला नाही लॅप्स होवू शकतो. याचा विचार करावा.

मा.आयुक्त :जेवढे वित्त आयोगाचे पैसे येतात त्यापैकी ५७ टक्के हे साफसफाईवर खर्च करावे लागते. ही रक्कम वगळून उर्वरीत जी रक्कम आहे त्याचा पूर्ण विनीयोग झालेला आहे. खामनदीवरील दोन्ही बाजूचे अतिक्रमण काढल्याशिवाय काम करू शकत नाही यासाठी १७ ते १८ कोटी खर्च लागेल यासाठी ई टेडरींग कमीत कमी २१ दिवसाचे निघेल.

श्री.रविकांत गवळी :१.२० कोटी खामनदीसाठी मंजूर केले होते ते इतर कामासाठी खर्च केलेले आहे का?

मा.आयुक्त :४.७१ कोटी कचऱ्यासाठी उपलब्ध आहे त्याचा वापर सॉलीडवेस्ट मॅनेजमेन्ट साठी करता येते. ते पुढील बैठकीत आपल्या समोर प्रस्तावीत केले जाईल.

श्री.रविकांत गवळी :खामनदीचे काम होणार की नाही याचा खुलासा द्यावा.

मा.आयुक्त :अतिक्रमण काढल्यानंतर १८ कोटी रेस करू शकतो. बजेटमधील ही निधी नाही. हा प्रस्ताव सदस्यांनी ठेवलेला आहे त्यास जेव्हा मंजूरी येईल त्यावेळी निधी खर्च करण्याचे नियम बघीतले जाईल त्यानूसार कार्यवाही होईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जयभवानीनगर वार्ड क्र.८१ येथील नाला बांधकामासाठी अंदाजपत्रक तयार असल्यामूळे,सदर कामासाठी १२ व्या वित्त आयोगाच्या उपलब्ध असलेल्या निधीमधून र.रू.१०० लक्ष(एक कोटी) देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

सौ.लता दलाल : यात दोन विषय यापूर्वी झालेले आहे ते रद्द करावे.

मा.महापौर : विषय क्र.१७ यापूर्वीच झालेला आहे आता मंजूर करण्याची गरज नाही. हा विषय वगळण्यात येत आहे. विषय क्र.१२ ते २४ विषय क्र.१७ सोडून मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.११८७/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, W ३१ (अनुक्रमांक ४) नवयुग कॉलनी येथे खुली जागेस संरक्षण भिंत बांधणे व सांस्कृतिक सभागृह बांधणे हया कामा शिवाय भिमनगर येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसवणे ही विनंती.

सुचक : श्री.मिलींद दाभाडे अनुमोदक :श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.जगताप संजय उत्तमराव

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पातील पान क्र. W ३१ (अनुक्रमांक ४) नवयुग कॉलनी येथे खुली जागेस संरक्षण भिंत बांधणे व सांस्कृतिक सभागृह बांधणे **याऐवजी** भिमनगर येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसवणे असे लेखाशिर्ष करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११८८/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००७-२००८ पु. पान क्र.डब्ल्यु २०६ अ.क्र.११

| कामाचे नांव | लेखा शिर्षक बदलणे |
|---|---|
| वार्ड क्र. ३०, हर्षनगर, येथील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन स्थलांतर करणे तरतुद ७ लक्ष आहे. | या कामाऐवजी वार्ड क्र.३० विविध ठिकाणी १२ मीटरचे मिनी हायमॉस्ट बसविणे, एकुण रक्कम ७ लक्ष. |

तरी सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.शोभा मिटकर    अनुमोदक : श्रीमती छाया राऊत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,अर्थसंकल्प २००७-०८ पु. पान क्र.डब्ल्यु २०६ अ.क्र.११ ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| कामाचे नांव | लेखा शिर्षक बदलणे |
|---|---|
| वार्ड क्र. ३०, हर्षनगर, येथील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन स्थलांतर करणे तरतुद ७ लक्ष आहे. | या कामाऐवजी वार्ड क्र.३० विविध ठिकाणी १२ मीटरचे मिनी हायमॉस्ट बसविणे, एकुण रक्कम ७ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११८९/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात वीरशैव समाजाची बरीच संख्या असून वीरशैव व हिंदू धर्मीयांचे आराध्य दैवत "महात्मा बसवेश्वर"यांचा पुतळा शहरात नाही. करीता जालना रोडवरील आकाशवाणी जवळील महात्मा बसवेश्वर चौकात औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने "महात्मा बसवेश्वर" यांचा पुतळा उभारण्यात यावा.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.सरला सखाराम पोळ, श्री.प्रशांत देसरडा

अनुमोदक : श्रीमती आशा बिनवडे, श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोडवरील आकाशवाणी जवळील महात्मा बसवेश्वर चौकात औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने "महात्मा बसवेश्वर" यांचा पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९०/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००७-२००८ अर्थसंकल्पात पान क्र.W-२३५ अ.क्र.२७ सिंधी कॉलनी, मित्रनगर व लिमयेवाडी भागासाठी नविन जलवाहिनी टाकणे रू.१० लाख असे आहे.

तरी आपणास विनंती करते की, सदरील शिर्षक बदलुन सिंधी कॉलनी मध्ये डांबरीकरण करणे असे करण्यात यावे.

सुचक :सौ.हर्षमाला विजयकुमार पाटणी अनुमोदक : श्री. सुरेंद्रजितसिंग सबरवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-०८ अर्थसंकल्पात पान क्र.W-२३५ अ.क्र.२७ सिंधी कॉलनी, मित्रनगर व लिमयेवाडी भागासाठी नविन जलवाहिनी टाकणे रू.१० लाख असे आहे.

तरी आपणास विनंती करते की, सदरील शिर्षक बदलुन सिंधी कॉलनी मध्ये डांबरीकरण करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९१/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००७-२००८ मधील प्रभाग क्र.६५ मधील विकास कामाचे लेखाशिर्ष मध्ये बदल करण्याबाबत.

| अ.क्र. | अर्थसंकल्प पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| ३६ | डब्ल्यु-१२४ | प्रभाग क्र.६५ एस.बी.कॉलनी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे-२ लक्ष | रमानगर येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. |

सुचक : श्री.मधुकर सावंत अनुमोदक : श्री.रवि कावडे, श्री.संजय जोशी, श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-२००८ मधील प्रभाग क्र.६५ मधील विकास कामाचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| ३६ | डब्ल्यु-१२४ | प्रभाग क्र.६५ एस.बी.कॉलनी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे-२ लक्ष | रमानगर येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९२/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने, औरंगाबाद जिल्हा व शहर तालीम संघ व महानगरपालिका औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने ५१ वे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे प्रौढगट कुस्ती अधिवेशन व राज्य अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा-२००७ औरंगाबाद येथील मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर दिनांक ११ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित केलेल्या आहेत. या स्पर्धेचे भव्य प्रमाणात आयोजन करण्यात येणार असुन त्यासाठी राज्यभरातून स्पर्धक भाग घेणार आहेत. स्पर्धेचे स्वरूप पाहता मोठया प्रमाणात खर्च लागणार असल्याने स्पर्धेकरीता महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत मिळण्याची विनंती औरंगाबाद जिल्हा व शहर तालीम संघ यांच्या वतीने महानगरपालिकेच्या सर्व स.पदाधिकाऱ्यांकडे करण्यात आलेली आहे. अशा प्रकारची स्पर्धा आपल्या शहरात प्रथमच आयोजित करण्यात येत आहे. करीता कुस्तीगीर अधिवेशन व या स्पर्धेसाठी महानगरपालिकेच्या वतीने रू.२५.०० लक्ष (अक्षरी पंचवीस लाख रूपये) आर्थिक मदत देण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : सौ.लता दलाल, श्री.त्र्यंबक तुपे, श्री.संतोष जेजुरकर,

श्री.प्रशांत देसरडा, श्री.बाबासाहेब डांगे, श्री.विनायकराव पांडे
अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.अ.रशीद खान (मामू) श्री.संजय जोशी,
श्री.वसंत नरवडे पाटील, श्री.भगवान घडमोडे, श्री.किशोर तुलसीबागवाले

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव यापूर्वीच मंजूर करण्यांत आलेला असल्यामूळे यातून हा प्रस्ताव वगळण्यास मान्यता देण्यांत येते.

**विषय क्र.११९३/१८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१५ अंतर्गत विकास काम करणे अत्यंत आवश्यक असुन खालील अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलुन विकास काम करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नवीन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.१५ मध्ये विविध ठिकाणी विंधन विहीर घेणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु २१५ तरतुद रक्कम ३ लक्ष. | वार्ड क्र.१५ जी सेक्टर मधील बोकन टेलर यांचे घरापासून ते शॉपींग सेंटर पर्यंत चंदु कुलकर्णी यांचे दुकाना पर्यंत नालीची रूंदी व उंची वाढविणे |

सुचक : श्री.मोहन मेघावाले
अनुमोदक :श्री. अनिल जैस्वाल, श्री.दामुअण्णा शिंदे, सौ.रेखा कैलास काथार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१५ करीता अर्थसंकल्पात असलेल्या खालीलप्रमाणे तरतूदीचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नवीन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | वार्ड क्र.१५ मध्ये विविध ठिकाणी विंधन विहीर घेणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु २१५ तरतुद र.रू.३ लक्ष. | वार्ड क्र.१५ जी सेक्टर मधील बोकन टेलर यांचे घरापासून ते शॉपींग सेंटर पर्यंत चंदु कुलकर्णी यांचे दुकाना पर्यंत नालीची रूंदी व उंची वाढविणे |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९४/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. ४४ अशोक यांचे गल्ली जुनी लाईन काढून नविन ड्रेनेज लाईन टाकणे पान क्र.W-१०८ अ.क्र.-१६ रूपये १.५ लक्ष व साबेर मटन शॉप समोरील गल्लीत जूनी लाईन काढून नविन ड्रेनेज लाईन टाकणें पान क्र.W-१०८ अ.क्र. १७ रूपये १.०० लक्ष व डॉ.रज्जाक यांचे गल्ली जूनी लाईन काढून नविन ड्रेनेज लाईन टाकणे पान क्र.W-१०८ अ.क्र.१८ रूपये १.०० लक्ष.

**या ऐवजी**

वार्ड क्र.४४ किराडपूरा मध्ये ड्रेनेज लाईन, पेव्हर ब्लॉक दुरूस्ती, संरक्षित भिंत दुरूस्ती, गटार फरशी दुरूस्ती, काच मुरूम इ. आवश्यकतेनुसार फुटकळ कामे रक्कम ३.५० लक्ष वरील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेवर मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.शेख इब्राहीम पटेल अनुमोदक :श्री.संजय जगताप

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४४ अशोक यांचे गल्ली जुनी लाईन काढून नविन ड्रेनेज लाईन टाकणे पान क्र.W-१०८ अ.क्र.-१६ रूपये १.५ लक्ष व साबेर मटन शॉप समोरील गल्लीत जूनी लाईन काढून नविन ड्रेनेज लाईन टाकणें पान क्र.W-१०८ अ.क्र. १७ रूपये १.०० लक्ष व डॉ.रज्जाक यांचे गल्ली जूनी लाईन काढून नविन ड्रेनेज लाईन टाकणे पान क्र.W-१०८ अ.क्र.१८ रूपये १.०० लक्ष.

**या ऐवजी**

वार्ड क्र.४४ किराडपूरा मध्ये ड्रेनेज लाईन, पेव्हर ब्लॉक दुरूस्ती, संरक्षित भिंत दुरूस्ती, गटार फरशी दुरूस्ती, काच मुरूम इ.आवश्यकतेनुसार फुटकळ कामे र.रू. ३.५० लक्षास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९५/२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७३ अंतर्गत विविध विकास कामे करणे अत्यंत आवश्यक असुन खालील अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलुन विकास कामे करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | प्र.क्र.७३ एस.टी. कॉलनी अंतर्गत ठाकरेनगर, महाजन कॉलनी येथे डांबरीकरण करणे अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु २१९ अ.क्र.१८ तरतुद रक्कम १० लक्ष | प्रबोधनकार ठाकरे नगर सेक्टर सी येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे. |

सुचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे अनुमोदक : श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७३ करीता अर्थसंकल्पात असलेल्या खालीलप्रमाणे कामांचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | प्र.क्र.७३ एस.टी. कॉलनी अंतर्गत ठाकरेनगर, महाजन कॉलनी येथे डांबरीकरण करणे अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु २१९ अ.क्र.१८ तरतुद रक्कम १० लक्ष | प्रबोधनकार ठाकरे नगर सेक्टर सी येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९६/२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| W२०३/१४ | कांचनवाडी येथील शिवाजी महाराज पुतळया जवळ बहुउद्देशिय हॉल बांधणे ५.०० लक्ष | १.कांचनवाडी येथे हायमास्ट उभारणे<br>२.नक्षत्रवाडी येथे हायमास्ट उभारणे<br>३.वाल्मी नाका अयेथे हायमास्ट उभारणे } १०.०० लक्ष |
| W२२९/१३ | वार्ड क्र.९८ राजवाडा बौध्दविहार येथे बहुउद्देशिय हॉल बांधणे-५.०० लक्ष | |

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.गजानन बारवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W२०३/१४ | कांचनवाडी येथील शिवाजी महाराज पुतळया जवळ बहुउद्देशिय हॉल बांधणे ५.०० लक्ष | १.कांचनवाडी येथे हायमास्ट उभारणे<br>२.नक्षत्रवाडी येथे हायमास्ट उभारणे<br>३.वाल्मी नाका अयेथे हायमास्ट उभारणे } १०.०० लक्ष |
| W२२९/१३ | वार्ड क्र.९८ राजवाडा बौध्दविहार येथे बहुउद्देशिय हॉल बांधणे-५.०० लक्ष | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९७/२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१६ अंतर्गत विविध विकास कामे करणे अत्यंत आवश्यक असुन खालील अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलुन विकास कामे करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | **रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क**<br>वार्ड क्र.१६ रस्त्यावरील पावसाचे पाणी वाहुन जाणेसाठी स्ट्रॉम वॉटर ड्रेन तयार करणे, अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.डब्ल्यु १७९ तरतुद र.५ लक्ष. | **शहरी भागात खुल्या गटारी बांधणे**<br>वार्ड क्र.१६ अंतर्गत विविध ठिकाणी पाणी वाहून जाणेसाठी भूमिगत गटार बांधणेसाठी अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.९१ वर ६ लक्ष्ची तरतुद आहे. त्यात पृष्ठ क्र.डब्ल्यु १७९ वरील अ.क्र.१ वरील तरतुद ५ लक्ष वळती करून एकत्रित ११ लक्षचे काम करण्यात यावे. |

सुचक : सौ.रजनी जोशी अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१६ करीता अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | **रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क**<br>वार्ड क्र.१६ रस्त्यावरील पावसाचे पाणी वाहुन जाणेसाठी स्ट्रॉम वॉटर ड्रेन तयार करणे, अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.डब्ल्यु १७९ तरतुद र.५ लक्ष. | **शहरी भागात खुल्या गटारी बांधणे**<br>वार्ड क्र.१६ अंतर्गत विविध ठिकाणी पाणी वाहून जाणेसाठी भूमिगत गटार बांधणेसाठी अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.९१ वर ६ लक्ष्ची तरतुद आहे. त्यात पृष्ठ क्र.डब्ल्यु १७९ वरील अ.क्र.१ वरील तरतुद ५ लक्ष वळती करून एकत्रित ११ लक्षचे काम करण्यात यावे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११९८/२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२४ एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत एन-१ मधील हरितपट्टे विकसीत करणे हे वृक्षप्राधिकरण या लेखाशिर्षकाखलील टाकण्यात आलेले आहे. याचे लेखाशिर्षक बदलुन हे विविध योजनेअंतर्गत भूखंडाचे संरक्षण करणे या लेखाशिर्षकाखाली करण्यात यावे. ही नम्र विनंती.

लेखाशिर्षक :- विविध विकास योजनेअंतर्गत भूखंडाचे संरक्षण.

कामाचे नांव :- वार्ड क्र.२४ एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत एन-१ मधील हरितपट्टे विकसीत करणे. कृपया लेखाशिर्षक बदलण्यात यावे हि नम्र विनंती.

सुचकः सौ.दिपाली सुनिल पाटील अनुमोदकः श्रीमती आशा बिनवडे, श्रीमती अंजली कोंडेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२४ एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत एन-१ मधील हरितपट्टे विकसीत करणे हे वृक्षप्राधिकरण या लेखाशिर्षकाखलील टाकण्यात आलेले आहे. याचे लेखाशिर्षक बदलुन हे विविध योजनेअंतर्गत भूखंडाचे संरक्षण करणे या लेखाशिर्षकाखाली करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

लेखाशिर्षक :- विविध विकास योजनेअंतर्गत भूखंडाचे संरक्षण.

कामाचे नांव :- वार्ड क्र.२४ एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत एन-१ मधील हरितपट्टे विकसीत करणे.

**विषय क्र.११९९/२४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, म.न.पा. अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये पृष्ठ क्र.W-५९ वर अ.क्र.९ प्रभाग क्र.१० जयसींगपुरा अंतर्गत विविध भागात पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी ७.०० लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. सदर रक्कमेतुन वार्ड क्र.१० जयसींगपुरा कब्रस्थानाच्या ईद व बकरीईद च्या कामानिमित्त विविध कामे करणेसाठी रू.१,३५,००० वळती करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सलीम खान यासीन खान अनुमोदक : श्री.संजय जगताप

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, म.न.पा. अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये पृष्ठ क्र.W-५९ वर अ.क्र.९ प्रभाग क्र.१० जयसींगपुरा अंतर्गत विविध भागात पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रू.७.०० लक्षची ठेवण्यांत आलेल्या तरतुदीमधून वार्ड क्र.१० जयसींगपुरा कब्रस्थानाच्या ईद व बकरीईद च्या कामानिमित्त विविध कामे करणेसाठी र.रू.१,३५,००० वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र.१२००/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.आसाराम काकाजी मुगदिया हे या महानगरपालिका पुर्वी म्हणजे सन १९५२ ते १९६७ पर्यंत चार वेळेस नगर सेवक म्हणून निवडून आले होते व हंगामी काळात ते नगर अध्यक्षही होते अनेक वेळा उप नगराध्यक्ष म्हणून ही काम केलेले आहे. म्हणून गुलमंडी येथील ॲड अरूणचंद कापडिया यांच्या घरापासून ते सिटीचौक येथील गुलशा क्लॉथ स्टोर्स पर्यंत रस्त्याला"श्री.आसाराम काकाजी मुगदिया मार्ग" असे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार अनुमोदक : श्री.अब्दुल रशिद खान (मामू)

**संवाद :**

श्री.संतोष जेजूरकर :प्रस्तावाचे सुचक अनुमोदक उपस्थित नाही रद्य करण्यात यावे.

मा.महापौर :प्रस्तावाचे सुचक व अनुमोदक नसल्याने प्रस्ताव रद्य करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे सुचक व अनुमोदक उपस्थित नसल्याने सदर प्रस्ताव रद्द करण्यांत आला.

**विषय क्र.१२०१/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे चालविण्यात येणाऱ्या शहर बस सेवेचा लाभ या शहरातील स्वातंत्र्यसैनिकांना व्हावा यासाठी स्वातंत्र्यसैनिकांना शहर बसमध्ये तिकीट शुल्कात ५०टक्के सवलत देण्यात यावी करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय केनेकर                    अनुमोदक : श्री.कंवरसिंग बैनाडे

मा.महापौर : पूर्वी मंजुर झालेला असल्याने वगळण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव यापूर्वी मंजूर झालेला असल्याने वगळण्यांत आला.

मा.महापौर : विषय क्र.३ ते ६ मंजुर.

**विषय क्र.१२०२/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२६ गणेशनगर मधील अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W ७६/९ | वॉर्ड क्र. २६ साईपार्क एन-७ भागात बालोद्यान विकासीत करणे-५.०० लक्ष | वॉर्ड क्र.२६ एन-८ नेहरू उद्यान मधील विविध विकास कामे करणे-३७.०० लक्ष. |
| W ८६/१४ | वॉर्ड क्र. २६ मधील साईपार्क येथील खूल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे-५.०० लक्ष | |
| W २९/२६ | एन-८ साखरे मंगल कार्यालयासमोरच्या खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे व विकसीत करणे ५.०० लक्ष | |
| W १०४/२ | वॉर्ड क्र. २६ मधील उद्यान विकसीत करणे १५.०० लक्ष | |
| W २१२/५१ | एन-७ फ्युज कॉल सेंटर ते एन-८ तलावापर्यंत नाला बांधकाम करणे-७.०० लक्ष | |

सुचक : श्री.काशिनाथ कोकाटे                    अनुमोदक : श्री.सीताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२६ गणेशनगर मधील अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W ७६/९ | वॉर्ड क्र. २६ साईपार्क एन-७ भागात बालोद्यान विकासीत करणे-५.०० लक्ष | वॉर्ड क्र.२६ एन-८ नेहरू उद्यान मधील विविध विकास कामे करणे-३७.०० लक्ष. |
| W ८६/१४ | वॉर्ड क्र. २६ मधील साईपार्क येथील खूल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे-५.०० लक्ष | |
| W २९/२६ | एन-८ साखरे मंगल कार्यालयासमोरच्या खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे व विकसीत करणे ५.०० लक्ष | |
| W १०४/२ | वॉर्ड क्र. २६ मधील उद्यान विकसीत करणे १५.०० लक्ष | |

| | | |
|---|---|---|
| W २१२/५१ | एन-७ फ्युज कॉल सेंटर ते एन-८ तलावापर्यंत नाला बांधकाम करणे-७.०० लक्ष | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२०३/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जयभवानीनगर वार्ड क्र.८१ येथील नाला बांधकामासाठी अंदाजपत्रक तयार आहे. सदर कामासाठी १२ व्या वित्त आयोगाच्या उपलब्ध असलेल्या निधीमधून १०० लक्ष (एक कोटी) नाल्यासाठी देवून सदर भागातील जनतेचा होणारा त्रास दूर करावा ही विनंती. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.पुष्पाताई शिंदे, श्री.काशिनाथ कोकाटे

अनुमोदक : श्री.दामु अण्णा शिंदे, श्रीमती जयश्री किवळेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जयभवानीनगर वार्ड क्र.८१ येथील नाला बांधकामासाठी अंदाजपत्रक तयार असल्यामूळे,सदर कामासाठी १२ व्या वित्त आयोगाच्या उपलब्ध असलेल्या निधी मधून १००लक्ष (एक कोटी)नाल्यासाठी देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२०४/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.६१ मधील समर्थनगर भागातील अर्थसंकल्पातील पान डब्ल्यु २२२/७ वर समर्थनगर येथील सावरकर पुतळा ते वैद्य चौकापर्यंत फुटपाथ बनवणेकरीता १० लक्षची तरतूद ठेवण्यांत आलेली आहे. त्याऐवजी समर्थनगर वार्डातील रस्त्याचे डांबरीकरण करणे याकामाकरीता सदरील रक्कम वापरण्यात यावी.करीता सदरील प्रस्ताव मंजुर करण्यांत यावा.

सुचक : सौ.बोरामणीकर कला		अनुमोदक : सौ.रजनी जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६१ मधील समर्थनगर भागातील अर्थसंकल्पातील पान डब्ल्यु २२२/७ वर समर्थनगर येथील सावरकर पुतळा ते वैद्य चौकापर्यंत फुटपाथ बनवणेकरीता ठेवण्यात आलेली तरतूद र.रू.१० लक्ष **याऐवजी** समर्थनगर वार्डातील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता सदरील रक्कम वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२०५/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, गुंठेवारी नियम २००१ अंतर्गत ज्या रहिवाशांनी गुंठेवारीचे पैसे भरलेले आहेत त्यांना फक्त प्रमाणपत्र देण्यांत आले आहेत त्या प्रमाणपत्राला बँक अधिकृत समजत नाही त्यामूळे नागरीकांची मागणी आहे की,अधिकृत पी.आर.कार्ड देण्यात यावे म्हणजे नागरीक गुंठेवारीचे पैसे ताबडतोब भरतील.

करीता पी.आर.कार्ड देणेबाबतचा प्रस्ताव मंजूर करून शासनाकडे मान्यतेस्तव पाठविण्यात यावा. यास्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मिराताई शिंदे		अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गुंठेवारी नियम २००१ अंतर्गत ज्या रहिवाशांनी गुंठेवारीचे पैसे भरलेले आहेत त्यांना फक्त प्रमाणपत्र देण्यांत आले असल्यामूळे,व त्या प्रमाणपत्राला बँक अधिकृत

समजत नसल्यामूळे,अधिकृत पी.आर.कार्ड देण्यासाठी शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र.१२०६ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरात खाजगी कंत्राटीपध्दतीने बांधा वापरा हस्तांतरीत करा या तत्वावर मध्यवर्ती जकात नाका परिसर न.भू.क्र.१२०४१ पैकी जागेवर अद्यावत पुरेशी सुविधाने युक्त असलेली इमारत २५० खाटांचा दवाखाना व व्यापारी संकुल उभारणेचा प्रकल्प महानगरपालिकेने हाती घेतला आहे. या प्रकल्पामूळे शहरातील नागरीकांना अत्यल्प दरात अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार असून महानगरपालिकेतर्फे नागरीकांना कायम स्वरूपी सवलतीचा लाभ निर्माण होणार आहे. सदर भव्य इमारतीमध्ये २५० खाटांची सवलत,एक्सरे,सी.टी.स्कॅन,ऑपरेशन थेटर,पॅथेलॉजी लॅब,औषधालय, कॅन्टीन इत्यादी राहणार आहे.

नगर भूमापन क्रमांक १२०४१ भाग ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची ९.९८ एकर जागेपैकी ६.५४ एकर (२६४८६.०० चौ.मी.) जागेमध्ये अस्तित्वातील मध्यवर्ती जकात नाका, यांत्रिकी विभाग इत्यादी इमारती इतर ठिकाणी स्थलांतरीत करून २५० खाटांचा अत्याधुनिक दवाखाना व व्यापारी संकुल बांधण्याचा प्रस्ताव आहे.

सदर ठिकाणी सध्या मध्यवर्ती जकात नाका,यांत्रिकी कार्यशाळा,जनावरांचा दवाखाना,वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ अधिकारी/कर्मचाऱ्यांची निवासस्थाने,प्राथमिक आरोग्य केंद्र, स्मशानभूमी इत्यादीचा समावेश आहे. नमुद इमारती २० ते २५ वर्षापूर्वी महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेली आहेत. स्मशानभूमीची जागा वगळता ६.५४ एकर जागेमध्ये सदर प्रकल्पाचा प्रस्ताव असून नमुद सर्व इमारती तोडून प्रकल्प उभारावयाचा आहे. इमारतीची आजची किमंत अंदाजे रूपये ७२ लक्ष इतकी होत आहे.

सदर २५० खाटांचा अत्याधुनिक दवाखान्यासाठी १६३०० चौ.मी. (१७५००० चौ.फुट) बांधीव क्षेत्रात इमारत बांधण्यात येणार असून व्यापारी संकुलसाठी ११६०० चौ.मी. (१२५००० चौ.फुट) बांधीव क्षेत्र विकासक यांना मिळणार आहे.

प्रकल्प बी.ओ.टी.तत्वावर उभारावयाचा असून धोरण खालीलप्रमाणे राहील.

अत्याधुनिक दवाखान्याच्या इमारतीच्या बांधकामासाठी अंदाजे २५ कोटी खर्च येणार असून बी.ओ.टी.प्रकल्पाद्वारे आजच्या रेडीरेक्नर दर रूपये ४,५००/- चौ.मी. प्रमाणे अंदाजे रक्कम ०५ कोटी एवढी होत आहे. परंतु बाजार भाव पाहता सदर जमिनीचे रूपये ०७ ते १० कोटी एवढी रक्कम मिळेल असा अंदाज आहे. मनपाच्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करून प्रकल्प तीन वर्षात पुर्ण होईल या प्रमाणे प्रत्येक वर्षी ०५ कोटीची तरतूद करावी लागणार आहे.

विकासक यांनी दवाखान्याची इमारत ४०% बांधकाम केल्यावरच शॉपींगची जागा ९९ वर्षाच्या भाडेतत्वावर बांधकामासाठी ताब्यात देण्यात येईल. व भाडेपट्टा दर रूपये १०/- प्रति चौ.मी. प्रति माह राहणार असून मुळदरामध्ये तीन वर्षाने १२% वाढ करण्याची तरतूद ठेवण्यात येईल. तसेच नेहमीच्या प्रचलित अटी व शर्ती विकासक यांना लागू राहतील.

इमारत बांधकाम झाल्यानंतर फर्निचर,ऑपरेशन थेटर,आय.सी.यु.,पॅथॉलॉजी लॅब इत्यादी सुविधासाठी खर्च लागणार असून दवाखाना चालविणेसाठी दरवर्षी डॉक्टर्स, नर्सेस,अधिकारी,कर्मचारी व इतर स्टाफसाठी वैद्यकीय प्रशासकीय खर्च महानगरपालिकेतर्फे करावा लागणार आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेचा अत्याधुनिक तसेच पुरेशी सेवा उपलब्ध असलेला नागरीकांना अत्यल्प दरात सेवा सुविधा देणारा २५० खाटांचा दवाखाना उभारण्याचा संकल्प पुर्ण होईल व नागरीकांना त्याचा निश्चितच फायदा होईल. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

मा.महापौर :मागिल बैठकीत हा विषय आलेला होता.

श्री.मो.जावेद मो.इसाक :मालमत्तेचा वाद आहे महापालिकेच्या मालकीची ही जागा नाही. तुर्त स्थगिती द्यावी.

मा.महापौर :प्रशासन नियमानूसार कार्यवाही करेल.

मा.महापौर :हॉस्पीटलचा विषय आहे. जागा मालकीची आहे का नाही, खात्री करावी. प्रस्ताव मंजुर.

श्री.सय्यद खुसरो :जागा कुणाच्या मालकीची आहे याची माहिती घ्यावी जर खाजगी व्यक्तीची असेल तर मोबदला देता येईल.

मा.आयुक्त :सध्या प्रशासनाच्या माहिती प्रमाणे ही जागा महापालिकेच्या मालकीची आहे म्हणून प्रस्ताव ठेवलेला आहे. या प्रस्तावानूसार कार्यवाही करण्या अगोदर प्रशासन मालकीहक्का बाबतचे पुर्ण कागदपत्र प्रस्तावाची अमंलबजावणी पूर्वी तपासून घेण्यात येईल यास मान्यता द्यावी.

मा.महापौर :सदरील विषय मंजूर केलेला आहे.

श्री.निसार खान :महापालिकेच्या मालकीची ही जागा नाही संपूर्ण कागदपत्र तपासणी करावे महापालिकेची जागा असेल तर पूढील बैठकीत घेण्यात यावा. प्रस्ताव मंजूर करू नये.

याच वेळी स.स.श्री.निसार खान तसेच इतर काही सदस्य मा.महापौर यांचे डायस समोर जावून मोठमोठयाने बोलणे सुरू केले काहीही ऐकू येत नव्हते.

श्री.मो.जावेद मो.इसाक: ही महापालिकेची मालमत्ता नसतांना हा प्रस्ताव मंजूर केला जात आहे हे बरोबर नाही. असेल तर कागदपत्र दाखववे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :खाजगी कुणाची जागा असेल तर कायद्यानुसार कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :ज्यांनी कुणी कागदपत्र दिले असेल त्यावर अभ्यास करून योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री.संतोष खेंडके :प्रस्तावा विषयी माहिती द्यावी.

श्री.निसार खान :प्रस्ताव स्थगित करावा मंजुर करण्यास विरोध नाही परंतू ती जागा महापालिकेच्या मालकीची आहे का याची तपासणी केल्यानंतर पूढील बैठकीत घेण्यात यावा. कारण ही जागा एका खाजगी मालकीची आहे त्यांनी तसा अर्ज ही दिलेला आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक:महापालिकेची जागा नसतांना त्या जागेवर दवाखाना करण्याचा ठराव येतो हे बरोबर नाही जागा कुणाची आहे याची चौकशी करावी नंतरच यावर निर्णय घ्यावा.

मा.महापौर :मंजुर करण्यात आले आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक: नगर परीषदेपासूनची ही जागा खाजगी आहे. कचरा टाकण्यासाठी महानगरपालिकेने १९७१ ला भाडयाने घेतलेली होती. बीओटीवर हे करीत आहोत परंतू महापालिकेच्या मालकीची असेल तर कागदपत्र दाखववे. महापालिकेच्या मालकीची असेल तर मंजूर करण्यास आमचा विरोध नाही.

मा.महापौर :पूर्ण कार्यवाही होण्यास सहा ते आठ महिने लागणार आहे. पूर्ण तपासणी करून कार्यवाही होणार आहे.

श्री.अ.रशिद खान :नगरपरिषदेच्या काळात भाडयाने घेतले असेल तर तसे सभागृहात दाखववे.

मा.आयुक्त :ही जागा महापालिकेचीच आहे. बीओटी चे प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेनेच सर्वसाधारण सभेसमोर येतात. मालकी हक्क तपासणी केली जाईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मालकी हक्क दोन प्रकारचे असतात एक खरेदी खत तसेच नावाचे पीआर कार्ड असते. महापालिकेच्या मालकीची जागा असेल तर खरेदीखत दाखववावे असेल तर आमचा यास विरोध नाही. पीआर कार्ड असते तेव्हा मालकी नसते खरेदी खत केल्यानंतर पीआर कार्ड तयार केले जाते.

मा.आयुक्त :पीआर कार्ड महापालिकेच्या नावाने आहे जे कुणी आता ऑब्जेक्शन घेत आहे त्यांना मा.न्यायालयात जावून मालकी हक्क सिध्द करावा लागेल. १९७१ ला जागा दिलेली आहे म्हणता ३० वर्षापेक्षा जास्त काळ झालेला आहे. त्यांचे म्हणने सिध्द करण्याची जबाबदारी त्यांचेवर येते. आमच्यावर नाही. ज्यांचा मालकी हक्क आहे त्यांनी मा.न्यायालयात दाद मागवावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :हा कायदेशीर खुलासा झालेला नाही. खरेदीखत असलेली प्रत का दाखवली जात नाही.

मा.आयुक्त :महापालिकेकडे पीआर कार्ड आहे. ज्यांची जागा असेल त्यांनी मा.न्यायालयात जावे आपला मालकी हक्क सिध्द करावा टेंडर काढण्यापूर्वी पूर्ण लिगल ओपनीयन घेवून मालकी हक्क असेल तर टेंडर काढून टेंडर काढल्यानंतरही पून्हा सर्वसाधारण सभेपूढे हा प्रस्ताव येणारच आहे.

श्री.नासेर नाहदी सेंट्रल नाल्याचा स्टेटस काय आहे.

मा.आयुक्त :माझ्या माहिती प्रमाणे पब्लीक सेमी पब्लीक झोन आहे. याबद्दल पूर्ण डिटेल माहिती पाहिजे असेल तर सहा.संचालक नगररचना विभागाकडून घेवू, मालकी हक्काबद्दल गॅरंन्टी नसती तर ठेवलाच नसता जे काही पत्र आलेले आहे त्याची शहानिशा करून घेवू परंतु सध्या मालकीहक्क महापालिकेचा आहे. पून्हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे येणारच आहे त्यावेळी चर्चा करता येईल.

श्री.नासेर नाहदी : पब्लीक सेमी पब्लीक झोनमध्ये कमर्शियल व हॉस्पीटलसाठी देवू शकतो का याचा खूलासा करावा.

मा.आयुक्त :कोणतेही काम नगररचना विभागाकडून क्लिअर केल्यानंतर बीओटीचे टेंडर काढतो. हॉस्पीटलसाठी मंजूरी आहे परंतू जो काही प्लॅन आहे त्यासाठी नगररचना विभागाची मंजूरी घ्यावीच लागणार आहे.

श्री.नासेर नाहदी : ही जागा पब्लीक साठी आहे.

मा.महापौर : या प्रस्तावामध्ये काहींनी जरी ऑब्जेक्शन घेतले असेल तर त्यांना लिगल हेरींग दिली जाईल. आणि कायद्याच्या अधिन राहूनच काम केले जाईल. हा ठराव मंजूर करण्यात येतो.

याच वेळी स.सदस्य श्री.निसार खान तसेच श्री.मो.जावेद मो.इसाक हे मा.महापौर यांचे डायस समोर जावून मोठमोठयाने बोलतात राजदंड पकडण्याचा प्रयत्न करतात. काहीही ऐकू येत नाही.

मा.आयुक्त :ज्यांची तक्रार असेल त्यांची हेरींग घेतली जाईल डीसी रूलप्रमाणे ज्या वापरासाठी जागा आहे त्यासाठीच वापर केला जाईल ज्या वापरासाठी लागत असेल त्याच वापरासाठी अभिप्राय घेवून पून्हा सभागृहासमोर ठेवले जाईल.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात खाजगी कंत्राटीपध्दतीने बांधा वापरा हस्तांतरीत करा या तत्वावर मध्यवर्ती जकात नाका परिसर न.भू.क्र.१२०४१ पैकी जागेवर अद्यावत पुरेशी सुविधाने युक्त असलेली इमारत २५० खाटांचा दवाखाना व व्यापारी संकुल उभारणेस मान्यता देण्यांत येते. तसेच सदर २५० खाटांचा अत्याधुनिक दवाखान्यासाठी १६३०० चौ.मी. (१७५००० चौ.फुट) बांधीव क्षेत्रात इमारत बांधण्यात येणार असून व्यापारी संकुलसाठी ११६०० चौ.मी. (१२५०००

चौ.फुट) बांधीव क्षेत्र विकासक यांना मिळणार आहे. तसेच प्रकल्प बी.ओ.टी.तत्वावर प्रस्तुत प्रस्तावात असलेल्या धोरणानुसार उभारणेस तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या प्रस्तावामध्ये काहींनी जरी ऑब्जेक्शन घेतले असेल तर त्यांना लिगल हेरींग दिली जाईल. आणि कायद्याच्या अधिन राहूनच काम केले जाईल, यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२०७ :**

आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी दुरूस्ती प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेचे सक्षमीकरण व मजबुतीकरण करण्यासाठी पम्पींग मशिनरी मध्ये विविध प्रकारच्या आवश्यक त्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सुधारणा करतांना खालील प्रमाणे मुख्यतः जुन्या व कार्यक्षमता कमी झालेल्या मशिनरी बदलुन नविन बसविण्यात आलेल्या आहेत. त्यात जुन्या निघालेल्या मशिनरी खालील प्रमाणे आहेत.

**अ) जुनी योजना (७०० मी.मी.व्यास)**

| अ.क्र. | पंपगृहाचे नाव | नविन मशिनरी | संख्या | जुनी मशिनरी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | जायकवाडी जुनी | १) व्ही.टी.पम्प | ६ नग | ७ नग |
| | (कार्यान्वित १९७५) | २) ४०० अ.श.मोटार | ६ नग | ७ नग |
| | | ३) स्टार्टर | ६ नग | ७ नग |
| २ | ढोरकीन पम्पगृह | १) व्ही.टी.पम्प | ६ नग | ६ नग |
| | (कार्यान्वित १९८५) | २) स्टार्टर | ६ नग | २ नग |
| ३ | जुना फारोळा पंपगृह | | | |
| | (कार्यान्वित १९७५) | १)पम्पाचे रोटेटिंग असेम्ब्ली | ६ नग | ६ नग |
| ४ | नक्षत्रवाडी पंपगृह | १) व्ही.टी.पंम्प | ५ नग | ५ नग |
| | (कार्यान्वित १९८५) | २) ३०० अ.श.मोटार | ५ नग | ५ नग |
| **ब) नविन योजना (१२१९ मी.मी.व्यास)** | | | | |
| १ | जायकवाडी नविन | १)व्ही.टी.पम्पाचे बाऊल असेम्बली | ६ नग | ६ नग |
| | (कार्यान्वित १९९१) | २) ३५० मी.मी.व्यासाचे व्हॉल्व | ६ नग | ६ नग |
| २ | फारोळा नविन | १)कॉलम पाईप | ६ नग | ६ संच |
| | (कार्यान्वित १९९१) | २) ३५० मी.मी. व्यासाचे व्हॉल्व | ६ नग | ६ नग |
| **(क) शहर पाणी पुरवठा** | | | | |
| १ | सिडको एन-५ पंपगृह (कार्यान्वित १९८५) | १) व्ही.टी.पंप ६०/१२० अ.श. | ४ नग | ४ नग |

वरील मशिनरी व्यतिरीक्त इतर लहान मशिनरी, सुटे पार्टस, भंगार साहित्य, ऑईलचे ड्रम, केबल, व इतर साहित्याचा लिलावात समावेश करण्यात आलेला आहे. मशिनरीचे आयुष्यमान सर्वसाधारणपणे १५ वर्ष असते. परंतु या मशिनरीचे २० वर्षापेक्षा जास्त आयुष्य झाल्यामुळे मशिनरीची कार्यक्षमता कमी होते. व त्यासाठी विजेचा वापर जास्त प्रमाणात होत असल्यामुळे अशा सर्व जुन्या मशिनरी/ उपकरणांचे विविध पंपगृह परिसरात एकत्रिकरण करणे, वाहतुक करणे, वेगवेगळे लॉट करणे, व्हॅल्युवेशन साठी मदत करणे, लिलावाची कार्यवाही करणे, इत्यादी सर्व कामे करण्यासाठी यांत्रिकी पाणी पुरवठा विभागात मनुष्यबळ कमी असल्याने शासन मान्य ऑक्शनरकडून अशा प्रकारची मशिनरी निर्लेखीत करणे आवश्यक होते. यासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन स्पर्धात्मक निविदा मागविण्यात आल्या. दोन निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी मे. शंकर रामचंद्र ऑक्शनर पुणे यांची निविदा वाटाघाटी अंती लिलावातील विक्री किंमतीच्या ३.७५% रक्कमेस मंजुरी देण्यात येऊन ऑक्शनर नेमण्यात आले.

सदरील प्रस्तावास मान्यता झाल्यास साहित्याची किंमत ठरविण्यासाठी प्रथम कमेटीमध्ये म.न.पा. चे अधिकारी तसेच म.जी.प्रा. विभाग व सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असेल. तसेच किंमत निश्चित झाल्यानंतर स्थापण करण्यात आलेल्या लिलाव समिती समोर जाहिर लिलाव करण्यात येईल. या समितीमध्ये मा.स्थायी समिती यांनी नियुक्त केलेल्या दोन सदस्याचा समावेश असेल तर जुनी पम्पींग मशिनरी/ उपकरणे व इतर भंगार साहित्य निर्लेखित करून जाहिर लिलाव करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : पंपगृह खरेदीसाठी मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेचे सक्षमीकरण व मजबुतीकरण करण्यासाठी पम्पींग मशिनरी मध्ये विविध प्रकारच्या आवश्यक त्या सुधारणा करण्यात आलेल्या असल्यामूळे व सुधारणा करतांना प्रस्तुत प्रस्तावातील अ) ते क) प्रमाणे मुख्यत: जुन्या व कार्यक्षमता कमी झालेल्या मशिनरी बदलुन नविन बसविण्यात आलेल्या आहेत. या व्यतिरीक्त इतर लहान मशिनरी, सुटे पार्टस, भंगार साहित्य, ऑईलचे ड्रम, केबल, व इतर साहित्याचा लिलावात समावेश करण्यात आलेला आहे. सर्व जुन्या मशिनरी/ उपकरणांचे विविध पंपगृह परिसरात एकत्रिकरण करणे, वाहतुक करणे, वेगवेगळे लॉट करणे, व्हॅल्युवेशन साठी मदत करणे, लिलावाची कार्यवाही करणे, इत्यादी सर्व कामे करण्यासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन स्पर्धात्मक निविदा मागविण्यात येवून दोन निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी मे. शंकर रामचंद्र ऑक्शनर पुणे यांची निविदा वाटाघाटी अंती लिलावातील विक्री किंमतीच्या ३.७५% रक्कमेस मंजुरी देण्यात येऊन ऑक्शनर नेमण्यात आले. साहित्याची किंमत ठरविण्यासाठी प्रथम कमेटीमध्ये म.न.पा. चे अधिकारी तसेच म.जी.प्रा. विभाग व सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असेल. तसेच किंमत निश्चित झाल्यानंतर स्थापण करण्यात आलेल्या लिलाव समिती समोर जाहिर लिलाव करण्यात येईल. या समितीमध्ये मा.स्थायी समिती यांनी नियुक्त केलेल्या दोन सदस्याचा समावेश असेल तर जुनी पम्पींग मशिनरी/ उपकरणे व इतर भंगार साहित्य निर्लेखित करून जाहिर लिलाव करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२०८ :**

शासनाकडून आर सी एच २ प्रकल्प राबविण्यासाठी पत्र क्रमांक जा क्रं राकुकाका /अर्बन/ आर सी एच /कक्ष १७/ २०१७२-७४/२००७ दिनांक २६.०३.७ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे.

युरोपीयन कमिशनच्या अर्थ सहाय्याने आर.सी.एच. १ यामध्ये ९० महिला मंडळ प्रतिनिधी व ६ कम्युनिटी ऑर्गनायझर यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. सदरील महिला मंडळ प्रतिनिधी यांना फेज- २ मध्ये लिंक वर्कर म्हणून घेण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. आर.सी.एच.-२ मध्ये १६० लिंक वर्कर घेण्यास मंजूरी आहे. एकूण १६० लिंक वर्करवर नियंत्रण ठेवण्यासाठी ८ महिला पर्यवेक्षक नियुक्त करणे गरजेचे आहे.

आर.सी.एच.१ मध्ये महिला मंडळ प्रतिनिधी व कम्युनिटी ऑर्गनायझर यांना दरमहा अनुक्रमे रु.१७५०/- व रु.२५००/- मानधन प्रकल्पातर्फे देण्यात येत होते. सदरील प्रकल्प दिनांक ३१ मार्च २००७ अखेर संपुष्टात आलेला आहे. नविन आर.सी.एच.फेज-२ प्रकल्पात लिंक वर्करकरिता रुपये ५००/- प्रतिमाह मानधन देण्याची तरतूद आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे सध्या डाटा सेंटर सुरु करण्यात आलेले आहे. याकरिता वरील कर्मचारी यांची आवश्यकता आहे. डाटा सेंटरचे काम व यापुर्वी करत असलेले आरोग्य विषयक काम पाहता फेज-२ अंतर्गत देण्यात येणारे मानधन अत्यंत कमी आहे. डाटा सेंटरच्या कामात खंड न पडू देता सदरील काम चांगल्या पध्दतीने सुरु ठेवण्यासाठी यापुर्वी निश्चित करण्यात

आलेले मानधनानुसार औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे १६० लिंक वर्कर यांना रु.१२५०/- व ८ महिला पर्यवेक्षक यांना रु.२५००/- मानधन मनपा फंडातून देण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | पदनाम | एकूण | आरसीएच-२ अंतर्गत मंजूर मानधन | मनपा फंडातून प्रस्तावित करण्यात येणारे मानधन | एकूण मानधन प्रतिमाह |
|---|---|---|---|---|---|
| १ | महिला लिंक वर्कर | १६० | रु.५००/- प्रतिमाह | रु.१२५०/-प्रतिमाह | रु.१७५०/- प्रतिमाह |
| २ | महिला पर्यवेक्षक | ८ | -- | रु.२५००/- प्रतिमाह | रु.२५००/- प्रतिमाह |

सदरील डाटा सेंटरचे काम सुरळीत चालविण्यासाठी, गर्भवती मातांना व बालकांना द्यावयाच्या लसीकरणासाठी व इतर देण्यात येणा-या आरोग्य सुविधासाठी सदरील आर्थिकभार उचलणे आवश्यक आहे.

प्रकल्पा अंतर्गत कार्यरत ६ महिला पर्यवेक्षक व २ नविन महिला पर्यवेक्षक व १६० महिला लिंक वर्कर यांच्या मानधनसाठी रु.२६,४०,०००/- प्रतिवर्षी आर्थिकभार महानगरपालिकेने करणेस्तव व सदरील मानधन १ एप्रिल २००७ पासून लागू करणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : यानंतर महिला लिंक वर्करचा विषय मंजूर केला होता तो चूकीने २२५० केलेले होते त्यात १७५० करून दुरूस्ती सह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाकडून आर सी एच २ प्रकल्प राबविण्यासाठी पत्र क्रमांक जा क्रं राकुकाका /अर्बन/ आर सी एच /कक्ष १७/२०१७२-७४/२००७ दिनांक २६.०३.७ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली असल्यामूळे, युरोपीयन कमिशनच्या अर्थ सहाय्याने आर.सी.एच. १ यामध्ये ९० महिला मंडळ प्रतिनिधी व ६ कम्युनिटी ऑर्गनायझर यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. सदरील महिला मंडळ प्रतिनिधी यांना फेज- २ मध्ये लिंक वर्कर म्हणून घेण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. आर.सी.एच.-२ मध्ये १६० लिंक वर्कर घेण्यास मंजूरी असून,एकूण १६० लिंक वर्करवर नियंत्रण ठेवण्यासाठी ८ महिला पर्यवेक्षक नियुक्त करणेस तसेच डाटा सेंटरच्या कामात खंड न पडू देता सदरील काम चांगल्या पध्दतीने सुरु ठेवण्यासाठी यापुर्वी निश्चित करण्यात आलेले मानधनानुसार औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे खालीलप्रमाणे लिंक वर्कर व महिला पर्यवेक्षक यांना मानधन महापालिका फंडातून देण्यास मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्रं. | पदनाम | एकूण | आरसीएच-२ अंतर्गत मंजूर मानधन | मनपा फंडातून प्रस्तावित करण्यात येणारे मानधन | एकूण मानधन प्रतिमाह |
|---|---|---|---|---|---|
| १ | महिला लिंक वर्कर | १६० | रु.५००/-प्रतिमाह | रु.१२५०/-प्रतिमाह | रु.१७५०/-प्रतिमाह |
| २ | महिला पर्यवेक्षक | ८ | -- | रु.२५००/- प्रतिमाह | रु.२५००/- प्रतिमाह |

प्रकल्पा अंतर्गत कार्यरत ६ महिला पर्यवेक्षक व २ नविन महिला पर्यवेक्षक व १६० महिला लिंक वर्कर यांच्या मानधनसाठी र.रु.२६,४०,०००/- प्रतिवर्षी आर्थिकभार महानगरपालिकेने करणेस व सदरील मानधन १ एप्रिल २००७ पासून लागू करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२०९ :**

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी शासन राजपत्र क्र/टॅक्स/१२८१/१५३५/सीआर-१९४/३१/युडी -९ दिनांक ३०.०७.१९८२ नुसार राज्यातील ब-याच महानगरपालिकेने सौर उर्जेवरील सदरच्या वस्तुवरील अनुक्रमे -१, सौर संकलन २.सौर चुली ३.सौर उष्णजल सयंत्रे ४. सौर जल शुध्दीकरण सयंत्रे ५.सौर निक्षुशीकरण यंत्र ६.सौर पंप ७.सौर विद्युत सयंत्रे, ८.सौर फोटोहोल्टीय सिस्टीम ९.

पवन चक्की १०. पवन विद्युत सयंत्र ११.बॉयोग्यास सिस्टीम १२. सौर उर्जा कृषी अवशेष १३.सौर फवारणी यंत्र १४.गॅसीफायर सयंत्रे इत्यादी जकात पात्र आयात मालावर जकात पात्र आयात मालावर जकात माफी देण्यात आलेली आहे.

वरील शासन धोरणानुसार व इतर महानगरपालिकेने सदरच्या सौर उर्जे वरील सयंत्रवर जकात माफी दिल्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने वरील दर्शविलेल्या १४ वस्तूवर जकात माफी देण्याचे ठरल्यास "औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम-१९८४"मधील नियम-५ मधील जकात माफीच्या यादी मध्ये सदर मालाचा समावेश करून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम-१२७(२),१४९(१)व ४५४ मधील तरतुदीनुसार जकात नियमात दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर सौर उर्जेवरील एकुण १४ वस्तूवर जकात माफी दिल्यास औरंगाबाद महानगरपालिकेचे यापासून वार्षिक सरासरी अंदाजीत रक्कम रू.१०.५० लाखाची जकात कर वसूलीत तूट निर्माण होण्याची शक्यता आहे.

करीता औरंगाबाद महानगरपालिकेच्या क्षेत्रात सर्व प्रकारच्या सौर उर्जेवरील संबंधीत आयात होणाऱ्या वस्तू अनुक्रमे-१, सौर संकलन २.सौर चुली ३.सौर उष्णजल सयंत्रे ४. सौर जल शुध्दीकरण सयंत्रे ५.सौर निक्षुशीकरण यंत्र ६.सौर पंप ७.सौर विद्युत सयंत्रे, ८.सौर फोटोहोल्टीय सिस्टीम ९. पवन चक्की १०. पवन विद्युत सयंत्र ११.बॉयोग्यास सिस्टीम १२. सौर उर्जा कृषी अवशेष १३.सौर फवारणी यंत्र १४.गॅसीफायर सयंत्रे इत्यादी जकात पात्र आयात मालावर जकात माफी देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त :यात असे दिले की सौर उर्जावर जकात माफी करणेचा आहे. मंजूर केल्यानंतर एक महिण्याची मुदत पेपरमध्ये द्यावी लागेल. शासनाकडे पाठवावे लागेल. पुढील वर्षाच्या जकातीच्या संदर्भात जो निर्णय होणार त्यात विचार करावा लागेल. या शहराला चालना देण्यासाठी सौर उर्जावर जकात माफ करावयास पाहिजे.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी शासन राजपत्र क्र/टॅक्स/१२८१/१५३५/सीआर-१९४/३१/युडी -९ दिनांक ३०.०७.१९८२ नुसार सौर उर्जेवरील सदरच्या वस्तुवरील अनुक्रमे -१, सौर संकलन २.सौर चुली ३.सौर उष्णजल सयंत्रे ४. सौर जल शुध्दीकरण सयंत्रे ५.सौर निक्षुशीकरण यंत्र ६.सौर पंप ७.सौर विद्युत सयंत्रे, ८.सौर फोटोहोल्टीय सिस्टीम ९. पवन चक्की १०. पवन विद्युत सयंत्र ११.बॉयोग्यास सिस्टीम १२. सौर उर्जा कृषी अवशेष १३.सौर फवारणी यंत्र १४.गॅसीफायर सयंत्रे इत्यादी जकात पात्र आयात मालावर जकात पात्र आयात मालावर जकात माफी देण्यास तसेच औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम-१९८४ मधील नियम-५ मधील जकात माफीच्या यादीमध्ये सदर मालाचा समावेश करून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम-१२७ (२),१४९(१) व ४५४ मधील तरतुदीनुसार जकात नियमात दुरूस्ती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१९ येथील सांड पाणी व पावसाचे पाणी वाहण्यासाठी आर.सी.सी.गटार बांधणे. या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बा.खात्याच्या सन २००६-०७ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आले असून अ.प.रक्कम रू.२४,९६,४३०/- होत आहे. सदरील काम सन २००७-०८ अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष शहरी भागात खुल्या गटारी बांधणे अंतर्गत पृष्ठ क्र.डब्ल्यु -३८ वरील अ.क्र.१८ वरील र.रू.४२.०० लक्षमधून मा.सर्वसाधारण सभेचे विषय

क्र.१०२७ दिनांक ०२.०८.२००७ अन्वये सदर कामासाठी वळती केलेली र.रू.२४.०० लक्षमधून प्रस्तावीत आहे. रक्कम रू.२४,९६,४३०/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१९ येथील सांड पाणी व पावसाचे पाणी वाहण्यासाठी आर.सी.सी.गटार बांधणेच्या कामाचे र.रू.२४,९६,४३०/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. तसेच सदरील काम सन २००७-०८ अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष शहरी भागात खुल्या गटारी बांधणे अंतर्गत पृष्ठ क्र.डब्ल्यु -३८ वरील अ.क्र.१८ वरील र.रू.४२.०० लक्षमधून मा.सर्वसाधारण सभेचे विषय क्र.१०२७ दिनांक ०२.०८.२००७ अन्वये सदर कामासाठी वळती केलेली र.रू.२४.०० लक्षमधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच वेळी स.सदस्य श्री.नासेर खॉन यांनी विषय क्र ७ नामंजूर करावा अशी मागणी करत निषेद करून विषय सभागृहात फाडून फेकतात.

श्री.गजानन बारवाल :स.सदस्य श्री.निसार खॉन यांनी सभागृहात गैरवर्तन केलेले आहे त्यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्य करावे.

मा.महापौर :स.सदस्य श्री.निसारखान यांनी सभागृहात गैरवर्तन केलेले असल्याने त्यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्य करण्यात येते.

**विषय क्र. १२११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१९, सिडको पार्वती कन्या शाळा एन-९ ते आंबेडकर गृह निर्माण सोसायटी एच-सेक्टर येथे ४५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बा.खात्याच्या सन २००६-०७ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून अ.प.रक्कम रू.२४,७४,८९०/- होत आहे. सदरील काम सन २००७ -०८ अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष भांडवली कामे जलनिःसारण अंतर्गत पृष्ठ क्र.डब्ल्यु-१७३ वरील अ.क्र.८ वरील र.रू.५.०० लक्ष व डब्ल्यु-१७३ अ.क्र.१७ वरील २०.०० लक्ष अशी एकूण २५.०० लक्ष मधून प्रस्तावित आहे. रक्कम रू.२४,७४,८९०/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१९, सिडको पार्वती कन्या शाळा एन-९ ते आंबेडकर गृह निर्माण सोसायटी एच-सेक्टर येथे ४५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे र.रू.२४,७४,८९०/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. तसेच सदरील काम सन २००७ -०८ अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष भांडवली कामे जलनिःसारण अंतर्गत पृष्ठ क्र.डब्ल्यु-१७३ वरील अ.क्र.८ वरील र.रू.५.०० लक्ष व डब्ल्यु-१७३ अ.क्र.१७ वरील २०.०० लक्ष अशी एकूण र.रू.२५.०० लक्ष मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१२ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करत आहेत की, महानगरपालिका आस्थापनेवर लेखाधिकारी संवर्गात रूपये २०००-३५०० या वेतनश्रेणीतील दोन पदे निर्माण करण्यात आलेली होती. त्यापैकी एका पदास मुख्य लेखाधिकारी हे पदनाम व वेतनश्रेणी रूपये २२००-४००० देण्यात आली होती. दि.३१.०५.१९९७ च्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.३४/०५ अन्वये मुख्य लेखाधिकारी पदास रूपये ३०००-४५०० वेतनश्रेणी देण्यांत आली. दि.२७.१०.१९९७ च्या आदेशान्वये श्री.एम.पी.खैरनार यांची मुख्य लेखाधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली. शासन निर्णय क्र.एएमसी-१४९९/२/प्रक्र१/९९/नवि-२४, दि.२४.११.१९९९ अन्वये महापालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील पदांना पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मुख्य लेखाधिकारी पदास रूपये ३०००-४५०० च्या समकक्ष रूपये १००००-१५२००

वेतनश्रेणी लागू केलेली आहे. दिनांक २६.७.२००६ रोजी श्री.एम.पी.खैरनार यांचे निधन झाल्याने मुख्य लेखाधिकारी हे पद रिक्त झाले.

महानगरपालिका आस्थापनेवरील विविध पदांच्या भरती संदर्भाने सेवा भरती नियम १९९४ मध्ये तयार करण्यात आलेले आहेत. सदर नियमात मुख्य लेखाधिकारी पद भरती संदर्भाने तरतूद करण्यात आलेली नाही. शासन निर्णय क्र.संकिर्ण-१००५/वर्गीकरण/प्रक्र ३७९/०५/नवि-२४, दि.०४ मे २००६ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेचे 'ड' वर्गात वर्गीकरण करण्यात आलेले आहे व मुख्य लेखाधिकारी पदास रूपये ८०००-१३५०० वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. महापालिका आस्थापनेवरील मुख्य लेखाधिकारी पद भरती संदर्भाने सेवा भरती नियमात तरतूद नसल्याने खालीलप्रमाणे सेवा भरती नियमात तरतूद/दुरूस्ती करणे योग्य.

| पदाचे नांव | अर्हता | नियुक्तीची पध्दत |
|---|---|---|
| मुख्य लेखाधिकारी<br>वेतनश्रेणी<br>रूपये ८०००-१३५०० | १. वाणिज्य शाखेचा पदव्युत्तर स्नातक किंवा कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक आणि एम.बी.ए.<br>२. औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये आधीपासून असल्यास ते खेरीज करून ३३ वर्षाहून अधिक वय नसावे. | अ. औरंगाबाद महानगरपालिकेत वरीष्ठ श्रेणी लेखा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा एम.बी.ए. उत्तीर्ण झालेल्या किमान १० वर्षाची लेखाधिकारी या पदावर सेवा झालेल्या अधिकाऱ्यामधून पदोन्नतीद्वारे नियुक्ती. |

उपरोक्त प्रमाणे सेवा भरती नियमात तरतूद/दुरूस्ती करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिका आस्थापनेवरील मुख्य लेखाधिकारी पद भरती संदर्भाने सेवा भरती नियमात खालीलप्रमाणे तरतूद करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| पदाचे नांव | अर्हता | नियुक्तीची पध्दत |
|---|---|---|
| मुख्य लेखाधिकारी<br>वेतनश्रेणी<br><br>रूपये ८०००-१३५०० | १. वाणिज्य शाखेचा पदव्युत्तर स्नातक किंवा कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक आणि एम.बी.ए.<br>२. औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये आधीपासून असल्यास ते खेरीज करून ३३ वर्षाहून अधिक वय नसावे. | अ. औरंगाबाद महानगरपालिकेत वरीष्ठ श्रेणी लेखा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा एम.बी.ए. उत्तीर्ण झालेल्या किमान १० वर्षाची लेखाधिकारी या पदावर सेवा झालेल्या अधिकाऱ्यामधून पदोन्नतीद्वारे नियुक्ती. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गारखेडा सर्व्हे क्रं ५१ व ५२ नाथ प्रांगण येथे कारगील वन उभारणे करीता सा.बां. विभागाच्या जिल्हा दरसुची सन २००६-०७ नुसार रक्कम रु. १६,७३,५७४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदरील कामास्तव सन २००७-०८ या आर्थिक वर्षा अंतर्गत विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्रं डब्ल्यु २९ अ. क्रं २३ नुसार रक्कम रु. १०.०० लक्ष ची तरतुद उपलब्ध आहे. उर्वरीत रक्कम रु. ६,७३,५७४/- ची तरतुद पुढील आर्थिक वर्षात उपलब्ध करावी लागेल.

सदरील उद्यान विकसीत करणा-या मक्तेदारास/एजन्सीला खालील अटी शर्ती बंधनकारक राहतील.

१. सदरील उद्यानाचे नियोजित विकास कामे पूर्ण झाल्यानंतर पुढील ३ वर्षाच्या कालावधी करीता उद्यानाच्या देखभाल दुरुस्ती संबंधीत नियुक्त मक्तेदारांनी / एजन्सीने करणे आवश्यक राहील ३ वर्षा नंतर सुस्थितीत विना अट विना मोबदला सदरील उद्यान महानगरपालिकेस हस्तांतर करणे बंधनकारक राहील

२. सदरील उद्यानाचे काम ज्या मक्तेदारास /एजन्सीला देण्यात येईल त्यानी सिध्दार्थ उद्यानच्या धर्तीवर व मंजुर दरानुसार प्रवेश शुल्क, पार्कींग शुल्क, लावून त्यातून जमा होणा-या महसुलातून उद्यानाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च ३ वर्षापर्यंत करावे.
३. सदर उद्यानाकरीता नियुक्त मक्तेदार/एजन्सीला काम प्रगतीपथावर असतांना प्रत्येक दरम्यान देयका पैकी निव्वळ ७७ % देयक अदा करण्यात येईल. तसेच नियोजित काम पूर्ण झाल्यानंतर संबंधीताच्या देयकातून सुरक्षा ठेव म्हणून राखुन ठेवलेल्या २३% रक्कमे पैकी ५% रक्कम संबधीत देयकाच्या १ वर्षाच्या कालावधी नंतर ६% रक्कम २ वर्षाच्या कालावधी नंतर ७% रक्कम ३ वर्षाच्या कालावधी नंतर व उर्वरीत ५% रक्कम उद्यान सुस्थितीत महानगरपालिकेला हस्तांतरण केल्याच्या ९० दिवसा नंतर अदा करण्यात येईल.
४. प्रत्येक वर्षी २६ जानेवारी , १५ ऑगष्ट,१ मे , ८ डिसेंबर यासारख्या महत्वाच्या दिवशी महानगरपालिकेने काही कार्यक्रम उद्यानात आयोजित केल्यास संबंधीत मक्तेदरास/एजन्सीला त्या कार्यक्रमासाठी उद्यानातील जागा उद्यान विनामुल्य उपलब्ध करुन दयावे लागेल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १६,७३,५७४/-चा प्रस्ताव वरील सर्व अटी व शर्तीसह मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा सर्व्हे क्रं ५१ व ५२ नाथ प्रांगण येथे कारगील वन उभारणेच्या र.रु.१६,७३,५७४/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. सदरील काम सन २००७-०८ या आर्थिक वर्षा अंतर्गत विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्रं डब्ल्यु २९ अ. क्रं २३ नुसार रक्कम रु. १०.०० लक्षची उपलब्ध तरतुद व उर्वरीत र.रु.६,७३,५७४/- ची तरतुद पुढील आर्थिक वर्षात उपलब्ध करणेस तसेच सदरील उद्यान विकसीत करणा-या मक्तेदारास/एजन्सीला प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते ०४ अटी शर्ती बंधनकारक राहतील,यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पैठण येथे माहे ऑगस्ट २००६ मध्ये गोदावरी नदी पात्रात नाथसागर जलाशयातून सोडलेल्या पाण्यामुळे पैठण शहरामध्ये पुर परिस्थिती निर्माण झाली होती. पुर ओसरल्या नंतर पैठण शहरामध्ये स्वच्छतेच्या कामी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे जे.सी.बी. मशीन व इतर सफाई कामगार पाठविण्यासाठी त्या वेळेसच्या तत्कालीन नगर अध्यक्षांनी तथा त्या वेळेसच्या मा.महापौर तथा इतर पदाधिकाऱ्यांना केलेल्या विनंती नुसार आणी त्या वेळेसच्या मा. महापौरांनी केलेल्या आदेशानुसार पैठण शहरातील स्वच्छतेच्या कामी श्री. जे.एच.मिर्झा यांची जे.सी.बी. पाठविण्यात आली उपरोक्त जे.सी.बी.ने पैठण शहरामध्ये स्वच्छतेचे काम दिनांक १४.८.२००६ ते १६.०८.२००६ पर्यंत एकंदर ३० तास केलेले आहे. जे.सी.बी.ने काम केल्याबाबत पैठण नगर परिषदेने त्यांचे पत्र क्र.नपपै/स्व.वि/२००६ दिनांक १२.१०.२००६ अन्वये कळविलेले आहे. उपरोक्त जे.सी.बी.कामाचा एकंदर खर्च २७३००/- रूपये महानगरपालिकेस आलेला आहे. करिता या कामास तसेच वरील रक्कम श्री.जे.एच.मिर्झा यांना अदाई करण्यास्तव कार्योत्तर मंजुरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,जे.सी.बी.कामाचा एकंदर खर्च २७३००/- रूपये महानगरपालिकेस आलेला असल्यामूळे या कामास तसेच वरील रक्कम श्री.जे.एच.मिर्झा यांना अदाई करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-८ वार्ड क्र.२६ अंतर्गत १०० मी.मी. व्यासाच्या ए.सी.जलवाहिनी आहेत. तसेच काही गृहनिर्माण संस्थे अंतर्गत २" व्यासाच्या पि.व्ही.सी. जलवाहिन्या आहेत. त्यामुळे पाणीपुरवठा कमी दाबाने होत आहे.

वार्ड क्र.२६ अंतर्गत १०० व १५० मीमी व्यासाच्या डी.आय. जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.२३,००,२१४/- चे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांचे दरसुचीनुसार सन २००६-०७ अन्वये तयार करण्यात आलेले आहे. या कामासाठी होणारा खर्च अर्थसंकल्प सन २००७-०८ मधील पृष्ठ क्रं.डब्ल्यु-२१५ अ.क्र.१७ वर ८.०० लाखाची नावासह तरतुद आहे. तसेच प्रभाग क्र.२६ अंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी पृष्ठ क्र.डब्ल्यु-२२७ अ.क्र.९ वरील तरतुद १५.०० लाख ही मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.११५२ दिनांक २९.०९.२००७ अन्वये वळती करून एकुण २३.०० लाखाच्या तरतुदीमधुन करण्यात येणार आहे.

तरी वार्ड क्र.२६ अंतर्गत १०० व १५० मीमी व्यासाच्या डी.आय. जलवाहिनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२३,००,२१४/- चे मान्यतेबाबत तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-८ वार्ड क्र.२६ अंतर्गत १०० व १५० मीमी व्यासाच्या डी.आय. जलवाहिनी टाकण्याच्या रक्कम रू.२३,००,२१४/- चे अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच या कामासाठी होणारा खर्च अर्थसंकल्प सन २००७-०८ मधील पृष्ठ क्रं.डब्ल्यु-२१५ अ.क्र.१७ वर ८.०० लाखाची नावासह असलेली तरतुद आणि प्रभाग क्र.२६ अंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी पृष्ठ क्र.डब्ल्यु-२२७ अ.क्र.९ वरील तरतुद र.रू.१५.०० लाख ही मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.११५२ दिनांक २९.०९.२००७ अन्वये वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१६ :**

औरंगाबाद महानगरपालिका रौप्य महोत्सवी वर्ष साजरा करीत आहे. हे औचीत्य साधुन वेरूळ-अजिंठा महोत्सव २००७ हे दिनांक २३.११.२००७ ते २६.११.२००७ या कालावधीत आयोजित होणार आहे. यावेळी दिनांक १८.११.२००७ रोजी अर्ध मॅराथॉन (२१ कि.मी.) ५ कि.मी.धावणे व २ कि.मी. फन रेसचे आयोजन करण्यात येणार आहे. यास्पर्धेत विविध वयोगटासाठी विविध अंतराच्या स्पर्धा घेणार असून यात मराठवाडयातून सुमारे ३००० स्पर्धक सहभागी होण्याची शक्यता आहे. सदर मॅराथॉन स्पर्धा घेण्यासंदर्भात जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी दिनांक २४.१०.२००७ रोजी महानगरपालिकेस पत्र पाठविले आहे. व यासाठी सुमारे ५ लाख रूपये खर्च अपेक्षीत आहे. सदर स्पर्धा औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये होत असल्याने ही स्पर्धा औरंगाबाद महानगरपालिका आणि मॅराथॉन स्पर्धा समिती/ जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यास व त्यासाठी येणारा ५लाख रूपये खर्च तसेच स्पर्धेच्या दरम्यान महानगरपालिका हद्दीमध्ये आवश्यक ती व्यवस्था करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका रौप्य महोत्सवी वर्ष साजरा करीत असल्यामूळे,व वेरूळ-अजिंठा महोत्सव २००७ हे दिनांक २३.११.२००७ ते २६.११.२००७ या कालावधीत आयोजित होणार असून यावेळी दिनांक १८.११.२००७ रोजी अर्ध मॅराथॉन (२१ कि.मी.) ५ कि.मी.धावणे व २ कि.मी. फन रेसचे आयोजन करण्यात येणार असल्यामूळे, सदर स्पर्धा औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये होत असल्याने ही स्पर्धा औरंगाबाद महानगरपालिका आणि मॅराथॉन स्पर्धा समिती/ जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यास व

त्यासाठी येणारा र.रू.५ लाख खर्च तसेच स्पर्धेच्या दरम्यान महानगरपालिका हद्दीमध्ये आवश्यक ती व्यवस्था करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.१२१७ :</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी घनकचरा निर्मुलन व्यवस्थापन प्रक्रियेसाठी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या घनकचरा निर्मुलन व्यवस्थापन प्रक्रिया संदर्भात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) हे या मध्ये तज्ञ असल्याने तांत्रिक सल्ला घेणेसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) चे सदस्य सचिव श्री.डी.बी.बोरालकर यांचे सोबत बैठक घेऊन मा.स्थायी समितीच्या दिनांक १६.८.२००६ रोजीच्या बैठकीत विषय क्रमांक ८२ नुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांची प्रकल्प सल्लागार(PMC) म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी प्राप्त आहे व त्यांना प्रक्रियेच्या अंदाजित रक्कमेचा १% रक्कम किंवा जास्तीत जास्त रूपये २०.०० लक्ष देणेसाठी मंजुरी प्राप्त आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची प्रकल्प सल्लागार म्हणुन नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) ने घनकचरा निर्मुलन व्यवस्थापन प्रक्रियेसाठी निविदा राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्दीस दिल्या. निविदा तीन लिफाफा पध्दतीने मागविण्यात आल्या असुन अंतिम तारखेपर्यंत एकूण ७ निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

१. Hydroair Tectonics(PCD) Ltd.
२. SELCO International Ltd.
३. TELPRO Systems Ltd.
४. M/s. Ramky Enviro Engineers Ltd.
५. SPID Combines Pvt. Ltd.
६. Hanjer Biotech Energies Ltd.
७. Bharuch enviro Infrastructure Ltd.

निविदा छाननी अंती खालील निविदा नमुद कारणांमुळे रद्द करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | निविदा धारक | कारण |
|---|---|---|
| १. | Hydroair Tectonics(PCD) Ltd. | No experience in operation & maintenance. |
| २. | TELPRO Systems Ltd. | No experience in operation & maintenance. |
| ३. | SPID Combines Pvt. Ltd. | No experience & not full filled conditions of tender. |
| ४. | Hanjer Biotech Energies Ltd. | Bid security not submitted. |
| ५. | Bharuch enviro Infrastructure Ltd. | Bid security not submitted. |

खालील दोन निविदा धारक यांनी निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे पुर्तता केली असल्याने त्यांची निविदा पात्र ठरविण्यात आल्या.

१) SELCO International Ltd.
२) M/s. Ramky Enviro Engineers Ltd.

सदर दोन्ही निविदांचे लिफाफा उघडण्यापुर्वी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी वरील दोन्ही पात्र निविदा धारकांच्या सुरू असलेल्या प्रकल्पांची पाहणी करून अहवाल देणे बाबत सुचविले असून हैद्राबाद व बैंगलोर येथील दोन्ही निविदा धारक यांचे प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. हैद्राबाद येथील SELCO International Ltd. यांच्या प्रकल्पाची पाहणी केली असता, त्यांचा प्रकल्प समाधानकारकरित्या चालू असून Professionally organized असून सदर प्रक्रियेसाठी भारताचे राष्ट्रपती यांचेकडून सन २००४ मध्ये All India aweard मिळालेला आहे.

प्राप्त दोन्ही पात्र निविदाधारकां पैकी SELCO International Ltd. यांचा दर सर्वात कमी असल्याने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) म्हणजेच मनपाचे प्रकल्प सल्लागार (PMC) च्या Expert Committee ने SELCO International Ltd. यांची निविदा स्विकारणे करीता

शिफारस केली आहे. निविदा धारक यांना Tipping Fee पहिले तीन वर्षासाठी सम प्रमाणात राहणार असून प्रत्येक तीन वर्षानंतर १०% वाढ करण्यात येईल असा उल्लेख आहे.

SELCO International Ltd. यांचे Tipping Fee दर रूपये १००/- Per M.T. असून Ramky यांचे दर रूपये २२५/- Per M.T. आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांनी निविदाची छाननी करून मनपाकडे अहवाल सादर केला आहे.

जमीन खरेदीसाठी महानगरपालिका प्रशासनाची प्रक्रिया सुरू असून सहा ते सात ठिकाणची जागा पाहण्यात आली असुन, मौ. जोगवाडा येथील जागा यासाठी योग्य असल्याबाबतचा घनकचरा व्यवस्थापन समितीचा अहवाल प्राप्त झाल्याने इतर खात्याकडून ना हरकत प्रमाणपत्रे प्राप्त करणेसाठी कळविले असता, स्थानिक ग्राम पंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने व तेथील नागरिकांचा विरोध असल्याने इतर ठिकाणची जागा पाहणी करून निर्णय घेण्यात येणार आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सदर प्रकल्पासाठी जमीन खरेदीची प्रक्रिया येत्या एक महिन्यात पुर्ण होण्याची शक्यता असल्याने घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेची निविदा माहितीस्तव तथा मंजुरीसाठी मा.स्थायी समिती सभेसमोर पाठविण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांनी SELCO International Ltd. यांची निविदा खालील अटी व शर्तीसह मंजुरीसाठी शिफारस केली आहे.

१. निविदा धारक यांनी स्वत:च्या खर्चाने पॉवर प्लँट आणि Auxiliary fuel व inerts/rejects मटेरीयलची विल्हेवाट (Disposal) लावण्यासाठी स्वतंत्र जमीन खरेदी करावी.
२. जमीन खरेदी, Use of Auxiliary fuel व disposal of inerts/rejects साठी महानगरपालिका कुठलाही खर्च देणार नाही.
३. मनपाची जागा Disposal of inerts/rejects साठी वापरता येणार नाही.(M.S.W. च्या व्यतिरिक्त).
४. प्रकल्प स्थळावर टाकण्यात आलेला घनकचरा वरच मनपातर्फे Tipping Fee रूपये १००/- प्रति M.T. प्रमाणे देण्यात येईल. घनकचरा प्रक्रियेचे पुर्णपणे समाधान झाल्यानंतर रक्कमेची अदायगी करण्यात येईल.
५. प्रकल्पाद्वारे निघणारे Fly ash व इतर Solid waste हे विटा बनविणेसाठी वापरण्यात यावेत.
६. प्रक्रियेतील परिसर स्वच्छ ठेवण्यात यावा व प्रदुषण Foul oder व जन्तू होणार नाही याची दक्षता घ्यावी.
७. भूखंडाचा परिसर व भोवतालच्या जागेमध्ये झाडे लावुन Green zone व Buffer zone तयार करून त्यांचे संगोपन करावे.
८. Carbon credit point व income सर्व महानगरपालिकेसाठी राहील.
९. निविदा धारक यांना मनपातर्फे Letter of award प्राप्त झाल्यानंतर १२ आठवड्यांच्या आत पॉवर पर्चेस करारनामा करावा लागेल.
१०. RFP प्रमाणे काटेकारपणे अंमलबजावणी करून प्रक्रिया मुदतीत पुर्ण करावी.
११. M.S.W. rule २००० च्या अटी व शर्ती पुर्ण करणे निविदा धारक यांचेवर बंधनकारक राहील.
१२. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांचेकडून MSW Rule २००० प्रमाणे रितसर परवानगी Operation & maintenance of facility साठी घेणे बंधनकारक आहे.
१३. महानगरपालिकेस लागु असलेले सर्व कायदे, अटी व शर्ती लागू राहतील.
१४. वरील सर्व किंवा एकही अटीची पुर्तता न केल्यास निविदा रद्द करण्यात येईल व याची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

वरील प्रमाणे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांनी SELCO International Ltd. Hydrabad यांची निविदा तांत्रिकदृष्ट्या मुल्यमापन करून मंजुरीसाठी शिफारस केलेली आहे.

वरील प्रस्तावास दिनांक २३/१०/२००७ रोजीच्या मा.स्थायी समिती बैठकीत विषय क्रमांक १७१ अन्वये प्राप्त झालेली मंजुरी अवलोकनार्थ सादर.

सदर प्रक्रियेसाठी टेक्नॉलॉजीची निवड करण्यात आली असुन कचऱ्या पासून ऊर्जा तयार करण्यात येणार आहे. व प्रक्रियेसाठी जमिन ३० वर्षाच्या भाडे करारावर निविदा धारक यांना देण्यात येणार आहे. करीता टेक्नॉलॉजी बाबत अंतिम निर्णय घेणे तसेच प्रक्रियेसाठीची जमिन ३० वर्षाच्या भाडे करारावर संबंधित निविदा धारक यांना देणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा निर्मुलन व्यवस्थापन प्रक्रियेसाठी व कचऱ्यापासून उर्जा निर्मितीकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी, अ.क्र.१ ते १४ च्या अटी शर्तीस अधीन राहून SELCO International Ltd. Hydrabad यांची निविदा स्विकारणेस तसेच प्रक्रियेसाठी जमिन ३० वर्षाच्या भाडे करारावर निविदा धारक यांना प्रक्रियेसाठीची जमिन ३० वर्षाच्या भाडे करारावर संबंधित निविदा धारक यांना देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.१२१८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प पुस्तीका पान क्र.डब्ल्यु ३१ अ.क्र. १७ अन्वये विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखाशिर्षका अंतर्गत सर्व शिक्षा अभियान अंतर्गत विविध कामांची फरकाची रक्कम रू. ३५.०० लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. तथापी या आर्थिक वर्षा अंतर्गत या कामासाठी इतकी तरतुद आवश्यक नसल्याने खालील प्रमाणे या तरतुदी मधून नविन काम प्रस्तावीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | अर्थसंकल्प २००७-०८ लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | अर्थसंकल्प सन २००७-०८ पान क्र.डब्ल्यु ३१ अ.क्र. १७ अन्वये विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखाशिर्षका अंतर्गत सर्व शिक्षा अभियान अंतर्गत विविध कामांची फरकाची रक्कम रू.३५.०० लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | १. नेहरु भवन इमारतीची दुरूस्ती व रंगरंगोटी करणे तरतुद रक्कम रु.१.०० लक्ष. |

उपरोक्त प्रस्तावीत नुसार अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प पुस्तीका पान क्र.डब्ल्यु ३१ अ.क्र. १७ अन्वये विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखाशिर्षका अंतर्गत सर्व शिक्षा अभियान अंतर्गत विविध कामांची फरकाची रक्कम रू. ३५.०० लक्षची ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधून खालीलप्रमाणे तरतूद वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र | अर्थसंकल्प २००७-०८ लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | अर्थसंकल्प सन २००७-०८ पान क्र.डब्ल्यु ३१ अ.क्र. १७ अन्वये विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखाशिर्षका अंतर्गत सर्व शिक्षा अभियान अंतर्गत विविध कामांची फरकाची रक्कम रू.३५.०० लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | १. नेहरु भवन इमारतीची दुरूस्ती व रंगरंगोटी करणे तरतुद रक्कम रु.१.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२१९ :**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टीपीएस १२९३/३२/प्र.क्र.८/९३/नवि-१२ दिनांक २४,मे १९९३ सोबतच्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम-१२४फ नुसार शैक्षणिक संस्था (Educational Institutions),वैद्यकीय संस्था (Medical Institutions), सेवाभावी संस्था (Charitable Institutions), यांना जमिन व बांधकाम परवानगीच्या विकास करातून सूट मिळणे बाबत निर्देश दिलेले आहेत. ते खालील प्रमाणे,

(D) Extent of exemption that can be granted.

(a) Regarding Educational institutions

| Sr No. | Category | Extent of Exemption |
|---|---|---|
| 01 | Institutions imparting primary Education (including pre-primary and creches) | 75% |
| 02 | Institutions imparting secondary education | 50% |
| 03 | Institutions imparting Higher Education | Nil |
| 04 | Instituting promoting sports/ Amusement parks Arts & science | 50% |

| | | |
|---|---|---|
| | (b) | **Regarding Medical Institution**<br>The extent of exemption shall be 25% irrespective of the category of such institutions. |
| | (c) | **Regarding Charitable Institution**<br>The charitabie institutions that can be considered for granting partial exemptions and the extent upto which the exemptions can be granted are indicated below: |

| Sr No | | Particulars | Extent of Exemption |
|---|---|---|---|
| 1 | I | Hostel for working women | 75% |
| | II | Hospice, Care of persons suffering from mental illness & handicaps. | 75% |
| | III | Orphanage | 75% |
| | IV | Home for aged & destitutes & abandoned women, children & infants. | 75% |
| | V | Convalescents | 75% |
| | VI | Infirmary | 75% |
| 2 | I | Corrections detention with restricated liberty of the inmates ordinarily providing sleeping accommodation including Dharmashala, Santeria, custodial | 50% |
| | II | Penal, institutions such as Jails, prisons, mental hospitals, house of correction detention & reformatories. | 50% |
| 3 | Special cases closely associated with promotion of cultural and other activities | | 50% |

करीता शासन निर्णयानुसार आवश्यक त्या मापदंडात बसणारे शैक्षणिक संस्था (Educational Institutions),वैद्यकीय संस्था (Medical Institutions),सेवाभावी संस्था(Charitable Institutions),यांच्या विकास परवानगी प्रस्तावा करीता वरील प्रमाणे विकास करात सवलत देणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टीपीएस १२९३/३२/प्र.क्र.८/९३/नवि-१२ दिनांक २४, मे १९९३ सोबतच्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम -१२४ फ नुसार शैक्षणिक संस्था (Educational Institutions),वैद्यकीय संस्था (Medical Institutions), सेवाभावी संस्था (Charitable Institutions),यांना जमिन व बांधकाम परवानगीच्या विकास करातून प्रस्तुत प्रस्तावात दर्शविण्यात आल्यानुसार सूट देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.नासेर नाहदी :प्रशासकीय प्रस्ताव ऐनवेळी यायला नको पाहिजे.

मा.महापौर : जे काही आता प्रस्ताव असेल ते व हेडचेंजचे मंजूर करण्यात येत आहे. ही माझी शेवटची सभा संपन्न होत आहे माझ्या एक वर्षाच्या काळात जे काही स.सदस्य यांनी तसेच अधिकारी कर्मचारी यांनी सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे आभार धन्यवाद.

**विषय क्र.१२२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक विकास रस्ता ४० मीटर रूंद करण्यात येत आहे. तथापी या रस्त्यावर जास्त रहदारी नाही. व जुनी व्यावसायिक वस्ती असल्यामुळे ४० मीटर रस्ता रूंदीकरण केल्यास तेथील मालमत्ता बाधीत होईल. व तेथील नागरीकांना व्यवसायावर परीणाम होईल. तरी रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक मंजूर विकास रस्ता ४०' मीटर रूंद न करता ३० मीटर रूंद ठेवण्यात यावा, असा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय शिरसाट अनुमोदक : सौ.अल्पा विकास जैन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक रूंद करण्यांत येत असलेला मंजूर विकास रस्ता ४०' मीटर रूंद ऐवजी ३० मीटर रूंद ठेवणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३६ नागेश्वरवाडी परीसरात हेल्थ क्लब व आरोग्यकेंद्र नसल्यामुळे या भागातील सी.टी.एस. क्र. ४७१३ मधिल जागा निवास भागातुन वगळून हेल्थ क्लब व आरोग्यकेंद्रासाठी मुं.प्रां.महानगरपालिका अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यात यावी व त्याचे सर्व अधिकार मा. आयुक्तांना देण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.लता दलाल अनुमोदक : श्री.रविंद्र गांगे, श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३६ नागेश्वरवाडी परीसरात हेल्थ क्लब व आरोग्यकेंद्र नसल्यामुळे या भागातील सी.टी.एस. क्र. ४७१३ मधिल जागा निवास भागातुन वगळून हेल्थ क्लब व आरोग्यकेंद्रासाठी मुं.प्रां.महानगरपालिका अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास व त्याचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतील ११२४ कर्मचाऱ्यांच्या चौकशी प्रकरणात सफाई मजुरांना कामावरून कमी केलेले आहे. कमी केलेल्या कामगारांना पुन्हा कामावर घेणे बाबत कामगार तसेच कामगारांच्या कुटुंबियाकडून सतत मागणी होत आहे. त्यांचे कुटुंब महानगरपालिका कार्यालया समोर बऱ्याच दिवसापासून उपोषणास बसलेले आहे. माणूसकीच्या नात्याने त्यांना पुन्हा कामावर रूजु करून घेण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय जगताप, श्री.अ.साजेद अ.सत्तार

अनुमोदक : श्री.संजु रिडलॉन, श्रीमती सरला पोळ, श्री.मधुकर सावंत

मा.महापौर : हा प्रस्ताव मंजूर करून शासनाकडे पाठविणार आहोत.
श्री.संजय जगताप : अगोदर त्या कर्मचाऱ्यांना कामावर घ्यावे. शासन जो काही निर्णय देईल त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.
मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करून शासनाकडे शिफारस केली जाईल शासनाचे निर्देश आल्यानंतर कामावर घेतले जाईल.

**ठराव :**

औरंगाबाद महानगरपालिकेतील ११२४ कर्मचाऱ्यांच्या चौकशी प्रकरणात कामावरून कमी केलेल्या सफाई मजुरांना पुन्हा कामावर रूजु करून घेण्यास महाराष्ट्र शासनाकडे शिफारस करण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००७-०८ च्या १) अर्थसंकल्प पुस्तिकात नमुद प्रभाग क्र.१३ स्लम भागात विविध ठिकाणी गटार दुरूस्ती करणे. रक्कम २ लाख, पान क्र. ६४ वर.

**या कामाऐवजी**

१) प्रभाग क्र.१३ अंतर्गत नविन जी.आय.पोल लावणे, पोल दुरूस्ती करणे, विद्युत दिवे बसविणे/दुरूस्ती करणे इत्यादी आवश्यकता विद्युत कामे करणे.

१) प्रभाग क्र.१३ किलेअर्क अंतर्गत विविध ठिकाणी जलनिःसारण वाहीणीचे काम एकुण रक्कम ५ लाख पान क्र.६९ वर तरतुद ठेवण्यात आली होती. त्यापैकी या रक्कमेतून एकुण मंजुर कामे ४.१० रू.करण्यात आले असून उर्वरीत रक्कमेतून एकुण ९० हजार रूपये विविध कामे फुटकळ वार्ड क्रमांक १३ अंतर्गत करणे. वार्ड कार्यालय "अ"कडे वळती.

सुचक : श्रीमती मसरत बेगम शरुफोद्यीन अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००७-०८ च्या १) अर्थसंकल्प पुस्तिकात नमुद प्रभाग क्र.१३ स्लम भागात विविध ठिकाणी गटार दुरूस्ती करणे. रक्कम २ लाख, पान क्र. ६४ वर.

**या कामाऐवजी**

१. प्रभाग क्र.१३ अंतर्गत नविन जी.आय.पोल लावणे, पोल दुरूस्ती करणे, विद्युत दिवे बसविणे/दुरूस्ती करणे इत्यादी आवश्यकता विद्युत कामे करणे.

१. प्रभाग क्र.१३ किलेअर्क अंतर्गत विविध ठिकाणी जलनिःसारण वाहीणीचे काम एकुण रक्कम ५ लाख पान क्र.६९ वर तरतुद ठेवण्यात आली होती. त्यापैकी या रक्कमेतून एकुण मंजुर कामे ४.१० रू.करण्यात आले असून उर्वरीत रक्कमेतून एकुण ९० हजार रूपये विविध कामे फुटकळ वार्ड क्रमांक १३ अंतर्गत करणे. वार्ड कार्यालय "अ"कडे वळती करण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२३ मसनतपुर येथे सी.आय. जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी दिनांक १८.०७.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.९४३ नुसार र.रू.२० लक्षची तरतुद करण्यात आलेली होती, तथापि सदर काम रद्द करून त्या ऐवजी विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक टाकण्यासाठी र.रू.१० लक्ष आणि र.रू.१० लक्ष मसनतपुर येथे सांची प्रवेशव्दार उभारणेसाठी आणि विद्यापीठ गेटची प्रतिकृती उभारणेसाठी वापरण्यात यावे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मिराताई रामराव शिंदे अनुमोदक : सौ.सरीता ससाणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२३ मसनतपुर येथे सी.आय. जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी दिनांक १८.०७.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.९४३ नुसार र.रू.२० लक्षची तरतुद करण्यात आलेली तरतूद **याऐवजी** विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक टाकण्यासाठी र.रू.१० लक्ष आणि र.रू.१० लक्ष मसनतपुर येथे सांची प्रवेशव्दार उभारणेसाठी आणि विद्यापीठ गेटची प्रतिकृती उभारणेसाठी वापरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ब्रिजवाडी येथील काही नागरीकांचे घर रस्त्यात आले आहे. त्या कारणाने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्याव्दारे त्यांच्या घराची प्लॉट जागा नियमा प्रमाणे संपादित करून घेण्यात यावी. व त्यांना नियमाप्रमाणे मोबदला देण्यात यावा. व ती घरे हटवून रस्ता मोकळा करण्यात यावा. मोबदला धारकांची नावे खालील प्रमाणे.

१) पि.पी.साळवे, २) मधुकर हिवराळे, ३) दिलीप सोनाजी मगरे

तरी यांना मोबदला देवून जागा संपादीत करून घ्यावी करीता मंजुरी करीता प्रस्ताव सादर.

सुचक : सौ.सुशिलाताई भगवानराव रगडे, सौ.लता दलाल.

अनुमोदक : श्री.कैलास गायकवाड, सौ.सरीता ससाणे, सौ.पुष्पाताई शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ब्रिजवाडी येथील काही नागरीकांचे घर रस्त्यात आले असल्याने व त्या कारणाने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत असल्यामूळे, त्यांच्या घराची प्लॉट जागा नियमा प्रमाणे संपादित करणेस व त्यांना नियमाप्रमाणे मोबदला देण्यास मान्यता देण्यांत येते. मोबदला धारकांची नावे खालील प्रमाणे.

१) पि.पी.साळवे, २) मधुकर हिवराळे, ३) दिलीप सोनाजी मगरे

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्डातील (वार्ड क्र.५) म.न.पा. अर्थसंकल्पातील खालील कामांची रक्कम वळती करण्यात यावी ही विनंती.

१. पान क्र.W-३३ अनु.८ प्रभाग क्र.५ येथील स्मशान भूमीत विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसवणे (४ लक्ष.)
२. पान क्र.२९ अनु.क्र.२३ पहाडसिंगपुरा येथे जलकुंभास संरक्षित भिंत बांधणे (२ लक्ष ६५ हजार)
३. पान क्र.२९ अनु.क्र.२५ आरेफ जागा विकसीत करणे ५ लक्ष.
४. पान क्र.W-६३ अनु.क्र.९ आसेफिया कॉलनी अंतर्गत विविध भागात पाणीपुरवठा जलनि:सारण वाहिनी दुरूस्ती करणे. (२ लक्ष)
५. पान क्र.W-२०० अनु.क्र.६ वार्ड क्र.५ मधील विविध मोकळया जागांना संरक्षित भिंत बांधणे.(५लक्ष)

**या ऐवजी**

०१. प्रगती कॉलनी खुल्या जागेत सांस्कृतिक सभागृह बांधणे ७.०० लक्ष (सात लक्ष)
०२. अजमत हॉटेल जवळ घाटी रूग्णालयात येणाऱ्या नागरीकांकरीता पिण्याच्या पाण्याची पाणपोई बांधणे बाबत. (२ लक्ष)
०३. वार्ड क्र.५ येथील विविध ठिकाणी बोरींग (हापसा) मारेप(२ लक्ष)

०४. वार्ड क्र.५ धोबी कब्रस्तान संरक्षित भिंत व गेट बांधणे (२ लक्ष)
०५. वार्ड "अ" करीता किरकोळ कामे करणे (३ लक्ष)
०६. वार्ड क्र.५ येथे विद्युतचे किरकोळ (जी.आय.पोल इत्यादी) (२ लक्ष)

सुचक : श्री.नासेर मो.नाहदी अनुमोदक :श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५ करीता असलेल्या अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे कामांची रक्कम वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१. पान क्र.W-३३ अनु.८ प्रभाग क्र.५ येथील स्मशान भूमीत विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसवणे (४ लक्ष.)
२. पान क्र.२९ अनु.क्र.२३ पहाडसिंगपुरा येथे जलकुंभास संरक्षित भिंत बांधणे (२ लक्ष ६५ हजार)
३. पान क्र.२९ अनु.क्र.२५ आरेफ जागा विकसीत करणे ५ लक्ष.
४. पान क्र.W-६३ अनु.क्र.९ आसेफिया कॉलनी अंतर्गत विविध भागात पाणीपुरवठा जलनि:सारण वाहिनी दुरूस्ती करणे. (२ लक्ष)
५. पान क्र.W-२०० अनु.क्र.६ वार्ड क्र.५ मधील विविध मोकळया जागांना संरक्षित भिंत बांधणे.(५लक्ष)

**या ऐवजी**

०१. प्रगती कॉलनी खुल्या जागेत सांस्कृतिक सभागृह बांधणे ७.०० लक्ष (सात लक्ष)
०२. अजमत हॉटेल जवळ घाटी रूग्णालयात येणाऱ्या नागरीकांकरीता पिण्याच्या पाण्याची पाणपोई बांधणे बाबत. (२ लक्ष)
०३. वार्ड क्र.५ येथील विविध ठिकाणी बोरींग (हापसा) मारेप(२ लक्ष)
०४. वार्ड क्र.५ धोबी कब्रस्तान संरक्षित भिंत व गेट बांधणे (२ लक्ष)
०५. वार्ड "अ" करीता किरकोळ कामे करणे (३ लक्ष)
०६. वार्ड क्र.५ येथे विद्युतचे किरकोळ (जी.आय.पोल इत्यादी) (२ लक्ष)

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरामध्ये शिक्षण अभियान द सक्सेस हा सिनेमा तयार झालेला आहे. या सिनेमामध्ये शिक्षणाचे महत्व सांगीतलेले आहे, राष्ट्रपुरषाचे आदर्श जिवन दाखविण्यात आलेले आहे. सदरील सिनेमा महापालीकेतील सर्व शाळेमधिल विद्यार्थ्यांना दाखविण्यात आल्यास विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व कळेल. तरी सदरील सिनेमा प्रत्येक स.सदस्यांच्या प्रभागातील महापालिकेच्या शाळेत दाखविण्यास व त्यासाठी येणाऱ्या र.रू.०३.०० लक्षच्या खर्चास मान्यता व्हावी करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.सुशिलाताई भगवानराव रगडे, श्री.किशोर तुलसीबागवाले, श्री.हिम्मतराव दाभाडे
अनुमोदक : श्री.के.व्ही.मोरे, श्री.संजय जगताप, श्री.नासेर नाहदी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरामध्ये शिक्षण अभियान द सक्सेस हा सिनेमा तयार झालेला असल्यामूळे, हा सिनेमा प्रत्येक स.सदस्यांच्या प्रभागातील महापालिकेच्या शाळेत दाखविण्यास व त्यासाठी येणाऱ्या र.रू.०३.०० लक्षच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई महानगरपालिका वगळता इतर महानगरपालिका मध्ये स.पालिका सदस्यांचे मानधन प्रतिमाह रू.४०००/- आहे. आता महागाई निर्देशांकात वाढ झालेली आहे, लेखनसामग्री, दुरध्वनी बिले यांच्यातही वाढ झालेली असल्याने. स.पालिका सदस्यांचे मानधन वाढविणे क्रम प्राप्त ठरते तरी पालिका सदस्यांचे मानधन रू.४०००/- वरून १००००/- रू.इतके करणे या करीता महाराष्ट्र शासनास शिफारस करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष सुधाकर जेजुरकर

अनुमोदक : सौ.लता दलाल, श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.अ.रशिद खान (मामु), सौ.विजया रहाटकर, सौ.सरला पोळ,श्री.कैलास गायकवाड, श्री.दिलीप गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पालिका सदस्यांचे मानधन रू.४०००/- वरून १००००/- रू.करणे करीता महाराष्ट्र शासनास शिफारस करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२२९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, १ ते ५ मध्ये विविध वसत्या घेण्यात आलेले आहे. त्यामध्ये टाऊन हॉल नुर कॉलनी ही वसाहात जुनी असुन १९८० पुर्वीची आहे. त्या ठिकाणी म.न.पा.ने सर्व सुख सुविधा पुर्वीलेला आहे. व सर्व नागरीक म.न.पा.चे टॅक्स पण भारतात त्याचा सि.स.नं. २३८२ असुन आरक्षण क्र.१०४ मध्ये मोडते.

सदरील वसाहातील आरक्षणामध्ये वगळुन गुंठेवारी मध्ये घेण्यात यावे.

सुचक : श्री.सलीम खॉंन यासीन खॉंन अनुमोदक : श्री.संजय जगताप, श्री.रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाऊन हॉल नुर कॉलनी ही वसाहात जुनी असुन १९८० पुर्वीची असल्यामूळे,सदरील वसाहतीतील आरक्षणामध्ये वगळून गुंठेवारीमध्ये घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२८ येथील कटकट गेट हा फार पडील अवस्थेत असुन ऐतिहासीक धरोहर नष्ट होण्याचे मार्गावर आहे. सदरील गेटची दुरूस्ती, रंगरंगोटी, व अन्य कामे करण्याकरीता अंदाजपत्रक तयार करून सदरील काम त्वरीत होण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्रीमती खान मेहरून्नीसा हमीद खान

अनुमोदक : श्री.अ.रशीद खान (मामु), श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ येथील कटकट गेटची दुरूस्ती, रंगरंगोटी, व अन्य कामे करण्याकरीता अंदाजपत्रक तयार करून सदरील काम त्वरीत करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-रामनगर सिडको येथे व्दिवार्षीक पध्दतीने वृक्षसंवर्धन व विकास कामे करणेच्या अंदाजपत्रकास अर्थसंकल्प सन २००६-२००७ सिडको भागात ग्रिनबेल्ट विकसित करणे या लेखाअंतर्गत रक्कम रूपये १८.५० लक्षच्या अंदाजपत्रकास मंजुरीनुसार रितसर

निविदा कार्यवाही अंती मा.स्थायी समिति सभा दिनांक १७.७.२००७ च्या विषय क्र.६८ नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. परंतु अर्थसंकल्प सन २००७-२००८ अंतर्गत सदरील कामासाठी तरतुद पान क्र. डब्ल्यु-१७० वरील सिडको भागात ग्रीन बेल्ट विकसित करणे अंतर्गत क्रं. १ नुसार रक्कम रूपये ४३.५० लक्षची जनरल तरतुदी अंतर्गत करण्यात आलेली आहे.

करीता वरील कामासाठीचा खर्च अर्थसंकल्प सन २००७-२००८ नुसार पान क्र. डब्ल्यु-१७० वरील सिडको भागात ग्रीन बेल्ट विकसित करणे साठीच्या क्र. १ नुसार ४३.५० लक्षच्या तरतुदी अंतर्गत करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान घडमोडे अनुमोदक : श्री.काशिनाथराव कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-रामनगर सिडको येथे व्दिवार्षीक पध्दतीने वृक्षसंवर्धन व विकास कामे करणेच्या अंदाजपत्रकास अर्थसंकल्प सन २००६-२००७ सिडको भागात ग्रिनबेल्ट विकसित करणे या कामाचा खर्च अर्थसंकल्प सन २००७-२००८ नुसार पान क्र. डब्ल्यु-१७० वरील सिडको भागात ग्रीन बेल्ट विकसित करणे साठीच्या क्र.१ नुसार ४३.५० लक्षच्या तरतुदी अंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पृष्ट क्र. १७६ वर अनुक्रमांक २२ अन्वये प्रभाग क्र. ७६ येथे भुखंड संरक्षण व विकास करणे या कामासाठी रक्कम रू. १०,००,०००/- (अक्षरी रू.दहा लक्ष रू.) तरतुद करण्यात आली आहे. सदरील दहा लक्ष रक्कमेमधून रक्कम रू.२.५० (दोन लक्ष पन्नास हजार) वार्ड क्र.७६ एन-२ मधील एल-१ रामनगर येथील खुल्या जागेत खेळणी प्यागोडा बसवून विकसीत करणेसाठी वळती करण्यात यावी.

करीता ऐनवेळीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान (बापू) घडमोडे अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पृष्ट क्र. १७६ वर अनुक्रमांक २२ अन्वये प्रभाग क्र.७६ येथे भुखंड संरक्षण व विकास करणे या कामासाठी र.रू.१०,००,०००/- (अक्षरी रू.दहा लक्ष) करण्यांत आलेल्या तरतुदीमधून र.रू.२.५० (दोन लक्ष पन्नास हजार) वार्ड क्र.७६ एन-२ मधील एल-१ रामनगर येथील खुल्या जागेत खेळणी प्यागोडा बसवून विकसीत करणेसाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, लॉयन्स क्लब ऑफ औरंगाबाद मिडटाऊन यांच्या ७.११.०१ या तारखेच्या संदर्भ पत्रानुसार खिवंसरा पार्क रिध्दी,सिध्दी हौ.सो. जवळील वाहतुक बेट विकसीत करण्यासाठी त्यांच्या पत्राव्दारे परवानगी मागितली होती. सदरील वाहतुक बेट विकसित करण्यासाठी महापालिकेच्या अटी व नियमांना अधीन राहून हे बेट विकसीत करण्यात येणार आहे.

करीता या भागातील हे बेट विकसीत करण्याकरीता व चौकाचे सुशोभीकरण करण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

सुचक : सौ.अंजली दिलीप कोंडेकर अनुमोदक : श्रीमती मिराताई शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लॉयन्स क्लब ऑफ औरंगाबाद मिडटाऊन यांच्या ७.११.०१ या तारखेच्या संदर्भ पत्रानुसार खिवंसरा पार्क रिध्दी,सिध्दी हौ.सो.जवळील वाहतुक बेट विकसीत

करण्यासाठी त्यांच्या पत्राव्दारे परवानगी मागितली होती. सदरील वाहतुक बेट विकसित करण्यासाठी महानगरपालिकेच्या अटी व नियमांना अधीन राहून हे बेट विकसीत करण्यास व चौकाचे सुशोभीकरण करण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पानं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W-२१४ | वार्ड क्र.६९ भानुदासनगर भागातDIKलाईनटाकणे-५.०० लक्ष | वार्ड क्र.६९ मनपाच्या खुल्या जागेत वॉचमन क्वॉर्टर बांधणे व जागा विकसीत करणे-८.०० लक्ष |
| W-२०३ | वार्ड क्र.६९ मनपाच्या खुल्या जागेत वॉचमन क्वार्टर बांधणे - ३.०० लक्ष. | |

सुचक : डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : श्रीमती जयश्री किवळेकर, सौ.मिराताई शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पानं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W-२१४ | वार्ड क्र.६९ भानुदासनगर भागात DIK लाईन टाकणे - ५.०० लक्ष | वार्ड क्र.६९ मनपाच्या खुल्या जागेत वॉचमन क्वॉर्टर बांधणे व जागा विकसीत करणे-८.०० लक्ष. |
| W-२०३ | वार्ड क्र.६९ मनपाच्या खुल्या जागेत वॉचमन क्वार्टर बांधणे - ३.०० लक्ष. | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा वार्ड क्र.२८ येथील सदफ कॉलनी कडे जाणारा मार्ग व वार्डाची लोकांना माहिती व्हावी यासाठी सदफ कॉलनी येथे एक कमान बांधण्यासाठी मनपा अर्थसंकल्पात तरतुद करून कमान बांधण्यात यावे.

सदर काम सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात २.५० ते ३.०० लाखाची तरतुद करून सदर कामाबाबतचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयासाठी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अ.साजेद अ.सत्तार अनुमोदक : श्री.अब्दुल रशिद खान मामु

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा वार्ड क्र.२८ येथील सदफ कॉलनी कडे जाणारा मार्ग व वार्डाची लोकांना माहिती व्हावी यासाठी सदफ कॉलनी येथे एक कमान बांधण्यासाठी मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये तरतुद करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१६ अंतर्गत विविध विकास कामे करणे अत्यंत आवश्यक असुन खालील अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलुन विकास कामे करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | **रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क**<br>वार्ड क्र.१६ मयुरनगर-सुदर्शननगर प्रभागात | वार्ड क्र.१६ अंतर्गत भुखंड विकसित |

| | | |
|---|---|---|
| | विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे. अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.डब्ल्यु २२० वरील अनु क्र. ६ वर ५ लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. त्या ऐवजी- | करणेसाठी सदरील अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.२२० वरील अ.क्र.६ वरील ५ लक्षची तरतुद वापरण्यात यावी. |

सुचक : सौ.रजनी रमेश जोशी                    अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१६ अंतर्गत विविध विकास कामे करणे करीता अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | **रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क**<br>वार्ड क्र.१६ मयुरनगर-सुदर्शननगर प्रभागात विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे. अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.डब्ल्यु २२० वरील अनु क्र. ६ वर ५ लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. त्या ऐवजी- | वार्ड क्र.१६ अंतर्गत भुखंड विकसित करणेसाठी सदरील अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.२२० वरील अ.क्र.६ वरील ५ लक्षची तरतुद वापरण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. ८७ उल्कानगरी मधील खालील विविध कामांसाठी अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलुन विकास कामे करण्याचा प्रस्ताव.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | विठ्ठल मंदिर परिसरात उद्यान विकसीत करणे W १९९ रू.३.०० लक्ष | प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथील मोकळया (खुल्या) मनपाच्या विकसीत करणे रू.२१.०० लाख. |
| ०२ | उल्कानगरी येथे उद्यान विकसीत करणे W २२८ रू.१०.०० लक्ष. | |
| ०३ | वार्ड क्र.८७ येथे पेव्हर ब्लॉक बसविणे W १८८ रू.५.०० | |
| ०४ | प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथे रामायणा हॉल मागील श्री.उऱ्हेकर यांच्या घराजवळील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे W २३२ रू.३.०० | |

सुचक : सौ.अंजली दिलीप कोंडेकर                    अनुमोदक : श्रीमती मिराताई शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ८७ उल्कानगरी मधील खालील विविध कामांसाठी अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलुन विकास कामे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | विठ्ठल मंदिर परिसरात उद्यान विकसीत करणे W १९९ रू.३.०० लक्ष | प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथील मोकळया (खुल्या) मनपाच्या विकसीत करणे रू.२१.०० लाख. |
| ०२ | उल्कानगरी येथे उद्यान विकसीत करणे W २२८ रू.१०.०० लक्ष. | |
| ०३ | वार्ड क्र.८७ येथे पेव्हर ब्लॉक बसविणे W १८८ रू.५.०० | |
| | प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथे रामायणा हॉल मागील | |

| | | |
|---|---|---|
| ०४ | श्री.उऱ्हेकर यांच्या घराजवळील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे W २३२ रू.३.०० | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०४ मधील लेखाशिर्षक बदलुन विकास कामे करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | **रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क**<br>प्रभाग क्र.४ वानखेडेनगर विविध भागात रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क कामे करणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु ५९ अ.क्र.१२ तरतुद रक्कम २ लक्ष | १. प्रभाग क्र.४ मधील मनपा गायमुख येथील खोल्याची व जागेची डागडुजी व दुरूस्ती करणे. १.०० लक्ष<br>२ प्रभाग क्र.४ मध्ये विविध ठिकाणी फुटकळ कामे करणे, मुरूम टाकणे. १.०० लक्ष |

सुचक : श्री.रविकांत काशिनाथराव गवळी अनुमोदक : श्री.अ.रशिद खान (मामु)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०४ करीता अर्थसंकल्पात असलेल्या खालीलप्रमाणे कामाचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | **रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क**<br>प्रभाग क्र.४ वानखेडेनगर विविध भागात रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क कामे करणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु ५९ अ.क्र.१२ तरतुद रक्कम २ लक्ष | १. प्रभाग क्र.४ मधील मनपा गायमुख येथील खोल्याची व जागेची डागडुजी व दुरूस्ती करणे. १.०० लक्ष<br>२ प्रभाग क्र.४ मध्ये विविध ठिकाणी फुटकळ कामे करणे, मुरूम टाकणे. १.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२३९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको एन-८ येथे बॉटनिकल गार्डनचे काम सुरू करण्यात आले असुन सदर काम प्रगतीपथावर आहे. या भागातील नागरीकांना पावसाळयात येणाऱ्या पाण्याचा गेल्या अनेक वर्षापासून त्रास आहे व त्याबाबत त्यांनी तक्रार देखील दिलेली आहे.

मा.आयुक्त व मा.कार्यकारी अभियंता यांनी सदर कामाची प्रत्यक्ष साईटवर जाऊन पाहणी केली आहे. या करीता एन-५ व एन-६ सेक्टर मधुन येणारा नाला मोठा करणे आवश्यक आहे. जेणेकरून शिवदत्त सोसायटी मध्ये पाणी येऊन नुकसान होणार नाही.

तसेच बॉटनीकल गार्डनच्या नियोजित प्रवेश व्दारासमोर काही जुन्या समाधी व जुने बांधकाम आहे. त्यामुळे प्रवेशव्दार पुर्व दिशे ऐवजी दक्षिणेस करणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे केल्यास नेहरू उद्यान मधुन प्रवेश ठेवल्यास त्यामधील जो पावसाच्या पाण्याचा मोठा खोलगट भाग आहे त्याचा आपणास कारंजे व लहान मुलांच्या बोटींगसाठी देखील उपयोग होईल. तसेच नेहरू उद्यान नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

नेहरू उद्यान व बॉटनिकल गार्डनचा भुभाग एकच असल्यामुळे नेहरू उद्यानातील कारंजे, बोटींग, संरक्षित भिंत, पार्कींग, तेथील नाल्याचे विस्तारीकरण त्यावरील कव्हर, जॉगींग ट्रॅक, म्युझीक

सिस्टीम इत्यादी सर्व कामांचे एकत्रित अंदाजपत्रक तयार करून बॉटनीकल गार्डन मध्येच नेहरू उद्यान व तेथील कामाचा समावेश करण्यात येऊन सदरील सर्व कामे एकत्रित केल्यास नेहरू उद्यानासाठी येणारा वार्षिक खर्च देखील बंद होईल. तसेच नेहरू उद्यानात फिरण्यासाठी येणाऱ्या नागरीकांना मोफत प्रवेश देण्यात येऊन वरील सर्व वाढीव कामांच्या अंदाजपत्रकास एकत्रित मान्यता देण्यात येऊन सदरील कामे एकत्रित करून घेण्यास मान्यता द्यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे, श्री. भगवान घडमोडे, श्री.कंवरसिंग किसनसिंग बैनाडे
अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री.प्रकाश अत्तरदे,श्री.सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-८ येथे बॉटनिकल गार्डनचे काम सुरू करण्यात आले असुन सदर काम प्रगतीपथावर आहे. या भागातील नागरीकांना पावसाळयात येणाऱ्या पाण्याचा गेल्या अनेक वर्षापासून त्रास आहे व त्याबाबत त्यांनी तक्रार देखील दिलेली आहे. मा.आयुक्त व मा.कार्यकारी अभियंता यांनी सदर कामाची प्रत्यक्ष साईटवर जाऊन पाहणी केली असल्यामूळे, या करीता एन-५ व एन-६ सेक्टर मधुन येणारा नाला मोठा करणेस तसेच बॉटनीकल गार्डनच्या नियोजित प्रवेश व्दारासमोर काही जुन्या समाधी व जुने बांधकाम आहे. त्यामुळे प्रवेशव्दार पुर्व दिशे ऐवजी दक्षिणेस करणे आणि नेहरू उद्यान व बॉटनिकल गार्डनचा भुभाग एकच असल्यामुळे नेहरू उद्यानातील कारंजे, बोटींग, संरक्षित भिंत, पार्कींग, तेथील नाल्याचे विस्तारीकरण त्यावरील कव्हर, जॉगींग ट्रॅक, म्युझीक सिस्टीम इत्यादी सर्व कामांचे एकत्रित अंदाजपत्रक तयार करणेस व बॉटनीकल गार्डन मध्येच नेहरू उद्यान व तेथील कामाचा समावेश करण्यास तसेच नेहरू उद्यानात फिरण्यासाठी येणाऱ्या नागरीकांना मोफत प्रवेश देण्यास आणि या सर्व वाढीव कामांच्या अंदाजपत्रकास एकत्रित मान्यता देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१५ अंतर्गत विकास काम करणे अत्यंत आवश्यक असुन खालील अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलुन विकास काम करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.१५ मध्ये एन १२ मधील विविध ठिकाणी कमी व्यासाची ड्रेनेज लाईन बदलुन मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.९० अ.क्र.१७ तरतुद रक्कम २.५ लक्ष | वार्ड क्र.१५ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे यासाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु २०६ अ.क्र.५ वर ९ लक्ष तरतुद आहे तरी त्यामध्ये ७.५ लक्ष समाविष्ट करणे. |
| २ | वार्ड क्र.१५ स्वामी विवेकानंदनगर डी सेक्टर मधील विविध ठिकाणच्या कमी व्यासाची ड्रेनेज लाईन बदलुन मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे अर्थसंकल्पातील पृ.क्र. ९० अ.क्र. १८ तरतुद रक्कम २.५ लक्ष. | |
| ३ | वार्ड क्र.१५ स्वामी विवेकानंदनगर सी सेक्टर मधील विविध ठिकाणच्या कमी व्यासाची ड्रेनेज लाईन बदलुण मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे अर्थसंकल्पातील पृ.क्र.९० अ.क्र.१९ तरतुद रक्कम २.५ लक्ष | |

सुचक : श्री.मोहन मेघावाले अनुमोदक : सौ.रेखा काथार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१५ अंतर्गत विकास काम करणे अत्यंत आवश्यक असल्याने खालील अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलुन विकास काम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.१५ मध्ये एन १२ मधील विविध ठिकाणी कमी व्यासाची ड्रेनेज लाईन बदलुन मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.९० अ.क्र.१७ तरतुद रक्कम २.५ लक्ष | वार्ड क्र.१५ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलणे यासाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु २०६ अ.क्र.५ वर ९ लक्ष तरतुद आहे तरी त्यामध्ये ७.५ लक्ष समाविष्ट करणे. |
| २ | वार्ड क्र.१५ स्वामी विवेकानंदनगर डी सेक्टर मधील विविध ठिकाणच्या कमी व्यासाची ड्रेनेज लाईन बदलुन मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे अर्थसंकल्पातील पृ.क्र. ९० अ.क्र. १८ तरतुद रक्कम २.५ लक्ष. | |
| ३ | वार्ड क्र.१५ स्वामी विवेकानंदनगर सी सेक्टर मधील विविध ठिकाणच्या कमी व्यासाची ड्रेनेज लाईन बदलुण मोठया व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे अर्थसंकल्पातील पृ.क्र.९० अ.क्र.१९ तरतुद रक्कम २.५ लक्ष | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आकाशवाणी पाठीमागील भाग तसेच सुराणानगर, महेशनगर, मनजीतनगर, आदी भागातील नागरीकांना कैलास स्मशान भुमीला जाण्यासाठी थेट रस्ता उपलब्ध नसल्याने नागरीकांना ३ ते ४ किमीचा फेरा होवून स्मशान भुमीला जावे लागते. हे टाळण्यासाठी जालना रोड ते स्मशान भुमीचे मुख्य गेट असा थेट रस्ता करावा, म्हणून यापुर्वी सर्वसाधारण सभेने १९९८ साली ठराव क्रमांक १०६/५ मंजुर केला आहे. मात्र या ठरावाची अंमलबजावणीसाठी मोठया प्रमाणावर भूसंपादन करावे लागणार आहे. त्यामुळे त्यास बराच उशीर लागण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणे अशी जोडणी केल्यास मनजीतनगरच्या अंतर्गत रस्त्यावर रहदारीचा असहय होणारा ताण पडणार आहे. नागरीकांचाही अशा जोडणीस विरोध आहे. या सर्व बाबी लक्षात घेवून सध्याच्या मनजीतनगरचा जो ९.०० मी. रूंदीचा रस्ता आहे तो स्मशान भूमीचे पूर्व भिंतीपर्यंत करून त्या बाजूने स्मशानभूमीस नवीन गेट केल्यास हे काम तातडीने होवू शकेल व मूळ ठरावाचा उद्येशही सफल होवू शकेल. तरी त्यानुसार सुधारीत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.प्रशांत देसरडा, श्री.संतोष जेजुरकर अनुमोदक : श्री.कैलास गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आकाशवाणी पाठीमागील भाग तसेच सुराणानगर, महेशनगर, मनजीतनगर, आदी भागातील नागरीकांना कैलास स्मशान भुमीला जाण्यासाठी मनजीतनगरचा जो ९.०० मी. रूंदीचा रस्ता आहे तो स्मशान भूमीचे पूर्व भिंतीपर्यंत करून त्या बाजूने स्मशानभूमीस नवीन गेट करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५७ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W १९३/७ | वार्ड क्र.५७ रेंगटीपुरा येथील सार्वजनिक ओटयाची दुरूस्ती करणे व शेड बांधणे - २.५० लक्ष. | वार्ड क्र.५७ तक्षशीलानगर स्लम येथे समाज मंदीर बांधणे-५.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| २०५/९ | प्रभाग क्र.५७ तक्षशीलानगर येथील शौचालयाची दुरूस्ती करणे- २.५० लक्ष | |
| W २१०/१७ | प्रभाग क्र.५७ रेंगटीपुरा ते मोंढा येथील गटार दुरूस्ती करणे- ५.०० लक्ष | वार्ड क्र.५७ मध्ये खडी रस्ते, मुरूम टाकणे, पेव्हरब्लॉक दुरूस्ती, जलनिःसारण देखभाल दुरूस्ती, इमारत दुरूस्ती, गटार दुरूस्ती, वार्ड कार्यालय इमारतीस रंगकाम करणे, पुल दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे - ५.०० लक्ष |

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक : श्री.कैलास गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W १९३/७ | वार्ड क्र.५७ रेंगटीपुरा येथील सार्वजनिक ओटयाची दुरूस्ती करणे व शेड बांधणे - २.५० लक्ष. | वार्ड क्र.५७ तक्षशीलानगर स्लम येथे समाज मंदीर बांधणे-५.०० लक्ष |
| २०५/९ | प्रभाग क्र.५७ तक्षशीलानगर येथील शौचालयाची दुरूस्ती करणे- २.५० लक्ष | |
| W २१०/१७ | प्रभाग क्र.५७ रेंगटीपुरा ते मोंढा येथील गटार दुरूस्ती करणे- ५.०० लक्ष | वार्ड क्र.५७ मध्ये खडी रस्ते, मुरूम टाकणे, पेव्हरब्लॉक दुरूस्ती, जलनिःसारण देखभाल दुरूस्ती, इमारत दुरूस्ती, गटार दुरूस्ती, वार्ड कार्यालय इमारतीस रंगकाम करणे, पुल दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे - ५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्या औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश “ड” वर्गात आहे. तथापि सदर महानगरपालिका “क” वर्गात करण्यात यावी. सदर महानगरपालिका “क” वर्गात केल्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांच्या पदावर कोणताही परिणाम होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. असा प्रस्ताव मंजुर करून शासनाकडे मान्यतेस्तव पाठविण्यात यावा.

यास्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष जेजुरकर अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सध्या औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश “ड” वर्गात असल्यामूळे, सदर महानगरपालिका “क” वर्गात करण्या करीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेची लोकसंख्या जवळपास १२ लाख आहे. महानगरपालिकेतर्फे बरेच दवाखाने आहेत. होमिओपॅथी उपचार जुना असून तो जुन्या रोगावर चांगला आहे. तसेच होमिओपॅथी उपचार कमी पैशा मध्ये होऊ शकतो.

तरी महानगरपालिकेच्या दवाखान्यात होमिओपॅथी डॉक्टर्सना मानदसेवा करण्याची संधी द्यावी करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष जेजुरकर अनुमोदक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या दवाखान्यात होमिओपॅथी डॉक्टर्सना मानद सेवा करण्याची संधी देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्ताव सादर.

| अर्थसंकल्प पानं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W-१७९<br>Sr No.१८ | वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी रस्त्यालगत साईड ड्रेन बांधणे - १५.०० लक्ष. | ०१.वार्डक्र.६९ जवाहर कॉलनी मनपा शाळा इमारतीस नवीन स्लॅब टाकणे व इतर दुरूस्ती करणे - ०८ लक्ष<br>०२. वार्ड क्र.६९ मध्ये विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे- ०७ लक्ष. |

सुचक : डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : श्री.त्र्यंबक तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,

| अर्थसंकल्प पानं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W-१७९<br>Sr No.१८ | वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी रस्त्यालगत साईड ड्रेन बांधणे - १५.०० लक्ष. | ०१.वार्ड क्र.६९ जवाहर कॉलनी मनपा शाळा इमारतीस नवीन स्लॅब टाकणे व इतर दुरूस्ती करणे - ०८ लक्ष<br>०२. वार्ड क्र.६९ मध्ये विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे- ०७ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील विकास पध्दतीवर औरंगाबाद महानगरपालिकेत खाजगीकरण करण्यात आले आहे. परंतु स.सदस्याचे खाजगीकरणा बाबत समाधान होत नाही. खाजगीकरणा बाबत हैद्राबाद येथील महानगरपालिकेतील काम उत्कृष्ठ असल्यामुळे प्रभाग ब मधील स.सदस्यांना हैद्राबाद येथील महानगरपालिकेस भेट देवुन अभ्यास दौऱ्यास जाण्यासाठीचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा हि विनंती.

सुचक : सौ.पाटील दिपाली सुनिल, श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ

अनुमोदक : सौ.जोशी रजनी रमेश, श्री.सुरे सिताराम इसराम

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खाजगीकरणाबाबत हैद्राबाद येथील महानगरपालिकेतील काम उत्कृष्ठ असल्यामुळे प्रभाग ब मधील स.सदस्यांना हैद्राबाद येथील महानगरपालिकेस भेट देवुन अभ्यास दौऱ्यास जाण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक २०.०६.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.८४०/७ अन्वये रू.६० कोटी कर्ज रूपाने प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून प्रस्तावित असलेल्या मोंढा नाका ते जवाहर कॉलनी पर्यंत १२ मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामास मंजूरी मिळालेली आहे. सदरील प्रस्तावात मोंढा नाका ते जवाहर कॉलनी व रविंद्रनगर पर्यंत १२ मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे अशी दुरूस्ती करण्यात यावी.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे    अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २०.०६.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.८४०/७ अन्वये रू.६० कोटी कर्ज रूपाने प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून प्रस्तावित असलेल्या मोंढा नाका ते जवाहर कॉलनी पर्यंत १२ मी.रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे **याऐवजी** मोंढा नाका ते जवाहर कॉलनी व रविंद्रनगर पर्यंत १२ मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे अशी दुरूस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मधील माझ्या वार्डातील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे, हि विनंती.

| अ.क्र. | पान क्र. | र.रू. | २००७-०८ जुना लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| १७ | ०९ | १०.०० | पडेगांव कत्तलखाना वसाहतीकरीता खडी रस्ते तयार करणे. | वार्ड क्र.०५ येथील बिबी का मकबराचे पाठी मागील जैन मुनी आश्रम समोरील मेन रोडपासून ते नर्सेस क्वार्टर अमोदी हिल गट नं.९८ पर्यंत २०० मी.मी.व्यासाची पाण्याची पाईप लाईन टाकणे. |
| ११ | १५१ | ०४.०० | मिटमिटा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | |
| १२ | १५१ | ०३.०० | पडेगांव व मिटमिटा येथे विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज चेम्बर बांधणे. | |

सुचक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन    अनुमोदक : श्री.नासेर नाहदी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मधील वार्डातील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,

| अ.क्र. | पान क्र. | र.रू. | २००७-०८ जुना लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| १७ | ०९ | १०.०० | पडेगांव कत्तलखाना वसाहतीकरीता खडी रस्ते तयार करणे. | वार्ड क्र.०५ येथील बिबी का मकबराचे पाठी मागील जैन मुनी आश्रम समोरील मेन रोडपासून ते नर्सेस क्वार्टर |
| ११ | १५१ | ०४.०० | मिटमिटा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | १५१ | ०३.०० | पडेगांव व मिटमिटा येथे विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज चेम्बर बांधणे. | अमोदी हिल गट नं.९८ पर्यंत २०० मी.मी.व्यासाची पाण्याची पाईप लाईन टाकणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२४९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चिकलठाणा येथे महापालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या दवाखान्यास कै.साहेबराव राणुबा कावडे रूग्णालय असे नांव देण्यांत यावे, करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रवि कावडे

अनुमोदक : ०१.श्री.भाऊसाहेब वाघ, ०२.श्री.त्र्यंबक तुपे, ०३.श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथे महापालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या दवाखान्यास कै.साहेबराव राणुबा कावडे रूग्णालय असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिवाजीनगर भागातील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे, करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W २२६/४२ | शिवाजीनगर भागात नविन पथदिव्यांचीव्यवस्था करणे-१०.०० लक्ष .....यापैकी ५.०० लक्ष रक्कम कमी करणे. | १. शिवाजीनगर भागात नविन पथदिव्यांची व्यवस्था करणे-५.०० लक्ष. |
| W २३२/२५ | शिवाजीनगर भागात विविध ठिकाणी ड्रेनेजची कामे करणे-१०.०० लक्ष. .....यापैकी ५.०० लक्ष रक्कम कमी करणे. | २. शिवाजीनगर भागात विविध ठिकाणी ड्रेनेजची कामे करणे -५.०० लक्ष |
| W २३५/४१ | शिवाजीनगर भागात विविध ठिकाणी पाणी पुरवठयाची कामे करणे-१०.०० लक्ष. .....यापैकी ५.०० लक्ष रक्कम कमी करणे. | ३. शिवाजीनगर भागात विविध ठिकाणी पाणी पुरवठ्याची कामे करणे-५.०० लक्ष. |
| | | ४. शिवाजीनगर भागातील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे-१५.०० लक्ष |

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिवाजीनगर भागातील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W २२६/४२ | शिवाजीनगर भागात नविन पथदिव्यांचीव्यवस्था करणे-१०.०० लक्ष .....यापैकी ५.०० लक्ष रक्कम कमी करणे. | १. शिवाजीनगर भागात नविन पथदिव्यांची व्यवस्था करणे-५.०० लक्ष. |
| W २३२/२५ | शिवाजीनगर भागात विविध ठिकाणी ड्रेनेजची कामे करणे-१०.०० लक्ष. .....यापैकी ५.०० लक्ष रक्कम कमी करणे. | २. शिवाजीनगर भागात विविध ठिकाणी ड्रेनेजची कामे करणे -५.०० लक्ष |
| W २३५/४१ | शिवाजीनगर भागात विविध ठिकाणी पाणी | ३. शिवाजीनगर भागात विविध ठिकाणी पाणी |

| | | |
|---|---|---|
| | पुरवठयाची कामे करणे-१०.०० लक्ष.<br>.....यापैकी ५.०० लक्ष रक्कम कमी करणे. | पुरवठ्याची कामे करणे-५.०० लक्ष.<br>४. शिवाजीनगर भागातील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे-१५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८९ ज्योतीनगर अंतर्गत शंभुमहादेवनगर भागात विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम करणे आवश्यक असून या कामासाठी अर्थसंकल्प २००७-२००८ मधील पृष्ठ क्र.१६२ वरील नविन डांबरी रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षाखाली अ.क्र.०७ वर असलेली १२ लक्ष रूपये व पृष्ठ क्र.१६३ वरील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षाखाली अ.क्र.९ वर असलेली ०५.७० लक्ष रूपये तरतूद अशी एकूण(१२ लक्ष +०५.७० लक्ष) १७ लक्ष सत्तर हजार उपलब्ध तरतूद उपरोक्त कामासाठी वळती करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.विजया रहाटकर अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे, श्री.नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८९ ज्योतीनगर अंतर्गत शंभुमहादेवनगर भागात विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम करणे करीता अर्थसंकल्प २००७-२००८ मधील पृष्ठ क्र.१६२ वरील नविन डांबरी रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षाखाली अ.क्र.०७ वर असलेली १२ लक्ष रूपये व पृष्ठ क्र.१६३ वरील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षाखाली अ.क्र.९ वर असलेली ०५.७० लक्ष रूपये तरतूद अशी एकूण(१२ लक्ष +०५.७० लक्ष) १७ लक्ष सत्तर हजार उपलब्ध तरतूद उपरोक्त कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१९ येथील लेखाशिर्षक बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत ठेवणे बाबत.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्रभाग क्र.१९ शिवनेरी कॉ.म्हाडा कॉ.येथे आर २६ एन ७ येथील सभागृहासाठी वॉचमन रूम काढणे. मधून उर्वरीत रक्कम रू.१.३० लक्ष अर्थसंकल्पातील पृ.क्र.७७ अ.क्र.२ | प्रभाग क्र.१९ येथे एन ९ शिवनेरी कॉ. सभागृहाच्या पाठीमागील जागेस विकसीत करणे व संरक्षण भिंत बांधणे तसेच सभागृहाच्या समोरच्या भागात रोडलगत पार्कींगसाठी पेव्हर ब्लॉक बसविणे. यासाठी सदरील रक्कम रू.११.३० लक्ष वळती करण्यांत यावेत. |
| ०२. | प्रभाग क्र.१९रायगडनगर येथील संत तुकाराम सभागृहास सुशोभित करणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.७७ अ.क्र.६ तरतूद रक्कम २ लक्ष | |
| ०३. | प्रभाग क्र.१९ शिवनेरी कॉ.म्हाडा कॉ.येथे फुटपाथ व अंतर्गत रोडवर पेव्हींग ब्लॉक बसविणे यासाठी २९.९.२००७ रोजी ठराव पारीत करून रक्कम रू.८ लक्ष तरतूद ठेवण्यात आली आहे. | |

सुचक : श्री.अनिल जुगललाल जैस्वाल अनुमोदक : श्री.संतोष सुधाकर जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१९ येथील कामासाठी अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| ०१. | प्रभाग क्र.१९ शिवनेरी कॉ.म्हाडा कॉ.येथे आर २६ एन ७ येथील सभागृहासाठी वॉचमन रूम काढणे. मधून उर्वरीत रक्कम रू.१.३० लक्ष अर्थसंकल्पातील पृ.क्र.७७ अ.क्र.२ | प्रभाग क्र.१९ येथे एन ९ शिवनेरी कॉ. सभागृहाच्या पाठीमागील जागेस विकसीत करणे व संरक्षण भिंत बांधणे तसेच सभागृहाच्या समोरच्या भागात रोडलगत पार्कींगसाठी पेव्हर ब्लॉक बसविणे. यासाठी सदरील रक्कम रू.११.३० लक्ष वळती करण्यांत यावेत. |
| ०२. | प्रभाग क्र.१९रायगडनगर येथील संत तुकाराम सभागृहास सुशोभित करणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.७७ अ.क्र.६ तरतूद रक्कम २ लक्ष | |
| ०३. | प्रभाग क्र.१९ शिवनेरी कॉ.म्हाडा कॉ.येथे फुटपाथ व अंतर्गत रोडवर पेव्हींग ब्लॉक बसविणे यासाठी २९.९.२००७ रोजी ठराव पारीत करून रक्कम रू.८ लक्ष तरतूद ठेवण्यात आली आहे. | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१९ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे, करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W २०३ | वॉर्ड क्र.१९ मध्ये शास्त्रीनगर येथे सांस्कृतिक सभागृह,संरक्षित भिंत बांधणे-०९.०० लक्ष. | वॉर्ड क्र.१९ एन-७ अयोध्यानगर मधील महादेव मंदीरालगत नाल्याची भिंतीची उंची वाढविणे, बेड कॉंक्रेटींग करणे आणि ढापे टाकणे-९.०० लक्ष. |

सुचक : श्री.अनिल जुगललाल जैस्वाल अनुमोदक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१९ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W २०३ | वॉर्ड क्र.१९ मध्ये शास्त्रीनगर येथे सांस्कृतिक सभागृह,संरक्षित भिंत बांधणे-०९.०० लक्ष. | वॉर्ड क्र.१९ एन-७ अयोध्यानगर मधील महादेव मंदीरालगत नाल्याची भिंतीची उंची वाढविणे, बेड कॉंक्रेटींग करणे आणि ढापे टाकणे-९.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०४ मधील पुर्नडांबरीकरण शहरी भाग या लेखाशिर्षक खाली अ.क्र.१५ पृ.क्र.५९ वर प्रभाग क्र.४ वानखेडेनगर अंतर्गत विविध भागात पुर्नडांबरीकरण करणेसाठी ४.७५ लक्ष तरतूद ठेवण्यात आली आहे.

तसेच नविन डांबरीकरण रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षकाखाली अ.क्र.०३ पृ.क्र.W ६६ वर प्रभाग क्र.४ वानखेडेनगर अंतर्गत विविध भागातील रस्त्यांचे नविन डांबरीकरण करणे या साठी ४.६५ लक्षची तरतूद ठेवण्यात आली आहे.

तथापी वरील दोन्ही कामे ही एकाच प्रभागात एकाच ठिकाणी करायची असल्याने त्याचे एकत्रीत अंदाजपत्रक ९.४० लक्ष रू.चे तयार करण्यात आले आहे.

करीता सदरील अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात यावी यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रविकांत गवळी, श्री.प्रशांत देसरडा                    अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०४ मधील पुर्नडांबरीकरण शहरी भाग या लेखाशिर्षक खाली अ.क्र.१५ पृ.क्र.५९ वर प्रभाग क्र.४ वानखेडेनगर अंतर्गत विविध भागात पुर्नडांबरीकरण करणेसाठी असलेली तरतूद र.रू.४.७५ लक्ष तसेच नविन डांबरीकरण रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षकाखाली अ.क्र.०३ पृ.क्र.W ६६ वर प्रभाग क्र.४ वानखेडेनगर अंतर्गत विविध भागातील रस्त्यांचे नविन डांबरीकरण करणे या साठी असलेली तरतूद र.रू.४.६५ लक्ष ही दोन्ही कामे एकाच प्रभागात एकाच ठिकाणी करायची असल्याने त्याचे एकत्रीत तयार करण्यांत आलेले र.रू.९.४० लक्षचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत विविध ठिकाणी पथदिवे बसविणे. करीता अर्थसंकल्प २००७-०८ करीता ३ लक्ष रूपये विविध ठिकाणी पथदिवे बसविणे करीता बजट बुक पान क्र.W १९५ मध्ये उल्लेखणी आहे.

करीता हे ३ लक्ष रूपये मला विविध ठिकाणी लाईट मेन्टनस व लाईट देखभाल दुरूस्ती करीता हेड बदली करून देण्यात यावे. कारण की माझ्या वार्ड मधील चिल्लर कामाकरीता बजटचा अभाव आहे. कृपा करून मला वळती करून देणे हि विनंती.

सुचक : श्रीमती खान मेहरून्निसा हमीद खान                    अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत विविध ठिकाणी पथदिवे बसविणे. करीता अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये असलेली र.रू.३.०० लक्ष तरतूद **याऐवजी** र.रू. ३.०० लक्ष विविध ठिकाणी लाईट मेन्टनस व लाईट देखभाल दुरूस्ती करणे असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. करीता अर्थसंकल्प २००७-०८ करीता १० लक्ष रूपये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे करीता बजट बुक पान क्र.W २२० मध्ये उल्लेखणी आहे.

करीता हे १० लक्ष रूपये मला विविध ठिकाणी पेचवर्क नाली दुरूस्ती व ड्रेनेज लाईन देखभाल दुरूस्ती व कॉंक्रेटींग दुरूस्ती करून देण्यात यावे. कारण की, माझ्या वार्ड मधील चिल्लर कामाकरीता बजटचा अभाव आहे. कृपा करून मला वळती करून देणे ही विनंती.

सुचक : श्रीमती खान मेहरून्निसा हमीद खान                    अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे करीता अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये पान क्र.W २२० वर असलेली र.रू.१०.०० लक्ष तरतूद **याऐवजी** र.रू.१०.०० लक्ष विविध ठिकाणी पॅचवर्क नाली दुरूस्ती व ड्रेनेज लाईन देखभाल दुरूस्ती

व कॉंक्रेटींग दुरूस्ती करणे करीता वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत विविध ठिकाणी कॉक्रेटींग करीता अर्थसंकल्प २००७-०८ करीता ५ लक्ष रूपये विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करीता बजट बुक पान क्र.W१८६ मध्ये उल्लेखणी आहे.

करीता हे ५ लक्ष रूपये मला विविध ठिकाणी नळ,पोल स्टॅन्ड, नाली रिपेर, व मुतारी करीता उपलब्ध करून देण्यात यावे. कारण की माझ्या वार्ड मधील या कामाकरीता बजटचा अभाव आहे. कृपा करून मला वळती करून देणे ही विनंती.

सुचक : श्रीमती खान मेहरून्निसा हमीद खान अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ नेहरूनगर अंतर्गत विविध ठिकाणी कॉक्रेटींग करीता अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये पान क्र.W १८६ वर असलेली तरतूद र.रू.५.०० लक्ष **याऐवजी** र.रू.५ लक्ष विविध ठिकाणी नळ,पोल स्टॅन्ड, नाली रिपेर, व मुतारी करीता वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, लायन्स क्लब औरंगाबाद चिकलठाण्याच्या वतीने आयोजीत डॉ.शरदकुमार दिक्षित प्लॉस्टीक सर्जरी शिबीराचे प्रत्येक वर्षी औरंगाबाद शहरात प्लास्टीक सर्जरी शिबीर घेतात. गेल्या ३० वर्षापासून त्यांच्या या समाजसेवेचा लाभ शहरातील व आजुबाजूच्या परिसरातील गरीब नागरीकांना होत आहे. सर्व शस्त्रक्रिया ह्या रूग्णांना मोफत उपलब्ध करून देण्यांत येतात. त्यांच्या या समाजसेवेत महापालिकेचा हातभार असावा या उद्देशाने त्यांचे तर्फे दिनांक १३ ते २० डिसेबंर २००७ या कालावधीत आयोजीत प्लास्टीक सर्जरी शिबीरास महानगरपालिकेतर्फे मदत म्हणून रक्कम रूपये एक लक्ष पन्नास हजार देण्यात यावी व त्यांचा नागरी सत्कार करण्यांत यावा. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अनिल जैस्वाल, श्री.भाऊसाहेब वाघ, श्री.संतोष जेजुरकर

अनुमोदक : श्री.अ.साजेद अब्दुल सत्तार, श्री.भगवान (बापु) घडमोडे, सौ.विजया रहाटकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लायन्स क्लब औरंगाबाद चिकलठाण्याच्या वतीने दिनांक १३ ते २० डिसेबंर २००७ या कालावधीत आयोजीत डॉ.शरदकुमार दिक्षित यांच्या प्लास्टीक सर्जरी शिबीरास महानगरपालिकेतर्फे मदत म्हणून रक्कम रूपये एक लक्ष पन्नास हजार देण्यास व त्यांचा नागरी सत्कार करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२५९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नाव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W-२६/३४ | नवीन पथदिवे व्यवस्था नवीन पथदिवे व्यवस्था (फक्त नव्याने मंजुर | १. नवीन पथदिवे व्यवस्था (फक्त नव्याने मंजुर झालेल्या रेखांकनात पथदिवे बसविण्यासाठी)- १५.५० लक्ष<br>२. नवीन प्रशासकीय इमारत टप्पा क्र.३ मध्ये |

| | | |
|---|---|---|
| | झालेल्या रेखांकनात पथदिवे बसविण्यासाठी)- २०.०० लक्ष | स्वच्छतागृहास नोव्हापॅन पार्टीशन करणे व मुख्य प्रशासकीय इमारत येथे जनरेटरसाठी शेड बांधणे-२.०० लक्ष<br>३. वार्ड क्र.५७ भवानीनगर प्रभागात उर्जा बचत दिवे लावणे - २.५० लक्ष |

सुचक : श्री.त्र्यंबक तुपे अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नाव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W-२६/३४ | नवीन पथदिवे व्यवस्था नवीन पथदिवे व्यवस्था (फक्तनव्याने मंजुर झालेल्या रेखांकनात पथदिवे बसविण्यासाठी)- २०.०० लक्ष | १. नवीन पथदिवे व्यवस्था (फक्त नव्याने मंजुर झालेल्या रेखांकनात पथदिवे बसविण्यासाठी)- १५.५० लक्ष<br>२. नवीन प्रशासकीय इमारत टप्पा क्र.३ मध्ये स्वच्छतागृहास नोव्हापॅन पार्टीशन करणे व मुख्य प्रशासकीय इमारत येथे जनरेटरसाठी शेड बांधणे-२.०० लक्ष<br>३. वार्ड क्र.५७ भवानीनगर प्रभागात उर्जा बचत दिवे लावणे - २.५० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२६० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क कार्यालया अंतर्गत प्रभाग क्रमांक (५३) मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे, व दुरूस्ती करणे तसेच मुरूम टाकणे, खडी टाकणे आणि पेव्हर ब्लॉक बसविणे व दुरूस्ती फुटकळ कामे व इतर किरकोळ कामे करण्यासाठी

कामे करून घेण्यासाठी अ.क्र.पान ०७ वार्ड क्र.(५३) मध्ये परमविर अ.हमीद हॉल भिंतीची उंची वाढविणे व दुरूस्ती करणे ऐवजी वरील कामे करावयाची असल्या कारणाने हेड चेंज करून द्यावे ही नम्र विनंती.

सुचक : श्रीमती शमशाद बेगम शेख हफीज, श्री.अ.साजेद अ.सत्तार
अनुमोदक : श्री.निसार खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अ.क्र.पान ०७ वार्ड क्र.(५३) करीता परमविर अ.हमीद हॉल भिंतीची उंची वाढविणे व दुरूस्ती करणे साठी असलेल्या तरतूदी **ऐवजी** वार्ड क कार्यालया अंतर्गत प्रभाग क्रमांक (५३) मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे, व दुरूस्ती करणे तसेच मुरूम टाकणे, खडी टाकणे आणि पेव्हर ब्लॉक बसविणे व दुरूस्ती फुटकळ कामे व इतर किरकोळ कामे करण्यासाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२६१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.(५३) मध्ये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे, दुरूस्ती करणे, ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे.

तसेच खडी टाकणे, मुरूम टाकणे फुटकळ कामे व इतर दुरूस्ती करावयाची असल्या कारणाने पान क्रमांक अ.क्र.(८) १.५० W-९५ प्रभाग क्र.(५३) येथे मिनी स्टेडीयमची दुरूस्ती करणे व गेट बसविण्याऐवजी (उपरोक्त) वरील कामे करण्यासाठी हेड चेंज करून द्यावे ही नम्र विनंती.
सुचक : श्रीमती शमशाद बेगम शेख हफीज, श्री.अ.साजेद अ.सत्तार
अनुमोदक : श्री.निसार खान

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पान क्रमांक अ.क्र.(८) १.५० W-९५ प्रभाग क्र.(५३) येथे मिनी स्टेडीयमची दुरूस्ती करणे व गेट बसविण्याऐवजी प्रभाग क्र.(५३) मध्ये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे, दुरूस्ती करणे, ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्ती करणे,तसेच खडी टाकणे, मुरूम टाकणे फुटकळ कामे व इतर दुरूस्ती करणेसाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.१२६२ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको एन-८ येथे बोटॅनिकल उद्यान विकसीत करणे करीता एकुण रक्कम रू.२१५.०० लक्षचे अंदाजपत्रक करण्यात आलेले आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक -३८३ दि.१७.०८.०६ (दि.११.०८.२००६ ची तहकुब) अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार निविदा काढून निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीकडे सादर केली असता मा.स्थायी समितीने मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कं. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराच्या निविदेस विषय क्रमांक -३३५ दि.३०.०३.०७ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मुळ मंजुर नकाशा प्रमाणे काम प्रगतीपथावर आहे.

बोटॅनिकल उद्यानाच्या नियोजीत नकाशा नुसार मुख्य प्रवेशव्दार सध्या मंगेश गॅस एजन्सीच्या बाजुने ८० फुट रस्त्यालगत उद्यानाच्या पूर्व दिशेला नियोजीत आहे. तथापी सदरील प्रवेशव्दाराच्या परिसरात काही जुन्या समाध्या व जुने पुरातन बांधकाम अस्तित्वात आहे. तसेच सदरील जागेत श्री.गणेश आसाराम इंगळे व पुनमचंद पापालाल इंगळे यांनी दिवाणी दावा क्र.७९४/२००७ अन्वये १ एकर २४ गुंठे सर्व्हे नं.१७/२ जुना जसवंतपुरा नविन एन-८ सिडको, औरंगाबाद येथील मुन्सीपल हाऊस नंबर बी.एन-८ ए-३/२ क्षेत्र १०X१२ एन-८ सिडको या जागेत हस्तक्षेप करण्यास महानगरपालिकेस प्रतिबंध करणे बाबत न्यायालयास विनंती केली आहे. त्युानसार मा.न्यायालयाने सदरील जागेत करण्यात येत असलेल्या मोकळया जागेच्या कंपाऊन्ड वॉलचे बांधकाम उक्त घरास २० फुटाचा रस्ता सोडून बांधकाम करणे बाबत निर्देशित केलेले आहे.

त्यानुसार न्यायालयाच्या निर्देशान्वये २० फुटाचा रस्ता सोडल्यास व अस्तित्वातील जुन्या समाध्या व पुरातन बांधकाम या बाबी लक्षात घेतल्यास सदर ठिकाणी बोटॅनिकल उद्यानासाठी नियोजित असलेले मुख्य प्रवेशव्दार उभारणे शक्य होणार नाही. त्यामुळे लगत असलेले नेहरू उद्यानाकडील ६० फुट रस्त्या लगत बोटॅनिकल उद्यानाचे मुख्य प्रवेशव्दार उभारणे आवश्यक आहे. त्याकरीता नेहरू उद्यान व बोटॅनिकल उद्यान एकत्रित करणे आवश्यक आहे आणि ही दोन्ही उद्याने एकत्रित करावयाचे झाल्यास या ठिकाणी उद्यान विकासाची काही कामे करावी लागणार आहेत.

त्यानुसार दोन्ही उद्यान एकत्रित करण्यासाठी नेहरू गार्डनची मोडकळीस आलेली संरक्षित भिंत तोडून नवीन भिंत बांधणे, अस्तित्वात असलेल्या तलावातील गाळ काढून बोटींगची सुविधा करणे नेहरू उद्यानाचे सुशोभिकरण करणे, व बोटॅनिकल गार्डनच्या दक्षिण बाजू कडील गटार बांधुन त्यावर पार्किंग करीता स्लॅब टाकणे इत्यादी वाढीव कामे करणेस्तव सा.बां.विभागाचे सन २००७-२००८ च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रूपये ९२.४० लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरील कामास्तव रक्कम रूपये ९२.४० लक्षची तरतूद आवश्यक आहे त्यानुसार पैकी रक्कम रू.३७.०० लक्ष वळती करणेस्तव मा.सर्वसाधारण सभेने दिनांक २६.१०.२००७ रोजी मान्यता दिलेली आहे. व रक्कम रू.२५.०० लक्ष वळती करण्यास्तव विषय क्र.११५५/दिनांक २९.९.२००७ अन्वये मान्यता दिलेली आहे त्यानुसार ३७+२५=६२.०० लक्ष सन २००७-०८ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात येतील व रक्कम रू.३०.४० लक्ष सन २००८-०९ या आर्थिक वर्षात तरतुद उपलब्ध होईल. या अटीस अधिन राहून प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सदरचे काम निविदा काढुन पुर्ण करण्यात येईल तसेच काम पूर्ण झाल्यानंतर कामाची पुढील देखभाल दुरूस्ती करीता सध्याचे बोटॅनिकल गार्डनच्या अटी-शर्तीनुसार पुढील तीन वर्षाकरीता देण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामांचे अंदाजपत्रक रक्कम रू.९२.४० लक्षचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-८ येथे बोटॅनिकल उद्यान विकसीत करणे करीता लगत असलेले नेहरू उद्यानाकडील ६० फुट रस्त्या लगत बोटॅनिकल उद्यानाचे मुख्य प्रवेशव्दार उभारणे आवश्यक असल्यामूळे, त्याकरीता नेहरू उद्यान व बोटॅनिकल उद्यान एकत्रित करणे आवश्यक असल्यामूळे, ही दोन्ही उद्याने एकत्रित करण्यासाठी या ठिकाणी उद्यान विकासाची कामे करणेसाठी तयार करण्यांत आलेले वाढीव कामाचे रक्कम रूपये ९२.४० लक्षचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच सदरील कामास्तव रक्कम रू.३७.०० लक्ष वळती करणेस्तव मा.सर्वसाधारण सभेने दिनांक २६.१०.२००७ रोजी मान्यता दिलेली असून व रक्कम रू.२५.०० लक्ष वळती करण्यास्तव विषय क्र.११५५/दिनांक २९.९.२००७ अन्वये मान्यता दिलेली असून, त्यानुसार ३७+२५=६२.०० लक्ष सन २००७-०८ या आर्थिक वर्षात खर्च करण्यास व रक्कम रू.३०.४० लक्ष सन २००८-०९ या आर्थिक वर्षात तरतुद उपलब्ध होईल, या अटीस अधिन राहून तसेच काम पूर्ण झाल्यानंतर कामाची पुढील देखभाल दुरूस्ती करीता सध्याचे बोटॅनिकल गार्डनच्या अटी-शर्तीनुसार पुढील तीन वर्षाकरीता देण्यात येईल, यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२६३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सिध्दार्थ उद्यानात नवीन बसविण्यात येत असलेल्या खेळण्यासाठी/परिसरातील दुरूस्ती व रंगरंगोटी करणे व उद्यानात नवीन दोन मल्टी प्ले सिस्टीम हेलीकॉप्टर बसविण्यात येत आहे. सदरील खेळणी खाली इकोप्लेक्स फ्लोरींग बसविण्यात येत आहे. सदरील हेलीकॉप्टर खेळणीस चेन लिंग, फेन्सींग करणे परिसरातील दुरूस्ती व रंगरंगोटी करणे आवश्यक आहे.

करीता या कामा करीता रूपये ३ लक्षची आवश्यकता आहे. तरी माझ्या वॉर्डातील वॉर्ड क्र.३५ मध्ये विविध ठिकाणी केबलचे काम करणे यासाठी २ लक्ष पन्नास हजार रूपयाची तरतूद करण्यात आली होती, पान क्र.W १९२ अ.क्र. २ ती रद्द करून वरील काम करणे आवश्यक आहे.

करीता वरील कामास रक्कम वळती करण्यांत यावी. ही विनंती.

सुचक : श्री.अब्दुल रशिद खॉन (मामु)　　　　अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३५ करीता अर्थसंकल्पातील पान क्र.W १९२ अ.क्र. २ वर असलेली र.रू.२,५०,०००/- तरतूद सिध्दार्थ उद्यानात नवीन बसविण्यात येत असलेल्या खेळण्यासाठी/परिसरातील दुरूस्ती व रंगरंगोटी करणे व उद्यानात नवीन दोन मल्टी प्ले सिस्टीम हेलीकॉप्टर बसविण्यात येत आहे,सदरील खेळणी खाली इकोप्लेक्स फ्लोरींग बसविण्यात येत आहे.

सदरील हेलीकॉप्टर खेळणीस चेन लिंग, फेन्सींग करणे परिसरातील दुरूस्ती व रंगरंगोटी करणे करीता वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी. आवश्यक आहे.

**विषय क्र.१२६४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५७ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| <br>W९५/१८<br>W९५/१९<br><br>W९६/०७<br><br>W१०२/४<br><br>W१०२/५ | **वार्ड क- देखभल व दुरूस्ती**<br>०१.तक्षशीलानगर स्लम येथे पत्र्याचे शेड बांधणे -०.५०<br>०२.रेंगटीपुरा भागात सार्वजनिक ओटा दुरूस्ती -१.००<br>**लेखाशिर्ष-शाळा इमारत देखभाल दुरूस्ती**<br>०१.प्रभाग क्र.५७ मनपाचे शेड दुरूस्ती करणे -१.००<br>**लेखाशिर्ष-सुलभ शौचालय**<br>०१.वार्ड क्र.५७ तक्षशीलानगर स्लम शौचालय दुरूस्ती करणे -०.५०<br>०२.वार्ड क्र.५७ तक्षशीलानगर शैचालय दुरूस्ती करणे-०.५० | वार्ड क्र.५७ मधील विविध ठिकाणी ड्रेनेज दुरूस्ती करणे, तुटलेले मेनहोल चेंबर्स दुरूस्त करणे, फरशी बसविणे, गटार दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे-३.५० लक्ष |
| W२१०/१७ | **लेखाशिर्ष -शहरी भागात खुल्या गटारी बांधणे**<br>०१.प्रभाग क्र.५७ रेंगटीपुरा ते मोंढा येथील गटार दुरूस्ती करणे-५.०० | ०१.वार्ड क्र.६६ शिवशंकर कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज दुरूस्ती, मेनहोल चेंबर दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे-३.०० लक्ष.<br>०२. बन्सीलालनगर अग्निशमन विभागाचे इमारतीस रंगरंगोटी करणे-२.०० लक्ष. |
| W२२१/३९ | **स.सा.सभेची शिफारस केलेली-शहरी भागात नवीन कॉक्रीट रस्ते**<br>प्रभाग क्र.५७ भवानीनगर अंतर्गत रेंगटीपुरा भागातील आशुखाना येथे पेव्हर ब्लॉक बसविणे-२.५० लक्ष. | वार्ड क्र.६६ मध्ये सिंधी कॉलनी (बालाजीनगर) येथे कमान उभारणे-२.५० लक्ष. |

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक : सौ.लता दलाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| <br>W९५/१८<br>W९५/१९<br><br>W९६/०७<br><br>W१०२/४<br><br>W१०२/५ | **वार्ड क- देखभल व दुरूस्ती**<br>०१.तक्षशीलानगर स्लम येथे पत्र्याचे शेड बांधणे-०.५०<br>०२.रेंगटीपुरा भागात सार्वजनिक ओटा दुरूस्ती-१.००<br>**लेखाशिर्ष-शाळा इमारत देखभाल दुरूस्ती**<br>०१.प्रभाग क्र.५७ मनपाचे शेड दुरूस्ती करणे-१.००<br>**लेखाशिर्ष-सुलभ शौचालय**<br>०१.वार्ड क्र.५७ तक्षशीलानगर स्लम शौचालय दुरूस्ती करणे-०.५०<br>०२.वार्ड क्र.५७ तक्षशीलानगर शैचालय दुरूस्ती करणे-०.५० | वार्ड क्र.५७ मधील विविध ठिकाणी ड्रेनेज दुरूस्ती करणे, तुटलेले मेनहोल चेंबर्स दुरूस्त करणे, फरशी बसविणे, गटार दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे-३.५० लक्ष |
| W२१०/१७ | **लेखाशिर्ष -शहरी भागात खुल्या गटारी बांधणे**<br>०१.प्रभाग क्र.५७ रेंगटीपुरा ते मोंढा येथील गटार दुरूस्ती करणे-५.०० | ०१.वार्ड क्र.६६ शिवशंकर कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज दुरूस्ती, मेनहोल चेंबर दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे-३.०० लक्ष. |

| | | |
|---|---|---|
| | | ०२. बन्सीलालनगर अग्निशमन विभागाचे इमारतीस रंगरंगोटी करणे-२.०० लक्ष. |
| W२२१/३९ | **स.सा.सभेची शिफारस केलेली-शहरी भागात नवीन कॉंक्रीट रस्ते**<br>प्रभाग क्र.५७ भवानीनगर अंतर्गत रेंगटीपुरा भागातील आशुखाना येथे पेव्हर ब्लॉक बसविणे-२.५० लक्ष. | वार्ड क्र.६६ मध्ये सिंधी कॉलनी (बालाजीनगर) येथे कमान उभारणे-२.५० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२६५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बालाजी नगर ते बागशेरजंग यात १५ मीटर रूंद विकास योजना रस्त्याची आखणी बालाजी मंगल कार्यालयापासून सिंधी कॉलनी दक्षिण-पश्चिम कोपरा इथपर्यंत सरळ रेषेत असून त्यापुढे हा रस्ता अमरप्रित ते शहानुरमिया दर्गा या २४ मीटर रूंद विकास योजना रस्त्याच्या टी जंक्शन पर्यंत तिरकस वळला आहे. ज्याचा सीटीएस नं.१५८५४/ब व १५१८४ असा आहे. तरी सिंधी कॉलनी दक्षिण-पश्चिम कोपरा ते टी जंक्शन पर्यंतचा तिरकस रस्ता हा मुळ रस्त्याच्या सरळ रेषेत घेण्याचा बदल करण्यात यावा. ज्याचा सिटीएस नं.१४८४४/ब असा आहे. त्या बदलास सर्वसाधारण सभेने मान्यता द्यावी.

प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

सुचक : श्री.मधुकर सावंत

अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार,सौ.लता दलाल,श्रीमती लक्ष्मी शंकर आशन्ना,
श्रीमती मंगला प्रकाश गायकवाड,श्रीमती खान मेहरून्निसा खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बालाजी नगर ते बागशेरजंग यात १५ मीटर रूंद विकास योजना रस्त्याची आखणी बालाजी मंगल कार्यालयापासून सिंधी कॉलनी दक्षिण-पश्चिम कोपरा इथपर्यंत सरळ रेषेत असून त्यापुढे हा रस्ता अमरप्रित ते शहानुरमिया दर्गा या २४ मीटर रूंद विकास योजना रस्त्याच्या टी जंक्शन पर्यंत तिरकस वळला आहे. ज्याचा सीटीएस नं.१५८५४/ब व १५१८४ असा आहे. तरी सिंधी कॉलनी दक्षिण-पश्चिम कोपरा ते टी जंक्शन पर्यंतचा तिरकस रस्ता हा मुळ रस्त्याच्या सरळ रेषेत सीटीएस नं.१४८४४/ब मधुन सुयोग्य असा बदल करण्यास व रस्त्याची आखणी सरळ करण्यास व या संबंधीचे कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करणेसह या विकास योजना रस्त्याच्या आखणीस फेरबदल करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२६६ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मो.आंबेडकर नगर,मो.राहुलनगर,मो.ब्रिजवाडी या घोषीत झोपडपटटी भागामध्ये केंद्र व राज्य शासन पुरस्कृत एकात्मीक गृह निर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम योजना राबविणे संदर्भात मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन मा.श्री.एन रामाराव यांचे पत्र क्र.एगृनि-२००६/प्र.क्र.-१९/गृनियो-२ गृहनिर्माण विभाग,मंत्रालय मुंबई ४०० ००३२ दिनांक २७/४/२००६ चे पत्रानुसार औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मो.आंबेडकर नगर,मो.राहुलनगर,मो.ब्रिजवाडी या घोषीत झोपडपटटी भागामध्ये केंद्र व राज्य शासन पुरस्कृत एकात्मीक गृह निर्माण व झोपडपटटी विकास कार्यक्रम योजना राबविणे आहे.

सदरील योजनेमध्ये ज्या लाभधारकांची निवड करण्यात आली आहे. अशा लाभधारकास रूपये ८०,०००/- मध्ये २५ चौ.मी. क्षेत्रामध्ये टॉयलेट व बाथरूमसह स्लॅबचे घर बांधून देणार आहे. त्यासाठी राखीव प्रवर्गाच्या लाभधारकास १० टक्के व खुल्या प्रवर्गाच्या लाभधारकास १२ टक्के

रकमेचा हिस्सा भरणे आवश्यक आहे. केंद्र शासन ८० टक्के व उर्वरीत रक्कम राज्य शासन अनुदान देणार आहे. तसेच घर बांधकामासह त्या संपूर्ण भागाचा विकास करून सामाजिक व भौतिक सुविधा जसे रस्ते,गटारी,ड्रेनेज लाईन,पाणी पुरवठा लाईन, विद्युत,समाज मंदीर,शाळा,उद्यान इत्यादी सुविधा सुध्दा पुरविण्यात येणार असून त्याचा १०० टक्के खर्च केंद्र शासन करणार आहे.

मो.आंबेडकर नगर, मो.राहुलनगर,मो.ब्रिजवाडी या घोषित झोपडपट्टी विभागाचे मे. आर्क असोसिएटस, औरंगाबाद व मे.इन्फ्रास्ट्रक्चर पुणे या एजन्सी मार्फत सर्वेक्षण करून कामाचा प्रकल्प अहवाल तयार करून शासनास पाठविण्यात आला असता त्यास शासनाची मंजुरी प्राप्त झाली आहे.

करीता मो.आंबेडकर नगर, मो.राहुलनगर,मो.ब्रिजवाडी या घोषित झोपडपट्टी विभागामध्ये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजना राबविणेस प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मो.आंबेडकर नगर,मो.राहुलनगर,मो.ब्रिजवाडी या घोषित झोपडपट्टी विभागामध्ये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजना राबविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१२६७ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध भागांमध्ये केंद्र व राज्य शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना राबविणे संदर्भात मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन मा.श्री.एन रामाराव यांचे पत्र क्र.एगृनि-२००६/प्र.क्र.-१९/गृनियो-२ गृहनिर्माण विभाग,मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक २७/४/२००६ चे पत्रानुसार औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घोषित व अघोषित झोपडपट्टी विभागामध्ये केंद्र व राज्य शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजना राबविणे आहे.

सदरील योजनेमध्ये ज्या लाभधारकांची निवड करण्यात आली आहे. अशा लाभधारकास रूपये ८०,०००/- मध्ये २५ चौ.मी. क्षेत्रामध्ये टॉयलेट व बाथरूमसह स्लॅबचे घर बांधून देणार आहे. त्यासाठी राखीव प्रवर्गाच्या लाभधारकास १० टक्के व खुल्या प्रवर्गाच्या लाभधारकास १२ टक्के रकमेचा हिस्सा भरणे आवश्यक आहे. केंद्र शासन ८० टक्के व उर्वरीत रक्कम राज्य शासन अनुदान देणार आहे. तसेच घर बांधकामासह त्या संपूर्ण भागाचा विकास करून सामाजिक व भौतिक सुविधा जसे रस्ते,गटारी,ड्रेनेज लाईन,पाणी पुरवठा लाईन, विद्युत,समाज मंदीर,शाळा,उद्यान इत्यादी सुविधा सुध्दा पुरविण्यात येणार असून त्याचा १०० टक्के खर्च केंद्र शासन करणार आहे.

तरी औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घोषित व अघोषित झोपडपट्टी विभागाचे सर्वेक्षण करून त्याचा प्रकल्प अहवाल तयार करून शासन मंजुरीसाठी पाठविण्याचे काम महानगरपालिकेने नेमलेल्या प्रकल्प व्यवस्थापक यांचेकडून करून घेण्यात येईल.

करीता औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घोषित व अघोषित झोपडपट्टी विभागामध्ये केंद्र व राज्य शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजना राबविण्याचा कामाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घोषित व अघोषित झोपडपट्टी विभागामध्ये केंद्र व राज्य शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम योजना राबविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## सर्वसाधारण सभा

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (५०)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१(एच) आणि (आय) अन्वये

**दिनांक :- १८.१०.२००७**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१ (क) अन्वये मा.महापौर डॉ.श्री.भागवत किसनराव कराड यांनी शुक्रवार दिनांक २६.१०.२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिका प्रशासकीय इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे आयोजीत केली आहे.

प्रायोजित सभेत निम्ननिर्दीष्ट विषय पत्रिका निर्णयाधिन आहे.

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारित वेळी उपनिर्दीष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## सर्वसाधारण सभा
## पुरवणी विषय पत्रिका

**दिनांक :- २२.१०.२००७**

(मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि 'ड' चे प्रकरण -२ आणि नियम -१ (ज)अन्वये)

शुक्रवार दिनांक २६.१०.२००७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसाठी पुरवणी विषय पत्रिका पाठवित आहोत.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र.१२००/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.आसाराम काकाजी मुगदिया हे या महानगरपालिका पुर्वी म्हणजे सन १९५२ ते १९६७ पर्यंत चार वेळेस नगर सेवक म्हणून निवडूण आले होते व हंगामी काळात ते नगर अध्यक्षही होते अनेक वेळा उप नगराध्यक्ष म्हणून ही काम केलेले आहे. म्हणून गुलमंडी येथील ॲड अरूणचंद कापडिया यांच्या घरापासून ते सिटीचौक येथील गुलशा क्लाथ स्टोर्स पर्यंत रस्त्याला"श्री.आसाराम काकाजी मुगदिया मार्ग" असे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार — अनुमोदक : श्री.अब्दुल रशिद खान (मामू)

**विषय क्र.१२०१/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे चालविण्यात येणाऱ्या शहर बस सेवेचा लाभ या शहरातील स्वातंत्र्यसैनिकांना व्हावा यासाठी स्वातंत्र्यसैनिकांना शहर बसमध्ये तिकीट शुल्कात ५०टक्के सवलत देण्यात यावी करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय केनेकर — अनुमोदक : श्री.कंवरसिंग बैनाडे

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभा

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (५०)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१(एच) आणि (आय) अन्वये

**दिनांक :- .१०.२००७**

मा.महापौर डॉ.भागवत किसनराव कराड यांनी शुक्रवार दिनांक २६.१०.२००७ रोजी सकाळी११.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिका प्रशासकीय इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे आयोजीत केली आहे.

प्रायोजीत सभेत निम्ननिर्दीष्ट विषय पत्रिका निर्णयाधिन आहे.

**विषय क्र. १ :**

वार्ड क्र.२ सुरेवाडी वसाहती अंतर्गत १००,१५०,२०० मि.मी.व्यासाची डी.आय.के.जलवाहीन्या टाकणेबाबतच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

**विषय क्र. २ :**

प्रभाग क्र.६३ कोकणवाडी,क्रांतीनगर मुख्य रस्त्यावरील स्नेहनगर या शासकीय निवासस्थानाच्या वसाहतीस लागून क्रांतीनगरकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर कमान बांधणे बाबत धोरणात्मक निर्णय घेणे.

**विषय क्र. ३ :**

केंद्र शासनाचे ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्ज) नियम-२००१ चे कलम (४) अन्वये संनियंत्रण समिती स्थापन करणे बाबत.

**विषय क्र. ४ :**

मुथीयान कॉर्नर ते चौसरनगर मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**विषय क्र. ५ :**

मनपा मुख्य प्रशासकीय इमारत येथील दूरध्वनी देयकावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रिंटर बसविणे व यंत्रणा अद्यावत करणेकरीता अर्थसंकल्पातील अ.क्र.१ पा.क्र.एम.५८ वरील तरतूदीमधून रक्कम वळती करणे.

**विषय क्र.६ :**

औरंगाबाद मनपा विकास नियंत्रण नियमावलीत काही बदल करणेकरीता म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे करीता आयुक्त,मनपा औरंगाबाद यांना अधिकार देणे.

**विषय क्र.७ :**

मनपा हद्दीतील दुकाने,व्यापारी अस्थापना, अन्य संस्था इत्यादींनी प्रदर्शित केलेल्या जाहीराती,दुकानाचे फलक,आकाश चिन्हे इत्यादींवर मुं.प्रां.मनपा अधि.१९४९ च्या तरतुदीनुसार दुकानांसाठी द्यावयाची परवाना फी चे प्रस्तावित दर व दुकानांवरील प्रदर्शित करण्यात येत असलेल्या जाहीरातीच्या प्रस्तावित दराचे नियमास मान्यता देणे.

**विषय क्र. ८ :**

औरंगाबाद मनपाच्या क्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर सर्व प्रकारे उपद्रव निर्माण करणाऱ्या नागरीकांना प्रतिबंध करण्यासाठी लोक जागृती करून त्यांच्यात सामाजिक शिस्तीची जाणीव निर्माण करण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मनपा औरंगाबाद येथे उपद्रव शोध पथक दल स्थापन करणे.

**विषय क्र.९ :**

वाढत्या शहरीकरणामुळे अपघात, इतर गंभीर आजारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यामूळे, आपत्कालीन वैद्यकीय सेवा (इमजन्सी मेडीकल सर्व्हीसेस इ.एम.एस) सुरू करणे.

**विषय क्र. १० :**

औरंगाबाद मनपा क्षेत्रातील अनाधिकृत वसाहती ह्या महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम -२००१ अंतर्गत नियमाधीन करण्याची कार्यवाही करणे संबंधी मनपा हद्दीतील काही वसाहती ह्या मंजूर विकास योजनेतील आरक्षणाने बाधीत होतात अशा वसाहती मधील मिळकती गुंठेवारी अधिनियमान्वये नियमाधीन करणे बाबत जा.क्र./मनपा/नरवि/गुंठे/१६९२/२००४दिनांक २ जुलै २००४ च्या पत्रान्वये मागविण्यांत आलेल्या मार्गदर्शनाबाबत.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ११ :**

जयभवानीनगर वार्ड क्र.८१ येथील नाला बांधकामासाठी तयार असलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
सुचक : सौ.पुष्पाताई शिंदे, श्री.काशिनाथ कोकाटे
अनुमोदक : श्री.दामुअण्णा शिंदे, श्रीमती जयश्री किवळेकर

**विषय क्र.१२ :**

पान क्र.W ३१ अ.क्र.४ नवयुग कॉलनी येथे खुली जागेस संरक्षण भिंत बांधणे व सांस्कृतिक सभागृह बांधणे हया कामा शिवाय भिमनगर येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसवणे संबंधी.
सुचक : श्री.मिलींद दाभाडे अनुमोदक :श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.जगताप संजय उत्तमराव

**विषय क्र.१३ :**

वॉर्ड क्र.३० करीता अर्थसंकल्प २००७-२००८ पान क्र.डब्ल्यु २०६ अ.क्र.११ असलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.
सुचक : सौ.शोभा मिटकर अनुमोदक : श्रीमती छाया राऊत

**विषय क्र.१४ :**

जालना रोडवरील आकाशवाणी जवळील महात्मा बसवेश्वर चौकात महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा उभारणे.
सुचक : सौ.सरला सखाराम पोळ, श्री.प्रशांत देसरडा
अनुमोदक : श्रीमती आशा बिनवडे, श्री.भगवान घडमोडे

**विषय क्र.१५ :**

सन २००७-०८ अर्थसंकल्पात पान क्र.W-२३५ अ.क्र.२७ सिंधी कॉलनी, मित्रनगर करीता असलेल्या तरतूदीचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.
सुचक :सौ.हर्षमाला विजयकुमार पाटणी अनुमोदक : श्री. सुरेंद्रजितसिंग सबरवाल

**विषय क्र.१६ :**

सन २००७-०८ मधील प्रभाग क्र.६५ करीता अ.क्र.३६ पा.क्र.w-१२४ वर असलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.
सुचक : श्री.मधुकर सावंत अनुमोदक : श्री.रवि कावडे, श्री.संजय जोशी, श्री.प्रशांत देसरडा

**विषय क्र.१७ :**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने, औरंगाबाद जिल्हा व शहर तालीम संघ व मनपा औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत ५१ वे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेस आर्थिक मदत करणे.
सुचक : सौ.लता दलाल, श्री.त्र्यंबक तुपे, श्री.संतोष जेजुरकर,
श्री.प्रशांत देसरडा, श्री.बाबासाहेब डांगे, श्री.विनायकराव पांडे
अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.अ.रशीद खान (मामू) श्री.संजय जोशी,
श्री.वसंत नरवडे पाटील, श्री.भगवान घडमोडे, श्री.किशोर तुलसीबागवाले

**विषय क्र.१८ :**

वार्ड क्र.१५ करीता अर्थसंकल्पातीलपा.क्र.डब्ल्यु २१५ वर असलेल्या तरतूदीचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : श्री.मोहन मेघावाले

अनुमोदक :श्री. अनिल जैस्वाल, श्री.दामुअण्णा शिंदे, सौ.रेखा कैलास काथार

**विषय क्र.१९ :**

वार्ड क्र. ४४ करीता अर्थसंकल्पातील पान क्र.W-१०८ अ.क्र.-१६,पान क्र.W-१०८ अ.क्र. १७ व पान क्र.W-१०८ अ.क्र.१८ वर असलेल्या तरतूदीचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : श्री.शेख इब्राहीम पटेल अनुमोदक :श्री.संजय जगताप

**विषय क्र.२० :**

वार्ड क्र.७३ करीता अर्थसंकल्पात पान क्र.२१९ अ.क्र.१८ वर असलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे अनुमोदक : श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर

**विषय क्र.२१ :**

वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी करीता अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु २०३/१४, २२९/१३ वर असलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.गजानन बारवाल

**विषय क्र.२२ :**

वार्ड क्र.१६ करीता अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु १७९ वर असलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : सौ.रजनी जोशी अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**विषय क्र.२३ :**

वार्ड क्र.२४ एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत एन-१ मधील हरितपट्टे विकसीत करणे हे वृक्षप्राधिकरण या लेखाशिर्षकाखलील टाकण्यात आलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक:सौ.दिपाली सुनिल पाटील अनुमोदक:श्रीमती आशा बिनवडे,श्रीमती अंजली कोंडेकर

**विषय क्र.२४ :**

अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये पृष्ठ क्र.W-५९ अ.क्र.९ वर प्रभाग क्र.१० जयसींगपुरा करीता असलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : श्री.सलीम खान यासीन खान अनुमोदक : श्री.संजय जगताप

## पुरवणी विषय

**विषय क्र.१ :**

गुलमंडी येथील ॲड अरूणचंद कापडिया यांच्या घरापासून ते सिटीचौक येथील गुलशा क्लाथ स्टोर्स पर्यंत रस्त्याला श्री.आसाराम काकाजी मुगदिया मार्ग असे नाव देणे.

सुचक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार अनुमोदक : श्री.अब्दुल रशिद खान (मामू)

**विषय क्र.२ :**

औरंगाबाद मनपातर्फे चालविण्यात येणाऱ्या शहर बसमध्ये स्वातंत्र्यसैनिकांना तिकीट शुल्कात ५० टक्के सवलत देणे.

सुचक : श्री.संजय केनेकर अनुमोदक : श्री.कंवरसिंग बैनाडे

**विषय क्र.३ :**

वार्ड क्र.२६ गणेशनगर करीता अर्थसंकल्पात पान क्र.W७६/९,W८६/१४,W२९/२६,W१०४/२, W२१२/५१ वर असलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.
सुचक : श्री.काशिनाथ कोकाटे अनुमोदक : श्री.सीताराम सुरे

**विषय क्र.४ :**
जयभवानीनगर वार्ड क्र.८१ येथील नाला बांधकामासाठी तयार असलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
सुचक:सौ.पुष्पाताई शिंदे,श्री.काशिनाथ कोकाटे अनुमोदक:श्री.दामु अण्णा शिंदे,श्रीमती जयश्री किवळेकर

**विषय क्र.५ :**
वार्ड क्र.६१ करीता अर्थसंकल्पातील पान डब्ल्यु २२२/७ वर असलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.
सुचक : सौ.बोरामणीकर कला अनुमोदक : सौ.रजनी जोशी

**विषय क्र.६ :**
गुंठेवारी नियम २००१ अंतर्गत पैसे भरलेल्या रहिवाशांना पी.आर.कार्ड देणे बाबत.
सुचक : श्रीमती मिराताई शिंदे अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

स्वाक्षरीत/-
**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
**महापौर**
महानगरपालिका औरंगाबाद

**//सत्यप्रत//**